|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ९ अंक : ३ सोमवार दि. ११ जानेवारी २०२१ ते रविवार दि. १७ जानेवारी २०२१ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

# रुग्णालये बेफिकीर त्यांना कुणाचाच नाही धाक सरकारच्या आरोग्य विभागाची अब्रू जळून खाक

भंडारा/क्राईम रिपोर्टर

देशाला स्वातंत्र्य मिळून ७० वर्ष उलटून गेली, तरी आपल्या देशातील आरोग्य सेवेची स्थिती किती भयंकर हे अनेक सरकारी रुग्णालयातील दुरावस्थेमधून बघायला मिळाले आहे. सरकार दरवर्षीच्या अर्थसंकल्पात आरोग्य सेवेसाठी कोट्यवधी रुपयांची तरतूद करते तरी सुद्धा लोकांना चांगली आरोग्य सेवा मिळत नाही. कारण राज्यातील जिल्हा आरोग्य विभागाचे त्यांच्या जिल्ह्यातील रुग्णालयांकडे लक्षच नसल्याने काही रुग्णालये मोडकळीस आलेली आहेत. तर काही ठिकाणची विद्युत यंत्रणा इतकी खराब झालेली आहे कि कधीही हि रुग्णालये मोठ्या आगीच्या भक्षस्थानी पडून तिथले रुग्ण आणि कर्मचारी जाळून खाक होऊ शकतात. पण सरकारने कधीच या रुग्णालयांचे फायर ओडिट केलेले नाही आणि सरकारच्या याच बेफिकिरीमुळे भंडारा येथील शासकीय रुग्णालयात शिशु केअर युनिटला आग लागून त्यात १० नवजात अर्भकांचा तडफडून मृत्यू झाला. या घटनेने संपूर्ण देश हादरला असून राष्ट्रपती पंतप्रधान मुख्यमंत्री आदी सगळ्या बड्या नेत्यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे.



या घटनेनंतर महाराष्ट्र सरकारला जाग आली आणि सरकारने उच्च स्तरीय चौकशीचे आदेश देऊन सर्व रुग्णालयांचे फायर ऑडिट करण्याची घोषणा केलीय. पण हे सगळ जर अगोदरच केल असत तर त्या निष्पाप अर्भकांचा जीव वाचला असता, तशी रुग्णालयात आग लागण्याची हि काही पहिलीच घटना नाही. यापूर्वीही काही रुग्णालये आगीच्या भक्षस्थानी पडून त्यात उपचार घेत असलेल्या रुग्णांचा मृत्यू झाला होता. पण आगीच्या त्या घटनांमधून सरकारने काहीच बोध घेतला नाही आणि उपाययोजनाही केल्या नाहीत. त्यामुळेच भंडारा रुग्णालयात ती भयंकर घटना घडली. आता थातूर मातुर चौकशी करून मृत अर्भकांच्या नातेवाईकांना दोनचार लाख देवून काही घडलेच नाही असे ...पान ६ वर

### सरकारकडून चौकशी समिती स्थापन; कुटुंबियांना पाच लाखांची मदत

भंडारा दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली असून या समितीचा अहवाल आल्यानंतर दोषींवर कारवाया करू. कोणालाही सोडणार नाही असे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी सांगितले. तसेच त्या १० अर्भकांच्या कुटुंबियांना सरकारकडून प्रत्येकी ५ लाखांची मदत दिली जाणार आहे. त्याच बरोबर रुग्णालयांचे फायर ऑडिट आणि स्ट्रक्चरल ऑडिट केले जाणार असल्याचेही टोपे यांनी सांगितले.

## अपघात कि खून केला मुलाचा मृत्यू कसा झाला





भिवंडी/क्राईम रिपोर्टर

कधीकाळी यंत्रमाग नागरी अशी ओळख असलेली भिवंडी आज मात्र परप्रांतीयांच्या लोंढ्यामुळे गुन्हेगारीची नागरी म्हणून ओळखली जात आहे. चोरीपासून खुनापर्यंत वेगवेगळ्या प्रकारच्या गुन्ह्यांनी भिवंडी महाराष्ट्रातील एक संवेदनशील शहर बनले असून या ठिकाणी कधी काय होईल याचा नेम नसल्याने नागरिकही काही प्रमाणात दहशतीच्या छायेखाली वावरताना दिसत आहेत. मात्र या गुन्हेगारीला आळा घालायला भिवंडीतील वेगवेगळ्या पोलीस ठाण्यातील पोलीसही तितकेच सक्षम आहेत. त्यामुळे कुठल्याही गुन्ह्याचा छडा लागायला फार काळ वाट पहावी लागत नाही. काही दिवसांपूवी ब्युटी पार्लर चालवणाऱ्या एका महिलेची हत्या करण्यात आली होती. मात्र भिवंडी पोलिसांनी काही दिवसातच या खुनाचा पर्दाफाश करून आरोपीच्या मुसक्या आवळल्या. आताही भिवंडीत एका सात वर्षांच्या मुलाचा सापळा पाण्याच्या टाकीत सापडल्याने भिवंडीत खळबळ माजली आहे. त्यामुळे हि हत्या कि अपघात याचा आता पोलीस शोध घेत आहेत.

भिवंडीतील भोईवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील समृबग भागात असलेल्या इमारतीच्या बेसमेंटमध्ये असलेल्या पाण्याच्या टाकीत फारुकी अब्दुल आहाद ताजुद्दीन नावाच्या ७ वर्षांच्या मुलाचा सापळा सापडला आहे. सदर मुलगा २४ नोव्हेंबर पासून बेपत्ता होता आणि पोलीस ठाण्यात त्याच्या मिसिंगची फिर्याद नोंद असल्याने पोलीस त्याचा शोध घेत होते. ...पान २ वर

## रंगाचा बेरंग होताच जोडपे चिडले थर्टीफर्स्ट पार्टीत हत्याकांड घडले

मुंबई/राजेंद्र वेदांते



कामातुरांना भाय न लज्जा अशी एक म्हण आहे आणि ती खरीचा आहे. एकदा का एखादे जोडपे रासलीला करण्यात मग्न झाले कि त्यांना कशाचीच शुद्ध नसते. आपण कुठे आहोत? काय करीत आहोत? याचे त्यांना अजिबात भान नसते. मात्र अशावेळी त्यांना कोणी डिस्टर्ब केला कि ते खवळून उठतात आणि रंगाचा भंग करणाऱ्याचा जीव घ्यायला सुद्धा मागे पुढे पाहत नाहीत. मुंबईतील खार येथे थर्टी फर्स्टच्या रात्री गच्चीवरील दारूच्या पार्टीत असेच एक जोडपे दारूच्या नशेत लाजलज्जा सोडून प्रणय करीत होते. पण त्याचवेळी तिथे आलेली एका तरुणीने त्यांना विरोध करताच त्या जोडप्याबरोबर तिचे भांडण झाले आणि मूड ऑफ झालेल्या जोडप्याने त्या तरुणीचा खून केला. या प्रकरणी त्या जोडप्याला पोलिसांनी अटक केली आहे.

संपूर्ण जगाला २०२० हे वर्ष भयंकर चिंतेचे आणि मृत्यूचे तांडव माजणारे गेले. एका एका कुटुंबातील दोन, तीन जन कोरोनाच्या विळख्यात अडकून मृत्यूमुखी पडले होते. हे जगच हादरले होते. असे हे २०२० वर्षाच्या डिसेंबर महिन्याचा अखेरचा दिवस उजाडला होता. यंदा अनेकांनी २०२१ या वर्षाचे जंगी स्वागत करण्याची तयारी सुरू केली होती. ३१डिसेंबरची पार्टीत अगदी धिंगाणा घालण्याचा अनेकांनी आपला 'मास्टर प्लॅन' तयार केला होता. ...पान २ वर

## नियतीची दृष्ट लागली सुखी संसाराला चारित्र्याच्या संशयामुळे पत्नीचा जीव गेला



पोनि पहाड

अकोला/क्राईम रिपोर्टर

संशय खूप वाईट असतो. कारण एकदाका संशयाचे भूत मानेवर बसले कि माणसाचे कशातच लक्ष लागत नाही. अशावेळी त्याला ज्या गोष्टीचा संशय असतो तीच गोष्ट सतत त्याचे मन पोखरू लागते. त्यामुळे सतत त्याच्या मनात तेच विचार येत असतात आणि त्यातूनच त्याच्या मनात सुडाची भावना निर्माण होते. या संशयामुळे अनेकांचे संसार उध्वस्त झालेत, तर काहींना आपला जीव सुद्धा गमवावा लागलाय. अकोला जिल्ह्यातील सुकली गावात राहणाऱ्या एका इसमाने दहा वर्ष पत्नीशी सुखाचा संसार केला. त्यांना दोन मुलेही झाली. पण अचानक त्यांच्या सुखी संसाराला कोणाची तरी दृष्ट लागली आणि तो आपल्या सुंदर पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊ लागला आणि एके दिवशी तिला ठार मारून सरळ पोलिसांच्या समोर हजार झाला.

अकोला जिल्ह्यातील अकोट या तालुक्यात सुकळी नावाचे एक लहानशे गाव आहे. या गावातील जगन्नाथ धुंदे ...पान २ वर

## पिता पुत्राचे नाते रक्तरंजित झाले दारुड्या मुलाला बापानेच ठार केले



मयत रविंद्र

कणकवली/क्राईम रिपोर्टर



आरोपी भिकाजी

कोणत्याही कुटुंबात जर शांतता नसेल तर त्या कुटुंबातील रक्ताच्या नात्यातही दुरावा येतो. खास करून कुटुंबातील एखादा माणूस जर दारुडा असेल तर त्याच्यामुळे कुटुंबात सतत भांडणे होतात. शेजाऱ्या पाजाऱ्यांशी असलेले संबंध बिघडतात. थोडक्यात दारुडा माणूस हा त्या कुटुंबासाठी एक मोठी डोकेदुःखी ठरलेला असतो आणि त्याला समजावून सुद्धा जेंव्हा तो ऐकत नाही आणि त्याचा त्रास दिवसेंदिवस वाढायला लागतो तेंव्हा रक्ताच्या नात्यातलाच कुणीतरी त्याचा जीव घेतो. कणकवली नजीकच्या आयरेवाडीत सुद्धा असेच घडले. दारू पिऊन घरच्यांना शिवीगाळ करणाऱ्या एका दारुड्या मुलाचा त्याच्या बापानेच डोक्यात हातोडा घालून खून केला. या प्रकरणी आरोपी बापाला पोलिसांनी अटक केली आहे.

कणकवली तालुक्यातील कासार्डे जवळील आयरेवाडीत आयरे कुटुंबाची वस्ती आहे. येथे भिकाजी राघो आयर हे ७० वर्षीय वृध्द आपल्या कुटूंबासह राहयला आहेत. त्यांना दोन मुले व तीन विवाहित मुली असा त्यांचा परिवार आहे. त्यांच्या तीनही मुलीची लग्ने झाल्याने त्या आपपल्या सासरी रहायला आहेत. तर एक मुलागा नोकरी निमित्याने परगावी राहत आहे. ...पान २ वर

## दोघांच्या भांडणात विनाकारण फसला मध्यस्थी करणारा जीव गमावून बसला



मयत आकाश

कोल्हापूर/क्राईम रिपोर्टर



शेजाऱ्यांच्या भांडणात जर कुणी मध्यस्थी करायला गेला आणि त्याने एकाची बाजू घेतली कि दुसऱ्याला त्याचा राग येतो आणि तो मध्यस्थी करणाऱ्यावरच डूख धरून बसतो. मध्यस्थी करणाऱ्याला याची कल्पनाही नसल्याने तो बेसावध असतो आणि बेसावध असल्याने कधीतरी त्याच्यावर जीव गमावण्याची पाळी येते. कोल्हापूरच्या क्रांतीसिंघ नाना पाटील नगरात दोन शेजाऱ्यांमध्ये वाद होत आणि त्यांच्यात नेहमीच भांडणे व्हायची. या भांडणात एक कंत्राटदार मध्यस्थी करायला गेला. त्यामुळे दुसऱ्या शेजाऱ्याला राग आला आणि त्याने आपल्या भावांच्या मदतीने मध्यस्थी करणाऱ्यालाच ठार केले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.

कोल्हापूरातील क्रांतीसिंह नाना पाटील नगरातील वासुदेव कॉलनीत दत्तात्रय तम्मा फोंडे हे राहयला आहेत. त्याच्या शेजारीच सुरेश कचरे आणि त्याचे भाऊ राहयला आहेत. फोंडे आणि कचरे याच्यात नेहमी कोणत्या ना कोणत्या कारणातून वाद आणि भांडण होत होते. अगदी किरकोळ कारणातून देखील त्याच्या कुटूंबात भांडणे हे होत होते. याच भागात आकाश वांजोळे हे ही राहत होते. आकाश महानगरपालिकेचे रस्ते तयार करण्याचे कॉन्ट्रक्ट घेत होता. त्यामुळे त्याची बऱ्यापैकी ओळख ही महानगरपालिकेच्या अधिकाऱ्याशी होती. तसा तो सामाजिक कार्यकर्ता म्हणूनही सर्वाना परिचित होता. भागातील कोणाचे ही कसले ही काम तो करीत होता. त्यामुळे दत्तात्रय फोंडे यांनी आकाश वांजोळे याला आपल्यातील व सुरेश कचरे याच्यातील वाद आणि होणाऱ्या भांडणाविषयी सांगितले होते. कचरे हे अगदी कचरा टाकण्यावरून देखील आपल्याबरोबर आणि पत्नीबरोबर भांडण करीत असतात हे सांगून आकाश याला यात मध्यस्थी करण्यास सांगितले होते. आकाश यांने ही सुरेश कचरे यांना भेटून तुम्ही सारखे ...पान २ वर

## अनैतिक संबंधाचा भयंकर शेवट घडला पत्नीच्या याराचा पतीनेच काटा काढला



जळगाव/क्राईम रिपोर्टर

आपल्या पत्नीचे पर पुरुषाबरोबर अनैतिक संबंध आहेत हे कोणत्याही पतीला सहन होणार नाही आणि अनैतिक संबंध सहसा लपून राहत नाहीत. कधीना कधी ते उघडकीस येतात आणि जेंव्हा ते उघडकीस येतात तेंव्हा त्याचा रक्तरंजित शेवट होतो. जळगावच्या वाकोदमध्ये असेच घडले. कपाशीच्या व्यापाऱ्याच्या पत्नीचे जवळच्याच एका गॅरेजवाल्याशी अनैतिक संबंध होते. मात्र याची चाहूल तिच्या पतीला लागताच त्याने आपल्या पत्नीच्या याराला गोड बोलून शेतात नेले आणि आपल्या अन्य नातेवाईकांच्या मदतीने त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे.





जामनेर तालुक्यातील वाकोद या लहानशा गावात ती तरुण विवाहिता रहात होती. तिचा पती रमेश (काल्पनिक नाव) कपाशीचा व्यापारी होता. व्यापाराच्या निमित्ताने ...पान ६ वर

## चोरीच्या गुन्ह्यात ज्यांना अटक झाली त्यांनीच मित्राच्या खुनाची कबुली दिली

गोरेगाव/क्राईम रिपोर्टर

मुजरीम चाहे कितना भी शातीर हो मगर कानून के हाथ बडे लंबे होते है! हा अनेक हिंदी सिनेमातला डायलॉग किती वस्तुनिष्ठ आहे याची अनेक वेळा पोलिसांकडून प्रचीती आलीय. कारण कोणताही पुरावा नसताना सुद्धा पोलिसांनी अनेक गुन्ह्यांचा छडा लावलाय. कारण पोलीस हे आरोपी पेक्षा नेहमीच दोन पावले पुढे असतात आणि आणि छोट्याशा पुराव्या वरून सुद्धा आरोपींच्या मुसक्या आवळतात. म्हणून तर आरे पोलिसांनी चोरी आणि घरफोडीच्या गुन्ह्यात पकडलेल्या दोन गुन्हेगारांची अशी काही चौकशी केली कि त्यांनी केलेल्या एका खुनाची कबुली देऊन टाकली.

मुबारक प्यारे सय्यद आणि बिडी शर्मा अशी या गुन्हेगारांची नाव असून ते ज्या भागात राहतात तिथून जूनमध्ये रवी साबडे नावाचा तरुण बेपत्ता झाला होता. त्याच्या मिसिंगची तक्रार आरे पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आली होती. मात्र तो सापडत नव्हता. याच दरम्यान रवीचा मृतदेह मिठी नदीत सापडला. मात्र त्याला डोके नव्हते, केवळ धड होते. मात्र पोलिसांनी कपड्यावरून ओळख पटवली. तसेच डी एन चाचणी करून तो मृतदेह रवीचाच ...पान ६ वर

## आंतरजातीय विवाह प्राणावर बेतला सासऱ्यानेच निष्पाप सुनेचा जीव घेतला



मुंबई/क्राईम रिपोर्टर

आजकालची तरुण पिढी हि सुशिक्षित आहे. त्यामुळे हि पिढी जातपात मनात नाही. त्यामुळे कॉलेजात किंवा कामाच्या ठिकाणी तरुण तरुणींची ओळख झाली आणि ओळखीचे रुपांतर प्रेमात झाले कि मग कुटुंबाची परवानगी असो अथवा नसो ते लग्न करून मोकळे होतात. मात्र अशा लग्नाला घरच्यांचा तीव्र विरोध असल्याने त्यांच्या मर्जी विरुद्ध लग्न करणाऱ्या आपल्या मुलांचा जीव घ्यायलाही ते मागे पुढे पाहत नाहीत आणि त्यातूनच सैराट सारखी हत्याकांड घडतात. कांदिवलीतील अशाच एका घटनेत मुलाने आंतरजातीय विवाह केला म्हणून त्याच्या बापाने सुनेची निर्घुणपणे हत्या केली आणि तिचा मृतदेह नाल्यात फेकला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी सासऱ्याला अटक केली आहे.

आंतरजातीय विवाह करणे आजच्या पिढीला खूपच महागात पडत आहे. याच विषयावर 'सैराट' चित्रपट देखील आला होता. अंत्यंत ज्वलंत विषय यात मांडला होता. सैराट चित्रपटात आर्जीने आंतरजातीय विवाह केल्यामुळे तिचा भाऊ तिची व तिच्या पतीची हत्या करतो.असा त्या चित्रपटाचा शेवट आहे. यानंतर आंतरजातीय विवाह करणे हे तरूण-तरूणीला खूपच धोकादायक बनले होते. या चित्रपटात दाखलेल्या हत्याकांडाचा समाजमनावर इतका भयंकर आणि घातक परिणाम झाला की, आंतरजातीय विवाह करणार्याचे त्यांच्याच नातलगांनी मुडदे पाडल्याच्या असंख्य घटना समोर आल्या होत्या. मुंबईतील कांदिवली परिसरात अशीच एक धक्कादायक घटना समोर आली आहे. परूंतू या घटनेत विवाहित तरूणीची हत्या तिच्या आई-वडील,भाऊ यांनी केली नसून तिच्या वृद्ध सासर्याने आपल्या दोन साथीदारांच्या मदतीने केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.विवाहित तरूणीचा खूनी सासराच निघाल्याने पोलीसांनी आश्चर्य व्यक्त केले आहे.

११ डिसेंबर २०२० रोजी नंदीता रॉय हि विवाहिता अचानक बेपत्ता झाल्याची तक्रार कांदिवलीच्या समतानगर ...पान ६ वर

## ब्ल्यू फिल्म बघून करीत होता रासलीला गळ्याभोवती फास अडकून जीव गेला

नागपूर/क्राईम रिपोर्टर

कोणत्याही गोष्टीचा अतिरेक माणसासाठी जीवघेणा ठरू शकतो. म्हणून माणसाने प्रत्येक गोष्टीत सावधानता आणि सुरक्षितता बाळगायची असते. पण काही लोक सुखाच्या क्षणी सुद्धा अतिरेक करीत असतात. मात्र असा अतिरेक त्यांच्यासाठी काळ ठरू शकतो. आजकाल अश्लील साहित्य, अश्लील सिनेमा यामुळे लोकांमध्ये काहीशी विकृती निर्माण होत आहे आणि मोबाईलवर अश्लील क्लिप बघण्याचे काही लोकांना व्यसन जडले आहे. पण मोबाईलवर ब्ल्यू फिल्म बघून त्यात जसे दाखवले आहे. तसेच करणे एका अनैतिक संबंधातील जोडप्याला चांगलेच महागात पडले.

प्रियकराचे दोराने हातपाय बांधून त्याच्या गळ्याभोवती रस्सी लावून प्रेयसीने प्रियकराला खुर्चीवर बसवून ती बाथरूममध्ये गेली. पण हा प्रयोग प्रियकराला चांगलाच महागात पडला. कारण तो खुर्चीवरून पडताच गळ्या भोवतालच्या दोरीत त्याच्या गळ्याला फास लागून त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत. नागपूरच्या कापर्खेडा पोलीस ठाण्याच्या ...पान ६ वर

## पान १ वरून....

### अपघात कि खून केला...

मात्र त्याचा मृतदेह सापडला. त्यामुळे हि हत्या आहे कि अपघात याचा आता पोलीस शोध घेत आहे. कारण या पाण्याच्या टाकीला झाकण नव्हते. त्यामुळे तो मुलगा पाय घसरून टाकीत पडला कि त्याचा कुणी खून केला? याचा पोलीस शोध घेत आहेत.

### रंगाचा बेरंग होताच जोडपे चिडले...

त्यासाठी मदीराची ही तयारी पूर्ण करण्यात आली होती. एकीकडे संपूर्ण भारतात नववर्षाचे जल्लोषात स्वागत होत असतानाच दुसरीकडे खळबळजनक घटना घडली होती. मुंबईतील खार परिसरात एक भयंकर अघटीत घटना समोर आली. या घटनेमुळे मुंबई पोलीसांची झोपच उडाली होती. कुठेही अनुचित प्रकार घडू नये म्हणून मुंबई पोलीसांनी चोख बंदोबस्त लावला होता. तरीही खार परिसरात एका तरूण मुलीची अत्यंत निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती.

मुंबईतील खार परिसरात हायप्रोफाईल सोसायटीत एका तरूण मुलीची हत्या करण्यात आली होती. ३१ डिसेंबर संपत असतानाच त्या काळ रात्री खूनाची घटना समोर आली होती. खार पोलीसांचे एक विशेष पथक या हत्येचा तिडा सोडवण्यासाठी कामाला लागले होते. या हत्येमुळे खार सारख्या उच्चभ्रू भागात प्रचंड खळबळ माजली होती. खार परिसरात भगवती हाईट्स नावाची इमारत आहे. या इमारतीच्या गच्चीवर  नववर्षाच्या सेलिब्रेशनसाठी पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. या पार्टीत इमारतीतील काही रहिवाशी, तसेच त्यांचे जवळचे मित्र, नातेवाईक सहभागी झाले होते. या पार्टीत अनेकांनी दारु प्यायली होती. या पार्टीत या इमारतीत लोक नुसता धिंगाणा घालत होते. पूर्व नियोजीत पार्टी असल्याने दारूची तयारी करून ठेवण्यात आली होती.सेलिब्रेशनमध्ये जवळ जवळ सर्वच दारू पिऊन तराट होते. अगदी कोण काय करते कुणालाच याचा पत्ता नव्हता. ते सेलिब्रेशन मध्ये आता रंगत आली होती. तरूण-तरूणी मद्यधुंद अवस्थेत नाचत गात होते. या सेलिब्रेशन मध्ये अश्लीलताने शिरकाव केला होता. बरेच जण बेधुंद होऊन ३१ डिसेंबर साजरा करीत होते.

पार्टी सुरु असताना पिडीत तरूणी गच्चीवर पोहोचली. गच्चीवर नुसता धिंगाणा चालला होता. सर्व जण एकमेकात गुंतले होते. कोण काय करते हे कुणालाच कळत नव्हते. त्यावेळी त्या ठिकाणी एक जोडपे आक्षेपार्ह स्थितीत तिथे बसले होते. त्या जोडप्याने सर्व हद्द पार करीत अश्लीलतेची सीमा मर्यादा ओलंडल्या होत्या. म्हणून पिडीत मुलीने त्या जोडप्याला हटकत त्यांच्या त्या कृत्यावर आक्षेप घेतला. त्यावेळी ते जोडपे दारूच्या नशेत बेधुंद झाले होते. त्या मुलीने अचानक येऊन त्यांना हस्तक्षेप केल्यामुळे ते जोडपे चिडले होते. तेंव्हा या जोडप्याचा आणि त्या मुलीचा वाद सुरु झाला. काही वेळाने हा वाद अगदी विकोपाला पोहोचला. त्यांचे कडाक्याचे भांडण सुरु झाले होते. वादविवाद वाढत गेला. आता प्रसंग हातघाईवर आला होता. तेंव्हा त्या जोडप्याने त्या मुलीला जबर मारहाण केली. दारूच्या नशेत आपण नक्की काय करतो आहे हे त्या जोडप्याला कळले नाही. त्यांनी त्या तरूणीला जबर मारहाण केली होती. या मारहाणी दरम्यान तिला गंभीर दुखापत झाल्याने तिचा मृत्यू झाला. या घटनेची खबर खार पोलीसांना मिळताच खार पोलीसांचा ताफा घटनास्थळी पोहचला. पोलीसांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून पिडित तरूणीला तातडीने रूग्णालयात हलवले. तेंव्हा डॉक्टरांनी तिला तपासून मृत घोषित केले.

यानंतर पोलिसांनी या प्रकरणी मृत मुलीला मारहाण करणाऱ्या त्या जोडप्याला अटक केली. याप्रकरणी दोन्ही आरोपींवर कलम ३०२, ३४ अंतर्गत खूनाचा गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली . तसेच पार्टीत उपस्थित असलेल्यां प्रत्येकाची कसून चौकशी करून अटक आरोपीच्या विरुद्ध काही साक्षीदारांची जबानी घेतली. खारमधील भगवती हाईट्स या इमारतीच्या गच्चीवर ही पार्टी आयोजित करण्यात आली होती. त्यादरम्यान ही घटना घडली. त्यामुळे ३१ डिसेंबरला गच्चीत कोणत्याही प्रकारची पार्टीला पोलीसांची परवानगी नसतानाही पार्टी कशी काय आयोजित केली गेली? कुणी केली? याची कसून चौकशी करून पोलीसांनी याप्रकरणी आयोजकांवरीही गुन्हा दाखल करण्याची तयारी सुरू केली आहे.

### नियतीची दृष्ट लागली सुखी संसाराला...

यांचे काही वर्षापुर्वी निधन झाले असुन त्यांची मुले या ठिकाणी वास्तव्याला आहे. जगन्नाथ धुंदे यांना चार मुले आहेत. यापैकी दोन मुले सुकळी येथे तर दोन मुले बाहेरगावी राहतात. सिद्धार्थ हा त्यांचा मोठा मुलगा असून अकोला जिल्ह्यातील अनकवाडी येथील प्रकाश सुरडकर परिवारातील शीतलसोबत त्याचा विवाह गेल्या दहा वर्षाआधी झाला होता. शितल आणि सिद्धार्थ या दाम्पत्यास दोन मुले आहेत. नवनीत आणि आराध्या अशी त्यांची नावे आहेत. नवनीत नऊ वर्षाची तर आराध्या सात वर्षाची आहे. सिद्धार्थ धुंदे याची जेमतेम आर्थिक परिस्थिती असल्यामुळे मोलमजुरी करुन तो घर संसार चालवतो.

सिद्धार्थची पत्नी शितल दिसायला देखणी होती. त्याचे शितलवर खुप प्रेम होते. तो शितलला नेहमी खुष ठेवण्याचा प्रयत्न करत असे. त्याच्या संसारवेलीवर दोन मुलांचे आगमन झाल्यानंतर त्याच्या संसाराला काय दृष्ट लागली कुणास ठावुक. आपली पत्नी शितल कुणा तरी पर पुरुषावर प्रेम करते असा त्याला संशय येवू लागला. या कारणावरुन दोघा पती पत्नीत नेहमी वाद होवू लागले. काहीही केले तरी सिद्धार्थच्या मनातून पत्नी शितलबद्दल असलेले संशयाचे भुत काही केल्या जात नव्हते.

या संशयाच्या कारणामुळे तो आता अस्वस्थ राहू लागला. त्याला काही सुचत नव्हते. त्याची पत्नी शितल दिसायला देखणी होती. त्याच्या मनातील या संशयाच्या भुताने टोकाचा निर्णय घेण्याचा त्याने कित्येकदा विचार केला. मात्र दोन गोंडस मुलांकडे बघून त्याने आपल्या मनातील रागाला शांत केले. शितलचे कुणावर तरी प्रेम असल्याचा संशयातून दोघा पती पत्नीत नेहमीच वाद होवू लागले. हा वाद आता नित्याचा झाला होता. शीतल आणि सिद्धार्थ यांच्यातील वादाची त्यांच्या कुटूंबाला माहिती होती. पती हा विनाकारण संशय घेतो असा आरोप शितलची माहेरची मंडळी करत होती. या कारणावरुन धुंदे आणि सुरडकर परिवारातील संबंध देखील बिघडले होते. दोघे परिवार समाजात एकमेकांची बदनामी करत होते. शीतल आणि सिद्धार्थ यांचा स्वभाव एकमेकांच्या विरुद्ध झाला होता. कुणीही माघार घेण्यास तयार नव्हते. दि. १० डिसेंबर २०२० रोजी दोघांमध्ये सायंकाळी छोट्याशा कारणावरून वाद झाला. नेहमीप्रमाणे हे भांडण होते. यामुळे हा भांडणातून आपला शेवटचा दिवस असेल असे दोघांनाही वाटले नव्हते. रात्री नऊ ते अकरा वाजेच्या दरम्यान गावातील वातावरण सामसूम झाले होते. मुले घरात झोपलेली होती. यावेळी सिद्धार्थने टोकाचे पाऊल उचलत शीतलवर लोखंडी पाईपने हल्ला केला. त्याच्या मनात तिच्याबद्दल खुप राग निर्माण झाला होता. त्याने तिचा चेहरा विद्रुप करुन टाकला. पाईपाच्या हल्लुया करत त्याने तिचा चेहरा व डोळे खराब केले. एखाद्या सैतानाप्रमाणे त्याने तिच्यावर सपासप वार सुरु केले. तिला बचावाची साधी संधी देखील त्याने दिली नव्हती. काही क्षणात होत्याचे नव्हते झाले होते. काही क्षणातच घरात रक्ताचा सडा पडला. शीतल जागीच मरण पावली याची त्याला खात्री पटली.

या घटनेनंतर सिद्धार्थने थेट अकोट ग्रामीण पोलीस स्टेशन गाठले. अकरा वाजता सिद्धार्थ पोलीस स्टेशनला हजर झाला. त्याच्या अंगावर रक्ताचे डाग उडालेले होते. पोलीस स्टेशनमधे पोलिस निरिक्षक ज्ञानोबा फड हजर होते. सिद्धार्थचा अवतार बघताच त्यांना संशय आला. पोलिसांनी चौकशी करण्याआधीच सिद्धार्थने आपल्या कृत्याची कबुली सर्वासमोर देऊन टाकली. मी माझ्या पत्नीचा खून केला. सिद्धार्थच्या कबुलीजबाबाने पोलीस स्टेशनमधील वातावरण एकदमच बदलून गेले. यानंतर क्षणाचाही. विलंब न लावता पोलिसांची गाडी सुकळी गावाच्या दिशेने निघाली. पोलिस निरिक्षक जानोबा फड, पोलिस उप निरिक्षक धर्माशी डाखोरे, महिला उप निरिक्षक  पाटेखेडे, पोलिस कर्मचारी नंदकिशोर कुलट, रामेश्वर भगत, विजय साबळे यांच्यासह पोलीस ताफा सुकळी गावात दाखल झाला. सिद्धार्थ धुंदे यांच्या घरात शीतल रक्ताच्या थारोळ्यात मृतावस्थेत पडलेली दिसली. पोलीस गावात दाखल होईपर्यंत शेजाऱ्यांना या गोष्टीची भनक लागली होती. पोलीस पोहोचताच गावातील लोकांनी घराजवळ एकच गर्दी केली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा सुरु केला. यानंतर शीतलचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी अकोट उपजिल्हा रुणालयात रवाना केला. यातील मुख्य आरोपी सिद्धार्थ जगन्नाथ धुंदे याने पोलिसांसमोर स्वतःहून आत्मसमर्पण केले होते. याप्रकरणी अकोट ग्रामीण पोलीस स्टेशनला भाग ५ गु.र.न.४७४/२० भा.द.वि. ३०२, १०९ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी मयत विवाहितेचे वडील प्रकाश सुरळकर यांचा जबाब नोंदवून घेतला. त्यांच्या म्हणण्यानुसार धुंदे परिवाराचा शीतलला भयंकर त्रास होता. शीतलचे जेठ विनायक जगन्नाथ धुंदे आणि त्यांचा मुलगा शुभम विनायक धुंदे हेसुद्धा तिला मानसिक त्रास होते. सिद्धार्थला भडकवण्यात या दोघा बाप-लेकाच्या हात होता असे त्यांनी म्हटले. त्यामुळे विनायक व शुभम यांच्याविरुद्ध १०१ (चिथावणी देणे) हे कलम वाढवण्यात आले. सिद्धार्थ धुंदे याला चिथावणी देणे, त्यांच्या मनात राग येईल अशी भावना उत्पन्न करून देणे यामुळे हे हत्याकांड घडले असा निष्कर्ष पोलीस तपासातून समोर आला असल्याचे समजते. शीतलची गावात वागणूक चांगली नव्हती असा सूर सासरच्या मंडळींनी काढला. दोन्ही बाबींची तपासणी केल्यानंतर सिद्धार्थने विनाकारण शीतलची हत्या केली आणि आपल्या दोन लहान मुलांना मातृ छायेपासून हिरावून घेतले. शीतलची हत्या झाल्यामुळे सिद्धार्थ कारागृहात गेला तर त्याची दोन्ही मुले माता पित्याच्या प्रेमाला पारखी झाली आहे.

### पिता पुत्राचे नाते रक्तरंजित झाले...

त्याचा दुसरा मुलगा पाडुरंग उर्फ रविंद्र हा आपल्या पत्नी मुलासह घरातच वेगळे राहत होता. तर भिकाजी आणि त्याची पत्नी हे वेगळे राहत होते. गेल्या काही वर्षापासून पाडुरंगला दारू पिण्याचे व्यसन लागले होते. तो दररोज दारू पिऊन येऊन घरात बायकोबरोबर आणि वडिलांच्या बरोबर भांडण काढत होता. किरकोळ कारणातून तो भांडण उकरून काढत होता. वडिल भिकाजी यांनी त्याला बऱ्याचवेळा दारू पिऊन येऊ नकोस. काही तरी कामधंदा कर. घरात भांडण काढू नकोस असे समजावले होते पण तो कधीच कुणाचे काही ऐकत नव्हता. त्याला दारू पिण्याची इतकी सवय लागलेली होती की तो अलिकडे २४ तास दारूच्या नशेतच राहत होता. त्याच्या घरच्या भांडणाची शेजाऱ्यांना इतकी सवय झाली होती की, ते ही अलकिडे त्याच्या भांडणाकडे दुर्लक्ष करीत होते. त्याचे ही एका अर्थी बरोबर होते. दररोजचे मडे त्या संगे कोण रडे अशी आयरे कुटुंबियाची गत झाली होती. दोघेही बाप लेक एकमेकांच्या अंगावर धावून जात होते. अर्वाच्च भाषेत एकमेकांना शिव्या देत होते. त्याच्या भांडणाला ताळतंत्रच राहिलेला नव्हता.हातात काय सापडेल ते घेऊन एकमेकांच्या अंगावर जात होते. पांडुरंगची बायको ही भांडण सोडवायला गेली की तिला ही तो मारहाण करीत होता. त्याचे भांडण म्हणजे शेजाऱ्याना एक प्रकाराचा तमाशाच वाटत होता. रात्र आणि दिवस ते भांडत होते. पांडुरंगाच्या दारूच्या व्यसनामुळे घराची शांतता भंग झाली होती.कोणत्या ना कोणत्या कारणातून भांडण होत होते. कोणताही कामधंदा नसल्याने पांडुरंग हताश झाला होता. त्यातच तो जवळच्या मित्रामुळे जास्तच दारू पिऊ लागला होता. एकाच घरात ते विभक्त राहत असल्याने ताळमेळ उरलेला नव्हता. त्यातच वयोमान परत्वे भिकाजी यांचा स्वभाव तापट आणि रागीट बनला होता. भांडणात त्याच्या रागाचा पारा जास्तच चढत होता. मुलगा सांगून ही ऐकत नाही ही त्याच्या मनाची खंत होती. त्यांनी त्याला सुधारण्याची संधी ही दिली होती. परंतु तो दिवसे दिवस जास्तच दारू पिऊ लागल्याने त्यांनी त्याचा नाद सोडला होता. परंतु एकाच घरात ते दोघे विभक्त राहत असल्याने पांडुरंग हा दारू पिऊन येऊन त्याच्या पत्नीला मारहाण करीत असल्याने सासरा या नात्याने ते मध्यस्थी करायला जात होते. याचा राग पांडुरंगला येत होता. तो त्याना आमच्या नवरा बायकोच्या भांडणात पडू नका, तुमच्यामुळेच माझी वाट लागली आहे असा दोषारोप तो वडिल भिकाजीवर करीत होता. आता मात्र त्याची हद्द झाली होती. कशाचा तरी कशाला संबंध जोडून तो वडिलांनाच दोषी ठरवर्ता असल्याने ते ही त्याच्यावर चिडून होते.ते त्याला पांडया सरळ वाग. दारू पिऊन येऊन तमाश करू नकोस. घराकडे लक्ष दे. म्हणून सांगत होते. परंतू पांडया काही त्याचे ऐकत नव्हता.त्याला लागलेली  दारूची सवय काही केल्या सुटत नव्हती. रात्री अपरात्री त्यांची भांडणे वाढतच चालली होती. वडिल भिकाजी याचा ही संयम सुटत चालला होता.त्याना ही यातून कसा मार्ग काढायचा हे सुचत नव्हते. ते ही पार हताश झालेले होते. वृध्दापकाळात खरे तर पांडुरंग हा त्याच्या जीवनाची काठी बनून आधार देईल असे त्यांना वाटत होते. परंतु त्याच्या दारूच्या सवयीमुळे तो पूर्णत:बरबाद झाला होता. उलट तेच त्याला आधार देत होते.समजावून सांगत होते. परंतु त्याचे वागणे हे अलिकडे वैफल्यग्रस्तासारखे झाले होते.त्यातूनच तो सकाळी, संध्याकाळ रात्री दारूच्या नशेतच असायचा. घराची अब्रु त्याने काढली होती. त्यामुळे भिकाजी यांनी ही त्यांच्याकडे लक्ष देण्याचे बंद केले होते. परंतु काही झाले तरी तो त्याचा मुलगा होता. त्याला सरळ मार्गाला आणायचे याच विचारात ते होते. परंतु नियतीला हे मान्य नव्हते.

गेल्या सोमवार दि.४ ऑक्टोबर २०२० रोजी पांडुरंग हा आपल्या पत्नी मुलासह सासरवाडी गोवळ-तांबेवाडी येथे गेला होता. मंगळवार सकाळी त्याने पत्नी मुलांना आपल्या कासर्डे -आयरेवाडी येथे जावूया असे म्हणाला परंतु त्याची पत्नी त्याला मी अजून दोन दिवसांनी येते. तुम्ही पुढे जावा असे त्याला म्हणाली, त्यामुळे मंगळवारी संध्याकाळी तो एकटाच आपल्या कासार्डे -आयरेवाडी येथे आला. सकाळ पासूनच तो दारू पिवून होता.रात्री ही त्याने खूप दारू पिल्ली होती.रात्री घरात तो आणि त्याचा बाप भिकाजी हे दोघेच होते. पांडुरंग हा दारू पिऊन येवून घरात बापाला बघून शिवीगाळ करीत होता.त्याच्याबरोबर तो भांडण उकरून काढत होता. त्यावेळी त्याच्या बापाने म्हणजे भिकाजी याने ही दारू ढोसली होती. दोघांचे हमरी तुमरीवर भांडण लागले होते. रात्री ८ वाजता सुरू झालेले त्याचे भांडण रात्री उशिरापर्यत चालूच होते. त्याच्या भांडणाकडे शेजाऱ्यांनी दुर्लक्ष केले होते. किती वेळा ते तरी त्यांना समजावून सांगणार होते. रात्री ११ ते १२च्या दरम्यान भिकाजी हा तसाच आपल्या खोलीत झोपला होता. मात्र पांडुरंग हा त्याला शिव्या देत तसाच बसून होता. त्याला दारूची नशा जास्त झाली होती. मुलगा काही केल्या ऐकेना म्हणून भिकाजीचा ही संयम सुटत चालला होता. ते त्याला तुझे उदया सकाळी बघू तू आता झोप जा. म्हणून सांगत होता. तो ते झोपलेल्या खोलीच्या दरवाज्यावर लाथा मारत होता. तरीही ते शांतच होते.पांडुरंग मात्र यांना शिव्या देत त्याच्या अंगावर त्यांना मारयला जात होता. त्यावेळी रात्रीचे दोन वाजले होते. पहाटेचा दुसरा दिवस उजाडत चालला होता. परंतु त्या बाप लेकाचे भांडण काही मिटत नव्हते. शेजारी त्याचे भांडण ऐकून झोपले होते. दारूच्या नशेत पांडुरंग बेतालपणे अर्वाच्च भाषेत शिव्या देत होता. याचा राग भिकाजीला आला होता. पांडुरंग दारूच्या नशेत जास्तच बरळत होता. याचा राग भिकाजीला आला होता. त्याचा ही संयम सुटत चालला होता. समजावून सांगूनही तो काही ऐकत नव्हता. म्हणून त्यांनी रागाच्या भरात त्याला लाकडी दांडक्याने मारहाण करत खाली पाडले.तो जास्तच आरडा ओरडा करत होता.तो ही परत त्यांच्याच अंगावर मारायला जात होता.त्यावेळी रागाच्या भरात असलेल्या भिकाजी याने जवळच पडलेला हातोडा घेतला आणि त्याच्या डोक्यात जोरात हाणाला,त्यासरशी त्यांच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला.तरीही ते शांत होत नव्हते.त्यांनी रागाच्या भरात धारदार चाकू घेऊन त्याच्या मानेवर सपासप वार करीत त्याच्या मानेला भोक पाडले होते.या मारहाणीत पांडुरंग हा जागीच गतप्राण झाला होता.त्यावेळीच त्याचा राग शांत झाला होता.त्यानंतर ते जावून आपल्या खोलीत शांतपणे झोपले होते.त्याना आता पश्यातापा होत होता.पण त्याचा काही इलाज नव्हता.

दुसऱ्या दिवशी दुपारपर्यत ते तसेच झोपले होते. त्यांनी सकाळी शेजारील लोकांना बोलावून सांगितले की त्याचा मुलगा पांडुरंग हा दारूच्या नशेत रात्री तसाच येऊन झोपला होता. आणि मी सकाळी उठून बघतो तर त्याने आत्महत्या केली आहे.या घटनेची लगेच गावात चर्चा सुरू झाल्याने पोलीस पाटील महेंद्र देवरूखकर हे ही घटनास्थळी आले.खूनाचा हा प्रकार त्याच्या लक्षात आल्याने त्यांनी या घटनेची माहिती लगेचच कणकवली पोलीस स्टेशनला कळवली होती. खूनाची घटना समजल्याने प्रभारी डीवायएपी डॉ.रोहिणी सोळंकी, स.पो.नी. चंद्रकांत लाड यांनी घटनास्थळी भेट देवून घटनेची माहिती घेतली होती. त्यांनी पोलीसांना तपासाच्या योग्य त्या सुचना देवून मार्गदर्शन केले. घटनास्थळी फॉरेन्सिक लॅबची टीम आणि श्वान पथक ही दाखल झाले होते. घटनास्थळी रक्ताने माखलेला चाकू,हातोडा आणि लाकडी दांडका पडला होता. पोलीसांनी घटनेचा आणि घटनास्थळाचा पंचनामा करून संशयीत आरोपी भिकाजी आयरे यांना ताब्यात घेतले होते. पोलीसांनी या घटनेची माहिती मयत पांडुरंग याची पत्नी रेश्मा आयरे हिला दिली होती.पोलीसांनी मयताचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी  कणकवली सरकारी रूग्णालयात पाठवून दिला होता.

या घटनेची लेखी फिर्याद मयत पांडुरंग आयरे याची पत्नी रेश्मा आयरे हिने कणकवली पोलीसात दिली. तिच्या फिर्यादीवरून पोलीसांनी पांडुरंग उर्फ रविंद्र भिकाजी आयरे (वय ३८) याच्या खून प्रकरणी त्याचे वडिल भिकाजी राघो आयरे (वय ७१) याच्या विरोधात कणकवली पोलीसात भा.दं.वी.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्यांना मा.कोर्टासमोर उभे केले असता.मा.कोर्टाने त्यांना चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्यांच्याकडून गुन्हयात वापरलेला चाकू,हातोडा, आणि लाकडी दांडके जप्त केले होते. या घटनेचा तपास कणकवलीचे पोलीस निरिक्षक संजय धुमाळ, स.पो.नी.सागर खंडागळे, स.पो.उप.निरी.बापू खरात यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नाईक सचिन माने,नितीन खाडवे यांनी केला. दारूची नशा करी जीवनाची दुर्दशा असे म्हटले जाते ते बरोबरच आहे. परंतु असे असूनही दारूच्या व्यसनाला जवळ करणारे अनेकजण आहेत. त्यातून किरकोळ बाचाबाची होते. आणि त्याचे पर्यावसन एकाद्याच्या खूनात होते. हेच या घटनेवरून दिसून येते.अशीच गत पांडुरंग आणि त्याचा बाप भिकाजी याची झाली होती. भिकाजी याची गत तर राग आणि भिक माग अशीच झाल्याने त्याच्या हातून दारूडया मुलाचा खून झाला. या घटनेचा पुढील तपास कणकवली पोलीस स्टेशनचे पोलीस करत आहेत.

### दोघांच्या भांडणात विनाकारण फसला...

दत्तात्रय फोंडे याच्याशी वाद घालून भांडण काढीत जावून नका. त्यांना व त्याच्या कुंटूंबाला विनाकारण त्रास देवू नका असे सांगितले होते. त्यावेळी सुरेश कचरे, त्याचे भाऊ मारूती कचरे, आणि भरत कचरे यांनी आकाश याला तू आमच्या भांडणात मध्यस्थी करणारा कोण? आणि तुला कुणी आमच्यात मध्यस्थी करायला सांगितले आहे असे उलटजबानी विचारले होते. त्यावेळी आकाश याने त्यांना मला तुमच्या भांडणात मध्यस्थी करायची नाही, परंतू फोंडे याच्यासारख्या सरळ साध्या माणसाला तुम्ही त्रास देवू नका असे सांगून हे भांडण मिटवून घ्या अशी विंनती केली. त्यावेळी कचरे बंधूनी त्याची विंनती फेटाळून लावली होती. उलट तु ज्याचे ऐकून तू मध्यस्थी करायला आला आहेस त्यालाच समगावून सांग, आमच्याशी पंगा घेवू नकोस. नाही तरी महागात पडेल अशी गर्भीत धमकी दिली.

त्यावेळी आकाश याने त्याचे म्हणणे ऐकू न घेऊन दत्तात्रय फोंडे यांना तशी कल्पना दिली होती. त्यानंतर फोंडे ही गप्प बसले होते. वासुदेव कॉलनीत फोडे आणि कचरे जेथे राहत होते. तेथून एक समाईक गटार जात होती. त्या गटारीत त्या भागातील लोक कचरा टाकत होते. तसे तरी ती गटार महानगरपालिकेचे कर्मचारी वेळेच्या वेळी साफ ही करत होते. परंतू काही लोक मुद्दामच त्या गटारीत ओला कचरा टाकत असल्याने त्याची दुर्गंधी येत होत होती. वरच्या आळीपासून खालच्या आळीपर्यत हा कचरा सगळा फोंडे याच्या घराशेजारील गटारीत येवून थांबत होता. त्यामुळे ते जास्तच त्रस्त होते. त्यातच कचरे हे त्या गटारीत मटण, चिकन आणि मांस ही टाकत होते. त्यातून कचरे आणि फोंडे याच्यात सारखा वाद हा चालू असायचा. हा वाद इतका विकोपाला गेला की त्या दोघांत बऱ्याच वेळेला मारामारी आणि भांडणे ही झाली होती. काही केल्या त्याचा वाद हा मिटायला तयार नव्हता.कचरे याच्यामते आम्ही आमचा ओला कचरा सार्वजनिक गटारीत टाकतो त्यामुळे त्याचा त्रास इतरांना होण्याचा काहींच प्रश्न नाही. परंतु याचा खरा त्रास हा फोंडे यांना होत होता. कारणा फोंडे हा आध्यात्मिक कुंटूंबातील होते. त्यांना मासं वैगरे वर्ज्य होते. ते त्यांना तसे स्वच्छतेच्या दृष्टीने ही सांगत होते. परंतु ते सांगून ही ऐकत नव्हते. याचा राग फोंडे यांना येत होता.

फोडे आणि कचरे कुटूंबातील वाद हा वारंवार होत होता. आणि तो विकोपाला ही गेला होता. त्यामुळे कचरे  आणि फोंडे याच्यातून आता विस्तव ही जात नव्हता. शेजार चांगला असला की सगळे काही चांगले होते. पण शेजारच जर त्रास देणारा असेल तर त्याचा विपरीत परिणाम होत असतो. अडीअडचणीच्या वेळी पै पाहुणे याच्यापेक्षा शेजारचे लोक धावून येत असतात. म्हणून अनेकजण शेजार धर्म सांभाळत असतात. तर बऱ्याचवेळे सख्ये शेजारी याच्यात वैर वाद निर्माण होत असते.खरे तर ते शेजारी असतात. त्यांच्यात ना कोणते भाऊबंदाचे नाते अगर पै-पाहूणांचे नाते संबंध असतात.. तरीही ते पक्के वैरी असल्यासारखे वागत असतात. त्यामुळे त्याच्यातील भांडण हे किरकोळ कारणातून वाढतच जात असतात. अगदी एकमेकाच्या अंगणातील कचरा टाकण्यावरून हा वाद होत असतो. अगदी असाच वाद फोंडे आणि कचरे कुंटूंबात होत होता. कचरे हे मुद्दामच गटारीत आणि अंगणात कचरा टाकत होते. त्यामुळे फोंडे. हे चिडूनच होते.

बुधवार दि.६ जानेवारी रात्री ८ च्या दरम्यान कचरे कुंटूबातील महिलांनी आपल्या घरातील ओला कचरा ज्यामध्ये मटण, मांस वैगरे होते. तो कचरा त्यांनी आपल्या घरासमोरील गटारीत टाकला होता. तो पाण्यातून येवून फोंडे यांच्या घराजवळ थांबला. ही गोष्ट ज्यावेळी दत्तात्रय फोंडे याच्याही गोष्ट लक्षात आली त्यावेळी त्यांनी याचा जाब विचारायला कचरे यांच्याकडे गेले होते. त्यावेळी मारूती कचरे हे दत्तात्रयच्या अंगावर जात तु रे आम्हाला कोण विचारणार असे म्हणत त्याची गळफाट धरली होती. त्यावेळी दत्तात्रयच्या घरातील बायको आणि मुले ही कचरे यांच्याबरोबर भांडयला आल्याचे बघून मारूती कचरे यांचे दोघे भाऊ सुरेश कचरे आणि मरत कचरे हे ही मारूतीच्या बाजून भांडयला आले. दोन्ही कुंटूबातील सदस्य एकमेकांना शिवीगाळ करीत एकमेकांच्या अंगावर जात होते. त्याच्या गोंधळाने कॉलनीत गर्दी ही झाली होती. त्यातच दत्तात्रय यांना मारहाण होत असताना त्यांनी आकाश वांजोळे याला फोन लावून बोलावून घेतले.

आकाश ही त्यावेळी आपल्या दोन मित्रासह लगेच त्या भांडणात मध्यस्थी करायला आला होता. हे बघून कचरे बंधुची सटकलीच होती. वादाला वाद वाढत चालला असताना दत्तात्रय याचेवर मारूती कचरे यांनी आपल्याकडील कोयत्याने वार करत असताना आकाश याने दत्तात्रयला बाजूला ढकलून दिले. त्यावेळी मारूती कचरे, सुरेश कचरे आणि भरत कचरे याना दमदाटी करत याचे परिणाम वाईट होतील अशी गर्भीत इशार दिला. त्यावेळी चिडून कचरे यांनी तू रे कोण आम्हाला सांगणार, आला मोठा भांडणात मध्यस्थी करायला म्हणून आपल्याकडील कोयत्याने आकाशवर हल्ला केला.त्या कोयत्याचा वार आकााच्या मानेवर, बसल्याने तो जागेलाच बेशुध्द होऊन पडला. तसाच वार त्यांनी कोयत्यांनी दत्तात्रय फोंडे याच्यावरही केला.त्यातून ते कसेबसे निसटले.तरीही त्यांना मोठी गंभीर दुखापत ही झालीच. तर आकाशच्या मानेदून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाल्याने त्याला व दत्तात्रयला सीपीआर दवाखान्यात नेण्याचा प्रयत्न कॉलनीतील लोकांनी केला. घटनास्थळी कॉलनीतील लोकांची पळापळी चालली होती. कचरे बंधुच्या हल्लयात गंभीर जखमी झालेल्या दत्तात्रय फोंडे आणि आकाश वंजोळे यांना उपचारासाठी नेण्यासाठी नेमके त्यावेळी ॲम्बुलयन्स ही मिळत नव्हती. म्हणून त्याना तातडीने उपचार मिळावेत म्हणून नागरिकांनी त्या दोघांना एका टेंम्पोंत घालून सीपीआरमध्ये नेले होते. तेथील उपचाराआधीच आकाश वाजोंळीचा मृत्यू झाला. तर गंभीर रित्या जखमी झालेल्या दत्तात्रय फोंडे याच्यावर उपचार सुरू होते.

या घटनेची माहिती करवीर पोलीसांना मिळाल्यावर पो.निरी .संदीप कोळेकर हे आपल्या सहकाऱ्यासह घटनास्थळी दाखल झाले होते. क्रांतीसिंह नानापाटील नगरातील वासुदेव कॉलनीत कमालीचे वातावरण तंग बनले होते. या घटनेत आकाश वांजोळे याचा मृत्यू झाल्याने त्यांच्या कुंटूंबियावर दुःखाची छाया पसरली होती.विनाकारण त्याचा या भांडणात मृत्यु झाला होता. नुकतेच त्याचे वडिल हे बीएसएनमधून निवृत्त झाले होते. अजून आकाश याचे लग्न ही व्हायचे होते. त्याच्या मागे त्याची आई वडिल. आणि बहिण असा परिवार होता. त्याची जबाबदारी ही त्याच्यावरच होती. तो महानगरपालिकेमार्फत रस्त्याचे कॉन्ट्रक्ट घेत असल्याने त्याच्या जीवनाची नुकतीच घडी बसत होती. पोलीसांनी घटनास्थळी धाव घेऊन घटनेची माहिती घेऊन घटनेचा पंचनामा केला. तर सीपीआरमध्ये उपचार घेत असलेल्या दत्तात्रय फोंडे यांने या घटनेची फिर्याद करवीर पोलीस स्टेशनला देऊन मारूती कचरे, सुरेश कचरे आणि भरत कचरे याच्याविषयी तक्रार दाखल केली. त्याच्या तक्रारवरून पोलीसांनी या घटनेतील मारूती कचरे, सुरेश कचरे आणि भरत कचरे या तिघा भावाना अटक करून त्यांना ताब्यात घेतले होते. त्याच्या विरोधात आकाश आनंदराव वांजोळे (वय२८) रा. क्रांतीसिंह नाना पाटील नगर  वासुदेव कॉलनी याच्या खून प्रकरणी  मारूती कचरे, सुरेश कचरे आणि भरत कचरे रा.तिघे ही क्रांतीसिंह नानापाटील नगर वासुदेव कॉलनी याचे विरोधात भादंवी कलम ३०२ आणि इतर कलमाप्रमाणे गुन्हा दाखल केला. पोलिसांनी त्याच्याकडे या गुन्हयाची चौकशी केली असता त्यांनी आपला गुन्हा कबुल करून तो आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. पोलीसांनी त्या तिघांना कोल्हापूर येथील मा.कोर्टाससमोर उभे केले असता. मा. कोर्टाने त्याना चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला कोयता जप्त केला होता. या घटनेनंतर करवीर पोलीसांनी क्रांतीसिंह नानापाटील नगरातील वासुदेव कॉलनीत दक्षता म्हणून चोख बंदोबस्त लावलेला होता. या घटनेचा पुढील तपास करवीर पोलीस स्टेशनचे पो.निरी.संदीप कोळेकर याच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करत आहेत. किरकोळ कारण असताना फक्त खून्नस म्हणून ही खूनाची घटना घडली. त्यात विनाकारण मध्यस्थी करणाऱ्या आकाश वाजोंळीचा बळी गेला होता. म्हणून हल्ली कधीच कोणाच्या भांडणात विनाकारण मध्यस्थी करू नये नाही तर अशा घटनेत ते मध्यस्थी करणाऱ्याच्या जीवावरच ते बेतत असते हेच या घटनेवरून दिसून येते.

11 JAN TO 17 JAN 2021 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 09/01/2021 8:34 PM Page 1



## थोडक्यात वृत्तांत

### पोलीस शिपाई भरती २०१९ करीता एसईबीसी उमेदवारांना दिलासा -गृहमंत्री

मुंबई : राज्यात पोलीस भरती २०१९ करीता एसईबीसीच्या ज्या उमेदवारांनी आपले अर्ज दाखल केले आहे, त्यांना मोठा दिलासा देण्यात येत असून गृह विभागाकडून दि. ४ जानेवारी २०२१ रोजी निर्गमित केलेला शासन निर्णय रद्द करण्यात येत आहे, अशी माहिती गृहमंत्री अनिल देशमुख यांनी दिली. पोलीस शिपाई भरती २०१९ करीता ज्या एसईबीसी उमेदवारांनी अर्ज केले होते, त्यांना शासनाच्या सा.प्र.वि. कडील दि. २३ डिसेंबर २०२० च्या शासन निर्णयाचा लाभ देण्याच्या दृष्टीकोनातून सुधारित शासन निर्णय गृह विभागाकडून लवकरच निर्गमित करण्यात येणार आहे, असेही त्यांनी म्हटले आहे.

### प्रशांत मुगळे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

लातूर : येथील श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थेच्या वतीने देण्यात येणारा मानाचा कै.भास्करराव जोशी आदर्श शिक्षक पुरस्कार श्री मारवाडी राजस्थान विद्यालयातील श्री प्रशांत मुगळे यांना प्रदान करण्यात आला. श्री मारवाडी शिक्षण संस्थेचा ८१ वा वर्धापन दिन नुकताच पार पडला यामध्ये संस्थेच्या सर्व माध्यमिक व प्राथमिक शाळा मधून हा पुरस्कार दिला जातो, डॉ.मोरे यांच्या हस्ते प्रशांत मुगळे यांच्या कार्या बद्दल त्यांचा गौरव करण्यात आला. प्रशांत मुगळे यांनी विविध राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय इंग्रजी परिषदांमध्ये लातूर चे प्रतिनिधित्व केले असून अनेक अंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सादरीकरण ही केले आहे त्यांच्या या यशा बदल त्यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

### ऑनलाईन पोस्ट ऑफिस कार्यालयाचे उद्घाटन

अहमदपूर : येथील पोस्ट ऑफिस कार्यालयाचे ऑनलाईन सुरुवात झाल्यामुळे ४ ते १४ जानेवारी पर्यंत बचत आठवडा म्हणून साजरा करण्यात येत आहे. विशेष डाक मेळावा घेण्यात आला. या मेळाव्यात बचतीचे महत्त्व या विषयाची माहिती मोहीब कादरी यांनी दिली. त्याची सुरुवात येथील पोस्ट ऑफिस कार्यालय पासून करण्यात आली. अनेक वर्षापासून काही तांत्रिक अडचणीमुळे ऑनलाइन झाले नव्हते अनेक नागरिकांची गैरसोय होत होती. आता ही प्रतीक्षा संपली असून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून बचतीच्या खात्यावर अनेक योजनेच्या माध्यमातून नागरिकांना लाभ घरी बसून घेता येईल हे कार्यालय ऑनलाइन सुरुवात झाल्यामुळे आता नागरिकांची मोठ्या प्रमाणात सोय झालेली आहे. या कार्यालयाचे उद्धाटन प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रभारी पोस्टमास्टर संजय कुरूळेकर तर प्रमुख पाहुणे म्हणून मोहीब कादरी विकास अधिकारी उद्धव इप्पर, डॉ चंद्रकात उगीले, मोहसीन बायजीत, ॲड सपना गायकवाड, सुरेश डबीर, आशोक लाडगे या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मेघराज गायकवाड यांनी तर आभार नील मोडदरे यांनी मानले. यावेळी कार्यालयी कर्मचारी महेश पाटील, कृष्णा ढोबळे, डी.जे.वाघमारे, अश्विनी वाघमारे, रानबा बनसोडे, माणिक वाघ, देविदास रेकडवाड, गुट्टे आत्माराम, पांडूरंग कदम, माने, अजित माहके इत्यादी उपस्थित होते.

### धनादेश न वटल्याप्रकरणाचा २२ वर्षानंतर निकाल

लातूर : लातूर जिल्हा मध्यवर्ती बॅंकेच्या नळेगाव शाखा येथील धनादेश न वटल्याप्रकरणी लातूरच्या कनिष्ठ न्यायालय क्रंमाक ६ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यु.के.गंगणे मॅडम यांच्या न्यायालयात आरोपी शंकर रामा चव्हाण (मु.पो.समसापूर,ता.रेणापूर) यांना ३० हजार रूपये दंड दीड वर्षाची शिक्षा ठोठावला आहे. या घटनेची हकीकत अशी की, शंकर राम चव्हाण यांनी १९९७ मध्ये महेबुब पटेल रा. चिंचोलीराव वाडी लातूर यांच्याकडून १५,००० रूपये तीन महिन्यांनी परत करतो म्हणुन हात उसने घेतले होते. त्या बदल्यात त्यांनी पुढील तारखेचा धनादेश फिर्यादी महेबुब फतेखॉ पटेल यांना दिला होता. बॅंकेत धनादेश वटवण्यास पाठवल्यानंतर तो धनादेश न वटल्याने परत आला. त्यामुळे फिर्यादी महेबुब पटेल यांनी न्यायालयात कलम १३८ प्रमाणे १९९९ मध्ये दावा दाखल केला होता. सन २००२ पर्यत हे प्रकरण न्यायालयात प्रविष्ठ होते. परंतु आरोपीचा आकरा वर्ष ठावठिकाणा नसल्याने ती फाईल डोअरमेंट मध्ये गेली होती.आरोपीच्या नावे वारंट निघाले होते. सन २०२० मध्ये आरोपीस पोलीसांनी न्यायालयात हजर केले. त्यानंतर या प्रकरणाला गती मिळाली. लातूर प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी क्रंमाक ६ यांनी आरोपीस धनादेश न वटल्याप्रकरणी एससीसी क्रं. १०१/१९९८ मध्ये दिड वर्षाची शिक्षा व धनादेशाच्या रक्कमेच्या दुप्पट रक्कम रूपये ३०,००० दंड आकारण्याची शिक्षा ठोठावली. या खटल्याचे कामकाज फिर्यादीच्या वतीने ॲड.लालासाहेब दरेकर ॲड.शाहरूख खालेक पटेल यांनी पाहीले.

### बालकांदबरी प्रकाशन सोहळ्याचे आयोजन

लातूर : येथील ज्येष्ठ कवियत्री व लेखिका सौ.वृषाली विक्रमराव पाटील यांच्या अंधारातील डोळे आणि पक्षी गेले कुठे या दोन बाल कांदबरीचा प्रकाशन सोहळा आयोजित केला आहे. सोमवार दिनांक ११ जानेवारी २०२१ रोजी सांयकाळी ठिक ५.०० वाजता भालचंद्र ब्लड बॅंकेच्या सभागृहात हा प्रकाशन सोहळा संपन्न होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.सुर्यनारायण रणसुभे (ज्येष्ठ साहित्यिक) प्रमुख वक्ते डॉ.राजशेखर सोलापूरे, प्रमुख पाहुणे म्हणुन डॉ.जयद्रथ जाधव (मसाप अध्यक्ष), सुनिताताई आरळीकर (लेखिका, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या) उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन कवियत्री नयन राजमाने हया करणार आहेत. तरी या प्रकाशन सोहळयास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजक संजय जमदाडे, प्रकाश घादगिने, सुरेश गीर, शैलजा कारंडे, विजया भणगे, शिला कुलकर्णी, सविता धर्माधिकारी, प्रा.राजकुमार बिरादार यांनी केले आहे.

### पाच दिवसीय मधुमक्षिका पालन प्रशिक्षण

लातूर : जिल्हयातील सर्व इच्छुक शेतकरी व कर्मचारी यांकरीता पाच दिवसीय मधुमक्षिका पालन प्रशिक्षण Central Bee Research and Training Institute (CBRTI) मार्फत Khadi Village and Industrial Commission लातूर रोड,चाकूर येथे दि. १८ जानेवारी २०२१ पर्यंत आयोजित करण्यात येणार आहे. यामध्ये नाव नोंदविण्यासाठी, फिससाठी तसेच इतर अधिक माहितीसाठी दिनकर पाटील मो. ९६३७१३५२८४ यांच्याशी संपर्क करावा असे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, लातूर यांनी पत्रकाव्दारे कळविले आहे.

कोविड-१९ प्रतिबंधासाठी लसीकरण मोहीम

# जिल्ह्यात पाच ठिकाणी होणारी ड्राय रन यशस्वी करण्यासाठी आरोग्य यंत्रणेने दक्षता घ्यावी-जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी.

**लातूर/करकरे अंबादास**

लातूर, संपूर्ण राज्यात फ्रन्टलाइन वर्कर साठी पहिल्या टप्प्यात कोविड-१९ प्रतिबंधासाठी लसीकरण मोहीम राबवली जात आहे. त्या अनुषंगाने लातूर जिल्ह्यात आज पावेतो १७ हजार ५०० आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या डॉक्टर, नर्सेस व इतर कर्मचाऱ्यांची नोंदणी झालेली आहे. या लसीकरणासाठी पूर्वतयारी म्हणून लातूर जिल्ह्यातील पाच ठिकाणी दिनांक ०८ जानेवारी २०२१ रोजी सकाळी ०८ ते दुपारी ०२ वाजता या कालावधीत ड्राय रन घेतली जाणार असून ही ड्राय रन यशस्वी करण्यासाठी आरोग्य यंत्रणेने दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी. यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित र्लेीळव-१९ प्रतिबंधासाठी लसीकरण मोहिमेच्या अनुषंगाने पूर्वतयारी आढावा बैठकीत जिल्हाधिकारी पृथ्वीराज बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी विजयकुमार ढगे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉक्टर लक्ष्मण देशमुख, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर




गंगाधर परगे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉक्टर हरिदास यांच्यासह आरोग्य विभागातील अन्य अधिकारी उपस्थित होते. जिल्ह्यात ज्या ठिकाणी ड्राय रन होणार आहे त्याठिकाणी आरोग्य यंत्रणेने योग्य ती दक्षता घ्यावी व नियोजित वेळेत कोरोना प्रतिबंध साठी आयोजित लसिकरण ऑनलाइन द्वारे नोंदणी झालेल्या काही लोकांना ड्राय रन मध्ये समावेश करून घ्यावा व ही ड्राय रन यशस्वी करावी असे जिल्हाधिकारी पृथ्वीराज यांनी सूचित केले. विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय विज्ञान संस्थेत आयोजित ड्राय रन ची पाहणी करण्यासाठी येणार असल्याचे त्यांनी सांगितले. प्रारंभी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.गंगाधर परगे व निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. हरिदास यांनी दिनांक ०८ जानेवारी २०२१ रोजी ड्राय रन च्या अनुषंगाने लातूर जिल्ह्यात विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय विज्ञान संस्था, उपजिल्हा रुग्णालय उदगीर, प्राथमिक आरोग्य केंद्र भातागळी, ग्रामीण रुग्णालय मुरुड व शहरी आरोग्य केंद्र मंठाळे नगर ही पाच ठिकाण निश्चित केली असून सकाळी आठ ते दुपारी दोन या कालावधीत ड्राय रन आयोजित केलेला आहे, अशी माहिती दिली. या पाच केंद्रावर नोंदणी केलेल्या आरोग्य सेवेतील अधिकारी कर्मचाऱ्यांपैकी प्रत्येकी २५ लोकांना बोलावून घेऊन लसीकरणाच्या अनुषंगाने रंगीत तालीम केली जाणार आहे असे त्यांनी सांगितले. आरोग्य क्षेत्रात काम करणारे डॉक्टर, नर्सेस व इतर फ्रन्टलाइन आरोग्य कर्मचारी सुमारे १७ हजार ५०० जणांची नोंदणी ऑनलाइन द्वारे झालेली आहे. या ड्राय रन द्वारे कोरोना प्रतिबंधासाठी राबविण्यात येणाऱ्या लसीकरण मोहिमेची रंगीत तालीम होणार असून ऑनलाइन नोंदणीसाठी को-इन हे सॉफ्टवेअर वापरण्यात आले असून याद्वारे या सर्व कार्यप्रणाली ची माहिती घेतली जाणार असून प्रत्यक्ष लसीकरण मोहीम राबवताना कोणतीही अडचण येणार नाही याबाबत दक्षता घेतली जाणार असल्याची माहिती डॉक्टर हरिदास यांनी दिली.

## जळगाव येथील भवरलाल अँण्ड कांताबाई जैन फाउंडेशनच्या संघाची राष्ट्रीय स्तरावर निवड



**जळगाव/प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्यावतीने जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय मुंबई मार्फत दिनांक ०३/०१/२०२१ रोजी दुपारी ४ वाजेपासुन ऑनलाईन पद्धतीने राज्यस्तरीय युवा महोत्सवाचे २०२०चे आयोजन करण्यात आले होते. त्यात भवरलाल अँड कांताबाई जैन फाऊंडेशनतर्फे लोकनृत्य सादर करण्यात आले. महाराष्ट्रातून मुंबई, नाशिक, औरंगाबाद, नागपुर, अमरावती, लातुर, पुणे, कोल्हापुर या ८ विभागांनी स्पर्धेत सहभाग नोंदविला होता. त्यात भवरलाल अँड कांताबाई जैन फाऊंडेशनला राज्यातून प्रथम क्रमांक मिळाला. हा संघ पुढच्या फेरीसाठी दि.१२/०१/२०२१ रोजी होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेकरिता निवडला गेला. या संघातर्फे लोकनृत्य प्रकार करण्यात आला होता. यासोबतच एकपात्री, शास्त्रीय गायन, शास्त्रीय वादन, कथ्थक, बासरी वादन आणि वक्तृत्व आदी स्पर्धाही होत्या. लोकनृत्य प्रकारातील स्पर्धेत जैन फाऊंडेशनच्या सहभागी स्पर्धकांनी प्रतिनिधीत्व केले. सहभागी कलावंत अजय गोसावी, रितीक पाटील, निर्मल राजपुत, हेमंत माळी, योगेंद्र बीसेन, सुमीत भोये, रोहन चव्हाण, मंगेश चौधरी, मोईन शेख आदी कलावंत स्पर्धकांचे भवरलाल अँड कांताई जैन फाऊंडेशनचे विश्वस्त तथा जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोकभाऊ जैन यांनी अभिनंदन केले आहे. स्पर्धेसाठी रुपाली वाघ यांनी समन्वय साधला तर त्यांना कला शिक्षक ज्ञानेश्वर सोनवणे व निलेश बारी यांनी सहकार्य केले.

## रावेर दंगलीतील चौघांना एमपीडीए क्लिन चिट

**जळगाव/प्रतिनिधी**



रावेर येथील मकबूल शेख, कालू शेख,आदिल खान व मधु पैलवान यांच्या विरुद्ध जिल्हाधीकारी जळगाव यांनी केलेली एमपीडीए ची कारवाई औरंगाबाद उच्च न्यायालयाने रद्दबातल केली आहे. रावेर दंगलीतील पाच संशयिताविरुद्ध महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधीद्रव्य विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, वाळू तस्कर आणि अत्यावश्यक वस्तूचा काळाबाजार करणे अशा विधातक कृत्यांना आळा घालण्याबाबतच्या अधिनियम सन १९८१ सुधारणा अधिनियम २०१५ चे कलम ३(२) नुसार जिल्हाधिकारी डॉ. अभिजीत राऊत यांनी स्थानबद्ध करण्याच्या कारवाईचे दिले होते. शेख मकबूल अहमद मोहिनुद्दीन, शेख कालु शेख नूरा, आदिल खान ऊर्फ राजू बशीर खान, मधुकर उर्फ मधु पैलवान व एका जण अशा पाच व्यक्तींविरुद्ध हे एका वर्षासाठी स्थानबद्धतेचे आदेश होते. या पाचही जणांना १९ सप्टेबर २०२० रोजी पारित केलेल्या आदेशानुसार नाशिक मध्यवर्ती कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले होते. शेख मकबूल अहमद मोहिनुद्दीन, शेख कालु शेख नूरा, आदिल खान ऊर्फ राजू बशीर खान, मधुकर उर्फ मधु पैलवान या चौघा जणांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली होती. ४ जानेवारी २०२१ रोजी न्या. टी. व्ही. नलावडे व न्या. एम. जी. शेवलीकर यांच्या खंडपीठासमोर हे प्रकरण आले होते. चोघा संशयीतांच्या वतीने औरंगाबाद येथील ॲड. जयदीप चटर्जी यांनी तर सरकारतर्फे सरकारी वकील एम. एम. नेरलीकर यांनी बाजु मांडली. ॲड. चटर्जी यांना रावेर येथील ॲड. शिंदे यांनी सहकार्य केले. रावेर येथे झालेल्या दंगलीत २२ मार्च २०२० रोजी शेख मकबूल अहमद मोहिनुद्दीन, शेख कालु शेख नूरा, आदिल खान ऊर्फ राजू बशीर खान, मधुकर उर्फ मधु पैलवान या चौघा जणांवर वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले होते.यापैकी मकबूल शेख याच्यावर एकाच दंगलीचे चार गुन्हे होते. शेख कालू यांच्यावर दोन गुन्हे दाखल होते. आदिल खान याच्यावर एक गुन्हा दाखल होता. मधु पैलवान यांच्यावर एका दंगलीचे चार गुन्हे दाखल होते. पोलिस निरीक्षक रामदास वाकोडे यांनी वरिष्ठांमार्फत ८ सप्टेबर २०२० रोजी गोपनीय अहवाल सादर करुन या आरोपींना स्थानबद्ध करण्याची विनंती केली होती. उपविभागीय पोलिस अधिकारी फैजपूर यांनी त्याच दिवशी सदर प्रस्ताव पोलीस अधीक्षक जळगाव यांना सादर केला होता. जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी १९ सप्टेंबर २०२० रोजी यांना धोकादायक व्यक्ती म्हणून पाचही जणांना एक वर्षासाठी स्थानबद्ध करत नाशिक मध्यवर्ती कारागृहात त्यांची रवानगी करण्यात आली होती.

## सोलापूर जिल्हा परिषदेतील आरोग्य विभागाच्या वाहनचालकांना किमान वेतनावर नियुक्ती करा!



### उच्च न्यायालय नागपूर खंडपीठाचा आदेश!

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्हा परिषद आरोग्य विभागातील रुग्णवाहिकावर खासगी संस्थातर्फे नियुक्त केलेल्या ६८ वाहन चालकांना किमान वेतनावर घेण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती के के तातेड, न्यायमुर्ती एन.आर. बोरकर यांनी दिले आहेत. चंद्रपूर जिल्हा परिषदेतील वाहनचालकांबाबत नागपूर खंडपीठाने दिलेल्या आदेशाचा संदर्भ घेऊन तो आदेश लागू करण्यात आला. आरोग्य विभागाच्या रुग्णवाहिकेवर चालक नियुक्तीचा ठेका एस.पी. सिक्युरिटी या संस्थेला पाच वर्षांपूर्वी देण्यात आला होता. त्यासाठी अकरा महिन्याचा करार होता. पण नंतर प्रशासनाने मुदतवाढ दिली. जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत त्यावर वादळी चर्चा झाली होती. तत्कालीन सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रकाश वायचळ यांनी नव्याने निविदा काढण्याचे आदेश दिले. त्यानुसार प्रक्रिया सुरू होती. संबंधीत संस्थेला प्रत्येक चालकांसाठी १३ हजार ५०० रुपये देण्यात येत होते. पण ही संस्था प्रत्यक्षात सहा हजार रुपये मानधन चालकांना देण्यात येत होते. ११ महिन्यासाठी शासनाकडून दोन कोटी सोळा लाख एकतीस हजार रुपये जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यात आले. त्यामुळे चालक विकास सातपुते, धनाजी जाधव, उत्तम काळे, राहुल निंबाळकर यांनी ॲड.पी.ए.कुलकर्णी यांच्या मार्फत मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली. चंद्रपूर जिल्हा परिषदेने चालकाबाबत नागपूर खंडपीठाने दिलेल्या निर्णयाप्रमाणे वेतनाची मागणी केली. वाहनचालकांसाठी शासनाकडून नियमित मानधनासाठी निधी मिळत होता. पण नियमानुसार मानधन मिळत नसल्याबाबत चालकांनी यापूर्वी अनेकदा तक्रारी केल्या होत्या. पण जिल्हा परिषदेचे पदाधिकारी व अधिकाऱ्यांनी त्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले. विधानपरिषद निवडणुकांची आचारसंहिता संपल्यानंतर लगेच ग्रामपंचायत प्रक्रिया सुरू आहे. ती आचारसंहिता संपल्यानंतर चालकांच्या प्रश्नांबाबत निर्णय घेण्याची तयारी प्रशासनाने केली आहे.

## माता व बालमृत्यू रोखण्यासाठी मानव विकास कार्यक्रमांतर्गत योजना लाभदायक - जिल्हाधिकारी डॉ.माणिक गुरसळ

**पालघर/प्रतिनिधी**

पालघर जिल्हा हा आदिवासी बहुल जिल्हा असल्याने जिल्हयात मानव विकास कार्यक्रमांतर्गत आरोग्यविषयक, शिक्षणविषयक विविध योजना राबविण्यात येत आहेत. अशाच विविध योजनांपैकी अनुसूचित जाती, जमाती, दारिद्रय रेषेखालील बाळंत महिलेला बुडीत मजूरी देणे ही एक महत्त्वपूर्ण आरोग्य विषयक योजना आहे.हि योजना सदर वर्गातील महिलांसाठी अत्यंत लाभदायक असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. माणिक गुरसळ यांनी केले आहे. बाळंतपणात महिलांना आराम मिळावा, संस्थात्मक बाळंतपणास प्रोत्साहन मिळावे, मातामृत्युदर व बालमृत्युदर कमी व्हावा हे योजनेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. या योजने अंतर्गत अनुसूचित जाती, जमाती, दारिद्र्य रेषेखालील पात्र बाळंत महिलांना रू.४०००/- इतकी रक्कम बुडीत मजुरी म्हणून दिली जाते. २००० प्रसूती पूर्वी तर २००० प्रसूती नंतर दिले जातात. पालघर जिल्हयाकडून सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात जिल्ह्यातील २९ प्राथमिक आरोग्य केंद्रातील अद्यापपर्यंत ४०७७ पात्र लाभार्थ्याकरिता एकूण रू.१६३.०८ लक्ष निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.. त्यापैकी ४०७३ मातांना आतापर्यत या योजनेचा लाभ मिळाला आहे. अशी माहिती मानव विकासचे सहायक जिल्हा नियोजन अधिकारी प्रवीण देशमुख यांनी दिली आहे. आदिवासी भागातील दारिद्यरेषेखालील कुटुंबातील महिलांना बाळंतपणात पुरेसा आराम न मिळाल्याने त्यांच्या प्रकृतीवर प्रतिकूल परिणाम होतो. या पार्श्वभूमीवर अशा महिलांकरिता मानव विकास कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येत असलेली अनुसूचित जाती, जमाती, दारिद्र्य रेषेखालील बाळंत महिलेला बुडीत मजुरी देणे ही योजना नक्कीच उल्लेखनीय ठरत आहे.

## नव्याने लोककला व पथनाटयाच्या निवडसूचीसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातर्फे शासनाच्या योजनांची माहिती सर्व सामान्य लोकांपर्यत पोहचविण्यासाठी यापूर्वीच्या लोककला आणि पथनाटय सादर करणाऱ्या संस्थाच्या जिल्हानिहाय निवडसूचीची मुदत २० डिसेंबर २०२० रोजी संपली आहे. आता नवीन निवडसूची तयार करण्यासाठी त्या त्या जिल्हयातील संबंधित संस्थांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. संबंधित संस्थांना १ जानेवारी २०२१ पासून अर्ज करता येतील तर अर्ज करण्याची अंतीम मुदत २१ जानेवारी २०२१ अशी आहे. संबंधित संस्थांनी येथील मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीतील जिल्हा माहिती कार्यालयात मुदतीत अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के यांनी आज येथे केले आहे. लातूर जिल्हयातील लोककला, पथनाटयव्दारे माहिती देणाऱ्या उदाहरणार्थ गण गवळण,अभंग, पोवाडे, वगनाटय, बहुरूपी, भारूड आदी लोककला, पथनाटय पथकांची निवडसूची तयार करण्यात येत आहे. याबाबत या क्षेत्रातील अनुभवी संस्थाकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्ज करणाऱ्या लोककला संस्था आणि पथकला संस्थांकडे विविध विषयावर (शासकीय योजनासह) कार्यक्रम, पथनाटय करण्याचा अनुभव असावा, पथक किमान दहा जणांचे असावे.यामध्ये स्त्री-पुरूष, वादक यांचा समावेश असाव, लोककला, पथनाटय पथक ज्या जिल्हयातील असेल त्याच जिल्हयातून अर्ज दाखल करावा, केंद्र सरकारच्या गीत आणि नाटय विभागाकडे संस्था नोंदणीकृत असल्यास प्राधान्य दिले जाईल,संस्थेकडे स्वत:ची ध्वनीक्षेपण यंत्रणा असणे अपेक्षित आहे. इच्छुक संस्थांनी येथील जिल्हा माहिती कार्यालयाशी संपर्क साधून अर्जाचा नमुना आणि माहिती पत्रक प्राप्त करून घ्यावे.अर्जाचा नमुना तसेच माहिती पत्रक www.maharashtra.gov.in आणि



dgipr.maharashtra.gov.in या वेबसाईटवरही उपलब्ध आहे. विहित नमुन्यातील अर्ज भरून जिल्हा माहिती अधिकारी यांना दि.१ जानेवारी २०२१ ते २१ जानेवारी २०२१ पर्यंत मिळतील अशा बेताने पाठवावेत.

11 JAN TO 17 JAN 2021 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 09/01/2021 8:34 PM Page 1



# पेशवे सेक्युलर होते का?

कोरोना सारख्या भयंकर महामारीच्या संकटाचा मुकाबला करताना जनतेच्या तोंडाला फेस आलाय. लॉकडाऊनच्या काळात अनेकांच्या नोकऱ्या गेल्या उपसमारीमुळे अनेकांनी पोराबाळांना स्वतःच्या हाताने ठार मारून आत्महत्या केल्या आणि लोकांची अशी हालत असताना काही लोक नको त्या विषयावर वाद घालून लोकांच्या जीवनमरणाच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करीत आहेत. गेल्या काही महिन्यांपासून लोकल ट्रेन सर्वसामान्य नागरिकांसाठी बंद असल्याने मुंबईबाहेर राहणाऱ्या चाकरमान्यांना एसटी मधून नाईलाजाने प्रवास करावा लागतोय. त्यामुळे सकाळी कामाला जाताना एसटी प्रवासात चार तास घरी येताना चार तास लागत आहेत. त्यामुळे अनेकदा कामाच्या ठिकाणी लेट मार्क लागल्याने कित्येकांचा रोजगार संकटात आलाय. त्यामुळे लोक हवालदिल झालेत आणि आमचे राज्यकर्ते आस्था आणि अस्मितांच्या वादात आपला वेळ खर्च करीत आहेत. सध्या औरंगाबादच्या नामांतराचा वाद पेटलाय. औरंगाबादचे नाव बदलून संभाजी नगर करावे यासाठी सेना-भाजप आताच नाही, तर गेल्या अनेक वर्षांपासून प्रयत्न करीत आहेत. तर काँग्रेस आणि इतर निधर्मी वादी पक्षांचा त्याला विरोध आहे. औरंगजेब हा क्रूर होता. त्याने संभाजी महाराजांना हाल हाल करून ठार मारले. त्यामुळे त्याच्या विषयी महाराष्ट्रातील जनतेच्या मनात चीड असणे स्वाभाविक आहे. अशावेळी महाराष्ट्रात त्याचे नामो निशाण नको असे काही आस्था आणि अस्मिता जपणाऱ्या वाटणे स्वाभाविक आहे. पण या महाराष्ट्रात एकटा औरंगजेबच अत्याचारी होता का? औरंगजेब पेक्षाही काही खतरनाक अत्याचारी शासनकर्ते या महाराष्ट्रात होऊन गेले, ज्यांच्यामुळे हिंदू समाजातीलच महार, मागं, गारुडी, आदिवासी, भटके आदी तळा गालातल्या लोकांचे इथल्या उच्च वर्णीय शासन कर्त्यांनी प्रचंड हाल केले. त्यांच्या सत्ता काळात दलितांना त्यांच्या सवलीचाही अधिकार नव्हता. त्यांच्या कमरेला झाडू आणि गळ्यात गाडगे बांधले जायचे, जेणेकरून त्यांची थुंकिही रस्त्यावर पडू नये. अशा क्रूरपणे जीवंत माणसाला ज्यांनी वागवले ते औरंगजेबाच्या पेक्षाही खतरनाक होते. मग औरंगजेबाच्या स्मृती पुसून टाकायचा असतील तर वर्ण व्यवस्थेच्या नावाखाली आणि मनुच्या आदेशानुसार हिंदू धर्मातील एक घटक असलेल्या दलितांचा छळ करणाऱ्या पेशव्यांच्या स्मृती सुद्धा पुसून टाकणार का? याचे उत्तर औरंगाबादच्या नामांतरासाठी वाद घालणाऱ्या लोकांनी द्यावे. काही लोक विचारात आहेत. औरंगजेब हा धर्म निरपेक्ष होता का? औरंगजेब हा धर्मनिरपेक्ष नव्हता हे वास्तव कुणीही नाकारत नाहीत, पण जे लोक हा प्रश्न विचारत आहेत. त्यांनी अगोदर पेशवे धर्म निरपेक्ष होते का याचे उत्तर द्यावे. शाहू, फुले, आंबेडकर यांचा महाराष्ट्र हा पुरोगामी विचारांचा आहे आणि धर्मनिरपेक्षता हा त्याचा आत्मा आहे. त्यामुळे धर्म निरपेक्ष तेचा मुडदा पडणारे लोक कुठल्याही जाती धर्माचे असोत त्यांना महाराष्ट्रात किंवा महाराष्ट्राच्या इतिहासात स्थान असतं नये. जर औरंगजेब जातीयवादी होता म्हणून त्याच्या स्मृती पुसून टाकायच्या असतील तर दलितांचा छळ करणाऱ्या पेशव्यांच्या स्मृती बाबत लवचिक भूमिका कशासाठी? आणि खरे सांगायचे झाल्यास अशा फालतू विषयात लोकांना अजिबात इंटरेस्ट नाही. पण राजकारणी मतांच्या लाचारीसाठी मेलेली मढी उकरून काढून लोकांमध्ये जाती धर्माच्या नावाखाली तेढ निर्माण करीत आहेत. या वादात मुख्यमंत्र्यांनी उडी घेऊन औरंगजेब सेक्युलर होता का असे विचारणे चुकीचे आणि बेजबाबदारपणाचे आहे. मुख्यमंत्र्यांना विरोधी पक्षाच्या पत्रांकडे बघायला वेळ नाही. त्यांना हार्ट सारख्या गंभीर आजाराने त्रस्त असलेल्या रुग्ण शय्येवरचा पेशंटच्या विनंती अर्जांकडे लक्ष द्यायला वेळ नाही. रेल्वे प्रवासाची मुभा नसल्याने सर्व सामान्य माणसाची आणि खास करून नोकरदार आणि मुंबईच्या रुग्णालयात उपचार घेणाऱ्या लोकांची काय अवस्था आहे, याकडे लक्ष द्यायला वेळ नाही. मात्र औरंगाबादच्या नामांतराचा प्रश्नाकडे लक्ष घालायला वेळ आहे. जनतेच्या प्राणापेक्षा, लोकांच्या गंभीर समास्यांपेक्षा नामांतराचा हा प्रश्न महत्त्वाचा आहे का? आणि असेल तर मुख्यमंत्री पदाचा राजीनामा द्या आणि नामांतराच्या लढ्यात सामील व्हा! तुमच्यावर कुणीही आक्षेप घेणार नाही. पण ज्या संविधानाची शपथ घेऊन तुम्ही मुख्यमंत्री पदाच्या खुर्चीवर बसला आहत त्या संविधानाचा धर्मनिरपेक्षता हा आत्मा आहे याचा विसर पडू देऊ नका. आणि धर्मनिरपेक्षतेची फुटपट्टी लावून मोजमाप करायचेच असेल तर मग सगळ्यांचीच धर्मनिरपेक्षता तपासा पेशव्यांना एक न्याय आणि औरंगजेबाला वेगळा न्याय असे का? इतिहासाच्या स्मृती जरूर जपायला हव्यात. पण त्यातून धार्मिक तेढ निर्माण होणार नाही याची दक्षता सुद्धा घ्यायला हवी. आज महाराष्ट्रात तीन वेगवेगळ्या पक्षांचे आघाडी सरकार आहे. यातील काँग्रेस आणि राष्ट्रवादी हे धर्मनिरपेक्ष पक्ष आहेत, तर शिवसेना हिदुत्ववादी आहे. वास्तविक आपआपली ध्येय धोरणे गुंडाळून सत्तेसाठी ऐकत्र येणे यातच लोक जे काही समजायचे ते समजले आहेत. असे असताना आम्ही आमच्या धोरणाशी किती घट्ट बांधील आहोत हे दाखवण्याचा आटापिटा कशासाठी? सत्ता मिळाली आहे तिचा गपचुप उपभोग घ्या. कमवायचे तेवढे कमवा आणि गप्प बसा. औरंगजेब आणि संभाजी राजांना यात कशासाठी आणता? आणि कोरोनाच्या संकट काळात अशा अनावश्यक गोष्टींवर वाद घालायची ही वेळ आहे का? संभाजी राजांबद्दल प्रत्येक मराठी माणसाच्या मनात आदर आहे. तितकीच औरंगजेब विषयी लोकांच्या मनात घृणा आहे. पण जेंव्हा असे विषय येतात तेंव्हा त्या व्यक्ती बघितल्या जात नाहीत तर त्यांचा धर्म बघितला जातो. आणि मग दोन वेगवेगळ्या धर्माचे लोक आप आपल्या धर्मातील ऐतिहासीक व्यक्ती रेखांसाठी एकत्र येतात. आणि त्यातूनच धार्मिक तेढ निर्माण होते. म्हणूनच निदान सध्याच्या परिस्थितीत तरी धार्मिक तेढ आणि जातीय दंगली नकोत. कारण अगोदरच कोरोनामुळे लोक उध्वस्त झालेत. त्यांचं पुनर्वसन करायचे सोडून जर सत्तेतले लोकच जाती धर्माचे वाद वाढवण्यासारखी परिस्थिती निर्माण करायला लागले, तर कोरोनाच्या नव्या संकटात जे पिढीत आहेत त्यांनी काय करायचं? तेंव्हा कृपा करून हा नामांतराचा वाद थांबवा आणि लोकांना शांततेने जगायला द्या! तुमच्या आस्था आणि अस्मितांच ओझ वाहून लोक थकलेत. तेंव्हा आता हे पुरे करा आणि राज्याचा आर्थिक गाढा जो कोरोनाच्या चिखलात रुतला आहे तो बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करा. त्यासाठी महाराष्ट्रातल्या प्रत्येक माणसाच्या हातभाराची गरज आहे. नव्हे ती प्रत्येकाची जबाबदारी आहे. पण हे केंव्हा शक्य आहे जेंव्हा सरकारला आपली जबाबदारी कळेल आणि सरकार इतर विषयांकडे दुर्लक्ष करून केवळ राज्याची आर्थिक स्थिती कशी सुधारेल याकडे सरकार प्रामाणिकपणे लक्ष देईल. कारण धर्म, जात, आस्था, अस्मिता आज महत्वाच्या नसून आज लोकांचा पोटापाण्याचा, रोजगाराचा आणि कोरोनापासून सुरक्षेचा मुद्दा महत्वाचा आहे. सरकार आणि विरोधी पक्षाने त्याकडेच लक्ष द्यावे. म्हणजे आघाडीचे सरकारही टिकेल आणि सामाजिक सलोखा सुधा कायम राहील.

# राजकारणातले युवा रत्नपारखी देवेंद्र फडणवीस



**संध्या स्ट्रोक**
**सोनू जाधव**

भारतीय जनता पक्ष हा खऱ्या अर्थाने विचारवंतांचा पक्ष आहे. कारण या पक्षाने देशातील प्रत्येक माणसाच्या खास करून तरुणपिढीच्या हृदयात प्रखर राष्ट्रवाद रुजवला. देव, देश आणि धर्मासाठी प्राण घेतले हाती हे वाक्य जणू भाजपसाठीच आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. कारण आज भाजपचा प्रत्येक कार्यकर्ता देव, देश आणि धर्मासाठी झटतोय त्यासाठीच जगतोय! त्यामुळे भाजपच्या याच देश निष्ठा आणि धर्म निष्ठेने प्रभावित होऊन दुसऱ्या पक्षातील लोक आज भाजपा येत आहेत आणि त्यासाठी भाजपतील काही रत्नपारखी नेत्यांनी समाजाच्या विविध क्षेत्रातील विचारवंतांना, अभ्यासू लोकांना आणि समाजासाठी समर्पित असलेल्या लोकांना भाजपच्या झेंड्याखाली आणले. त्यामुळेच आदरणीय पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली भाजपची यशस्वी घोडदौड सुरू आहे. भाजपची व्याप्ती संघटनात्मक ताकत वाढवण्यासाठी समाजातील चांगली माणसे हेरून त्यांना आपलंसं करून भाजपामध्ये आणणारे जे रत्नपारखी आहेत अशापैकिच एक आहेत महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस! अत्यंत लहान वयात राजकारणात आलेल्या फडणवीसांनी नगरसेवक ते महाराष्ट्रासारख्या मोठ्या राज्याचे मुख्यमंत्री हा जो काही राजकीय प्रवास केलाय, आजच्या पिढीतील प्रत्येक तरुणासाठी आदर्श ठरणार आहे. फडणवीस हे अत्यंत हुशार आणि बुद्धिवादी आहेत. तसेच ते अभ्यासू असल्याने त्यांच्याच कारकिर्दीत काँग्रेसचे उच्चाटन झाले. काँग्रेसचे उच्चाटन करताना भाजपला संघटनात्मक दृष्ट्या बळकट करण्याचा काम त्यांनी त्यांच्या प्रदेशाध्यक्ष पदाच्या कारकिर्दीत केले. त्याद्वारे महाराष्ट्रातील जास्तीत जास्त लोकांना पक्षाशी जोडले. दुसऱ्या पक्षातून भाजपा असलेल्यांचा त्यांच्या कार्यक्षमते नुसार सन्मान केला. अशांपैकीच एक आहेत प्रवीण दरेकर! फडणवीस यांनी दरेकरांमधील चांगले गुण त्यांच्यातली अभ्यासू वृत्ती अचूक हेरली आणि त्यांना सतत आपल्या सोबत ठेवले. प्रवीण दरेकर हे शिवसेनेत वाढलेले आणि त्यानंतर मनसेमध्ये आमदार म्हणून कर्तृत्व गाजवलेले प्रभावी युवा नेते आहेत आणि अशा माणसाला जर चांगला प्लॅटफॉर्म मिळाला तर तो त्या संधीच सोन करील याची फडणवीसांना जाणीव होती. म्हणून तर त्यांनी भाजपतील इतरांपेक्षा प्रवीण दरेकर यांनी अधिक पसंती देत विधान परिषदेवर पाठवले. तिथे त्यांना विरोधी पक्ष नेता बनवले आणि सतत आपल्या मार्गदर्शनाखाली दरेकर त्यांच्यातील नेतृत्व गुणाला चालना दिली आणि त्यातून भाजपसाठी एक सक्षम आणि अभ्यासू युवा नेता तयार केला. मनसेचे आमदार असताना प्रवीण दरेकर यांनी विविध विषयावर केलेली अभ्यासपूर्ण भाषणे फडणवीस यांनी एकली होती. त्यामुळे अशी हुशार माणसे भाजपामध्ये हवीत. त्यामुळे भाजपच्या व्यासपीठावरून ते आणखी चांगली कामे करू शकतात याची फडणवीसांना जाणीव झाली आणि त्यानी दरेकर यांनी भाजपामध्ये आणून आपला जवळचा सहकारी बनवले. प्रवीण दरेकर यांचा सहकार क्षेत्राचा उत्तम अभ्यास आहे. तसेच मुबै बँकेच्या माध्यमातून वित्तीय संस्थांमध्ये सुद्धा स्वतःची चांगली ओळख निर्माण केली आहे. आज मोदींच्या नेतृत्वाखाली भारताची विकासाच्या दिशेने गरुड भरारी सुरू असताना मोदींच्या पंखांना बळ देण्यासाठी फडणवीस यांच्यासारखे रत्नपारखी समाजातील चांगल्या आणि कर्तृत्ववान लोकांना भाजपामध्ये घेऊन महाराष्ट्रात भाजपला संघटनात्मक दृष्ट्या जास्तीजास्त मजबूत करण्याचे जे कामं करीत आहेत ते खरोखरच गौरवास्पद आहे. आज प्रवीण दरेकर यांचा सारख्या तरुण नेत्याला बळ देऊन फडणवीसांनी केवळ मुंबईच्या पश्चिम उपनगरातील गोर गरीब जनतेलाच भाजपशी जोडले असे नाही, तर मुंबई उपनगरे आणि लगतच्या ठाणे, पालघर जिल्ह्यामध्येही भाजपची ताकत आणि विश्वसनीयता वाढतेय. अतिवृष्टीच्या काळात फडणवीस यांनी संपूर्ण महाराष्ट्राचा दौरा केला. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या अडचणी समजून घेतल्या. यावेळी त्यांनी प्रवीण दरेकर यांनीही सोबत घेतले होते. जेणेकरून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची स्थिती काय आहे आणि त्याच्यासाठी भाजपा पक्ष म्हणून आपल्याला काय करावे लागणार आहे. याबाबत मार्गदर्शन केले. त्यामुळेच प्रवीण दरेकर यांनीही शेतकऱ्यांच्या आजच्या समस्या काय आहेत. या जवळून पाहता आल्या परिणामी आज ते अधिकार वानिने आणि विरोधी पक्ष नेता म्हणून शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सरकारशी भांडत आहेत आणि या कामी जनतेचा सुद्धा त्यांना पाठिंबा मिळत आहे. प्रवीण दरेकर यांच्या सारख्या कर्तृत्ववान तरुण नेत्याला पुढे आणण्याचं काम फडणवीस यांच्या सारखा रत्न पारखीच करू शकतो. नायतर दुसऱ्या पक्षात कर्तृत्ववान नेत्यांचे पाय ओढण्याची जणू काही स्पर्धा लागलेली असते. प्रवीण दरेकर जर आज मनसेत असते, तर एक इंच ही पुढे सरकू शकले नसते. करंटे किती जरी कर्तृत्ववान असले तरी पक्ष सुद्धा तितकाच गतिमान आणि सकारात्मक असावा लागतो. आपल्या पक्षातील कर्तृत्ववान लोकांच्या माध्यमातून पक्षाला अधिक क्रियाशील बनवण्याची जबाबदारी पक्षनेतृत्वा कडे असावी लागते. त्यासाठी पवार म्हणतात त्याप्रमाणे पक्ष नेतृत्वाला सकाळी लवकर जाग यावी लागते. तरच पक्ष प्रगती करू शकतो. पुढे जाऊ शकतो. पण दुर्दैवाने तिथे तसे नव्हते. त्यामुळे प्रवीण दरेकर यांनी मनसे सोडली ते एका अर्थी बरेच झाले. भाजपामध्ये त्यांच्या कर्तृत्व गुणांना वाव देणारा फडणवीस यांच्या सारखे रत्नपारखी त्यांना मिळाले. त्यामुळे या पुढे प्रवीण दरेकर यांचे राजकीय भवितव्य निश्चितपणे उज्वल आहे. त्यांच्या आणि फडणवीस यांच्या उज्वल राजकीय भवितव्यासाठी आम्ही ईश्वराकडून प्रार्थना करू!

**मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३**

# फसव्या नोकरीच्या जाहिरातींपासून सावधान!

भारतात बेरोजगारीची समस्या अनेक वर्षापासून आहे. सरकारने वेळोवेळी आणलेल्या रोजगार योजना, व्यवसायासाठी स्किम आणल्या तरी ही समस्या काही सुटलेली नाही. त्यात आता करोना महामारीच्या संकटाने अनेकांच्या नोकऱ्या गेल्या. कंपन्याच आर्थिक संकटात असल्यामुळे नोकर भरती थांबली, पगारात कपात केली. मात्र अशापरिस्थितीत नोकरीचे आमिष दाखवून फसवणाऱ्यांचा सुळसुळाट वाढला आहे. पैशांची गरज असणारे नोकरी मिळवण्यासाठी धडपडत असतात. अशा व्यक्ती मग या फसव्या नोकर भरती करणाऱ्यांचा गळाला लागतात. मुंबई, पुणे, दिल्ली, नाशिक, कोल्हापूर, सातारा, पटना इत्यादी ठिकाणी सातत्याने फसवणूक होत असल्याच्या बातम्याही आपण गेल्या महिनाभरापासून झळकत आहेत.

नुकतेच मुंबईतील गोरेगाव येथे नोकरी देण्यासाठी प्रत्येकाकडून एक हजार रुपये घेऊन नियुक्ती करून देणारे पळून जाण्याची घटना घडली. यासंदर्भात वनराई पोलीस स्थानकात गुन्हा दाखल झाला होता. खाजगी बँकेत बॅक ऑफिसच्या कामासाठी जागा रिक्त असल्याची जाहिरात केली होती. २१ जणांनी जाहिरातीत दिलेल्या नंबरवर कॉल केला. काही जणांना नोकरी पक्की करण्यासाठी हजार रुपये मागितले तर काहींकडे बँकेचे खाते उघडण्यासाठी मागितले. सगळ्यांनी पैसे भरले आणि नोकरी सुरू केली. नोकरी सुरू झाली. भरती झालेल्या व्यक्तींना बेरोजगार व्यक्तींचा डेटा दिला आणि त्यांना फोन करायला सांगितले. बेरोजगार व्यक्तींना मुलाखतीसाठी बोलवून त्यांच्याकडून हजार रुपये घेत असत. मात्र काही दिवसात नोकरी देणारे २९ जणांचे पैसे घेऊन पसार झाले. कोणालाच पगार दिला नाही, बँकेचे खाते उघडून दिले नाही. तसेच ऑफिसचे सामान, चहावाला आदींचे पैसे दिले नाहीत.

वृत्तपत्रे, वाहिन्यांसह सामाजिक माध्यमांवर, ईमेल आणि एसएमएसद्वारे नोकरीच्या रिक्त जागांबाबत अनेक जाहिराती प्रसिद्ध होत असतात. लिंकडीन, फेसबूक, टेलिग्राम, इत्यादींवर मुख्यत्वे जाहिराती प्रसिद्ध होतात. टाळेबंदीच्या काळात २७ हजार जणांना सामाजिक माध्यमांमधून नोकरीचे आमिष दाखवून फसवल्याचे वृत्त नुकतेच प्रसिद्ध झाले होते. तसेच काही दिवसांपूर्वी दक्षिणत दिल्लीत

**दिशायन**




रुग्णालयात नोकरी मिळवून देऊ असे सांगून एका एजंटने लोकांकडून पैसे उकळले आणि पसार झाला. त्याला नुकतेच अटकही करण्यात आले आहे. खोटी संकेतस्थळे बनवून सरकारी नोकरी देण्याचा, सैन्यात भरती करून देण्याची आश्वासने देतात. नोकरी मिळवण्यासाठी कमिशन, नोंदणी फी घेऊन नंतर पसार होतात. नुकतेच खोटी सैन्य भरती करणाऱ्या एजन्सी रॅकेटचा पोलिसांनी पर्दाफाश केला.

नोकरी मिळवून देणाऱ्या अनेक संस्था आणि कंपन्या वर्षानु वर्षे कार्यरत आहेत. यात नोकरी मिळाल्यावर ते कमिशन घेतात किंवा पगारातील पैसे कट केले जातात. मात्र गेल्या काही वर्षामध्ये चित्र थोड्या प्रमाणात बदलले. नोकरदाराऐवजी कंपन्या एजंट किंवा एजन्सीला कमिशन देऊ लागल्या. मात्र आजही अनेक ठिकाणी नोंदणी फी, कमिशन, हमी देण्याच्या नावाखाली पैसे उकळले जातात. परदेशी नोकरी, सरकारी नोकरी, लष्कर भरती इत्यादी आमिषे दाखवणाऱ्या जाहिराती अगदी दररोज येत असतात. या जाहिराती बघून मी दादरला गेले. तिकडे गेल्यावर समजले की येथे १ हजार ५०० रुपये फी भरावी लागेल. तिथे ३० मुली जमल्या होत्या. त्यापैकी ४ मुलींनी पैसे भरले. बाकी सर्वजणी जागृक होत्या की फसवे असावे. पण मी पैसे भरलेल्या मुलीचा नंबर घेतला. तिला २५-२६ दिवसांनी फोन करून विचारले. ती म्हणाली, नोकरी नाही मिळाली. पुन्हा दोन महिन्यांनी चौकशीसाठी फोन केला, ती म्हणाली त्यांनी फसवले. पैसे बुडले आणि नोकरीही गेली, ही सत्य माहिती नबिहा अब्बास या नोकरी शोधणाऱ्या तरुणीने दिली. घरबसल्या कमवा, टायपिंग, कॉल सेंटर, कस्टमर केअर, कस्टमर रिलेशन्स, बँकेत बॅकऑफिसचे काम आदीं क्षेत्रांतील नोकऱ्यांमध्ये सर्वाधिक फसवणूक होत असल्याचे दिसून आले आहे. चांगल्या नोकरीसाठी धडपडणारे अशा जाहिरातींना भुलतात, कारण या जाहिरातींमध्ये सुट्ट्या, मोठा पगार, ५-६ तासाचे काम असे नमूद केलेले असते.

## अशा ओळखाव्यात फसव्या नोकऱ्यांच्या जाहिराती

- सरकारी नोकऱ्यांमध्ये ज्या विभागाची जाहिरात आहे त्यांची संपूर्ण माहिती, पत्ता, नोकरीच्या मुलाखतीची प्रक्रिया, वयोमर्यादा, रिक्त पदे आणि पदांची संख्या इत्यादी माहिती नमूद केलेली असते. ज्या सरकारी विभागाची जाहिरात आहे त्या विभागाच्या संकेतस्थळावर जाऊन नोकर भरतीची माहिती घ्यावी. सरकारी संकेतस्थळाच्या डोमेनमध्ये .nic.in आणि .gov.in असे लिहिलेले असते.
- फसव्या जाहिरातींमध्ये शैक्षणिक पात्रता ७ वी, ८ वी ते १२ वी पर्यंत दिलेली असते. तसेच अनुभवींपेक्षा फ्रेशर्ससाठी भरती असे लिहिलेले असते. कारण शैक्षणिक पात्रता कमी असलेल्या व्यक्तींना नोकऱ्या पटकन मिळत नाहीत. फ्रेशर असेल तर ते फारसे कंपनी संदर्भात प्रश्न विचारणार नाहीत. यामुळे फसव्या एजन्सीला अशा लोकांना लगेच जाळ्यात ओढता येते.
- जाहिरातींमध्ये रिक्त पदांच्या संख्या ५०, १००, १००० अशा सांगितलेल्या असतात. एवढ्या मोठ्या प्रमाणात, एकाचवेळी, एकाच कंपनीत नोकर भरती होत नाही, असे लिहिलेली जाहिराात फसवी असते.
- जाहिरातीत पगार १५ हजारांपासून ते ४० हजारांपर्यंत सांगितला असेल, तर नक्कीच यात गडबड आहे. मुळात १२ पर्यंत शिकलेल्या, अनुभव नसलेल्या व्यक्तीला एवढा मोठा पगार लगेच मिळणे कठीण आहे. त्यामुळे अशावेळी भुलून जाण्यापेक्षा विचार करणे गरजेचे आहे.

# मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून पत्रकार दिनाच्या शुभेच्छा!

मुंबई : मराठी पत्रकारितेचे जनक आद्यपत्रकार दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे स्मरण करण्याचा आजचा दिवस. मराठी पत्रकारितेने भारतीय स्वातंत्र्य संग्राम आणि सशक्त लोकशाहीच्या वाटचालीत आपला वेगळा मानदंड प्रस्थापित केला आहे. सामान्य माणसाला आवाज देणाऱ्या प्रबोधनकारांच्या तसेच बाळासाहेबांच्या पत्रकारितेचा वारसा देखील आपल्याकडे आहे. संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा धगधगता वसा मराठी पत्रकारितेला मिळाला आहे. मराठी पत्रकार दिनानिमित्त आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना विनम्र अभिवादन आणि पत्रकार बांधवांना मनःपूर्वक शुभेच्छा. तसेच मराठी पत्रकारितेचे जनक, आद्यपत्रकार, आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दर्पण' या पहिल्या मराठी वृत्तपत्राची सुरुवात दि. ६ जानेवारी १८३२ रोजी करुन मराठी वृत्तपत्राची मुहुर्तमेढ रोवली. मराठी पत्रकारितेची मुहूर्तमेढ रोवून, मराठी पत्रकारितेला निर्भिड, निष्पक्ष, लोकाभिमुखतेचा वारसा देणाऱ्या आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या कार्याला वंदन करून मराठी पत्रकार दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून देण्यात आल्या

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# युवाचार्य महेंद्रऋषी महाराज 'श्रुतमहोदधी' पदवीने सन्मानीत

**जळगाव/प्रतिनिधी**

कृषी क्षेत्रात आपल्या कार्याची जगाच्या पाठीवर ओळख निर्माण करणारे पद्मश्री डॉ. भवरलालजी जैन हे ऋषभदेव यांच्या असी, मसी आणि कृषी या तिघांचे मोठे अनुयायी होते. आज जैन परिवाराची गंगोत्री असलेल्या वाकोद या जामनेर तालुक्यातील नगरीत हा अभिनंदन सोहळा महत्वाचा समजला जात असल्याचे विचार प.पू. महेंद्रऋषीजी म.सा. यांनी म्हटले आहे. आपल्या सत्काराला उत्तर देतांना ते बोलत होते. वाकोद येथील हिराहस्ती समाज मंदिरात प्रज्ञामहर्षी युवाचार्य प.पु. महेंद्रऋषीजी महाराज यांचा दिव्यपद सन्मान सोहळा ५ जानेवारी रोजी जळगाव जिल्हा श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाच्या वतीने आयोजित केला होता. त्या प्रसंगी त्यांनी आपले विचार व्यक्त केले. या कार्यक्रमास सेवादास दलीचंदजी जैन, कविवर्य ना. धों. महानोर, रमेशदादा जैन, प्रदीप रायसोनी, अशोकभाऊ जैन, अमर जैन, प्रकाश समदडीया आदि मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. कोविड-१९ महामारीच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या मार्गदर्शक सुचनांचे सर्वतोपरी पालन यावेळी करण्यात आले. उपस्थित सर्वांच्या डोक्यावर राजस्थानी पगडी, मुखावर मास्क व गळ्यात जैन रंगाचे प्रतीक असलेले वस्त्र होते. प्रज्ञामहर्षि, आगमज्ञाता युवाचार्य प्रवर



परमपूज्य श्री. महेंद्रऋषीजी म. सा., उपप्रवर्तक परमपूज्य श्री. अक्षयऋषीजी म. सा. आदी ठाणा पाच यांच्या चातुर्मासाचा सहवास जळगाव नगरीतील वासीयांना लाभला होता. चातुर्मास पश्चात जळगाव येथून विहार करत वाकोद येथे संत आदि ठाणा पाच विराजमान झाले. या औचित्याने जळगाव जिल्हा श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघातर्फे युवाचार्य प.पू. महेंद्रऋषी महाराज यांना ''श्रुतमहोदधी'' पदवी देऊन मानपत्र प्रदान करत सन्मान करण्यात आला. सेवादास दलीचंदजी जैन, रमेशदादा जैन यांच्याहस्ते संतद्वयांना चादर ओढण्यात आली. कान्हदेश शिरोमणी-उपप्रवर्तक अक्षयऋषी यांनादेखील आदररुपी चादर ओढण्यात आली. सुरुवातीला अपूर्वा राका, मीनल समदडीया, ममता कांकरिया यांनी मंगलाचरण गायीले. प.पू. अचलऋषी महाराज, प्रकाश समदडीया, प.पू. अमृतऋषी महाराज, महावीर गोलेछा, हितमीत भाषी प.पू. हितेंद्रऋषी म. सा. ताराबाई डाकलिया, ईश्वरलालजी साबद्रा, नागपूर श्री संघाचे सदस्य कांतीलाल श्रीश्रीमाळ यांनी याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त केले. जळगाव येथील श्राविका ताराबाई रेदासनी यांनी गीताच्या माध्यमातून आपल्या भावना यावेळी व्यक्त केल्या. मिनल समदडिया यांनी देखील आपले भाष्य यावेळी केले. कान्हदेश शिरोमणी उपप्रवर्तक अक्षयऋषी महाराज यांनी उपस्थित श्रावक-श्रावकांशी यावेळी सुसंवाद साधला. जळगांववासीय अतिशय भाग्यवान आहेत की त्यांना प.पू. युवाचार्य महेंद्रऋषिजी म.सा. यांचा चातुर्मास लाभला. कोरोना महामारीमुळे युवाचार्य म.सा. यांना बऱ्याच मर्यादा आलेल्या होत्या. मात्र पुन्हा एकदा युवाचार्यजी यांनी चातुर्मास करावा अशी कान्हदेशवासीयांच्या वतीने यावेळी विनंती करण्यात आली. खरे तर जळगावाचा मंगल प्रवेश जळगाव येथून आरंभ झाला व समारोप श्रद्धेय भवरलालजी जैन यांच्या जन्मगावी वाकोद आणि जिल्ह्याचे शेवटचे गाव असलेल्या शेंदुर्णी येथे झाल्याचे त्यांनी यावेळी आवर्जून कथन केले. सेवादास व जैन परिवाराचे ज्येष्ठ सदस्य असलेले दलीचंदजी जैन यांनी देखील यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. द्रव्य, क्षेत्र, कल, भाव यानुसार आपापल्या पद्धतीने सर्वांनी चातुर्मासत सेवा कार्य केले. कोरोनामुळे आम्हाला फार काही करता आले नाही. मात्र प.पु. युवाचार्य महेंद्रऋषी यांचे विचार तंत्रज्ञानाचा उपयोग करत घराघरात मात्र पोहोचवता आले ही एक चांगली बाब यावेळी दिसून आली असल्याचे दलिचंदजी जैन यावेळी म्हणाले. युवाचार्य प. पु. महेंद्रऋषी महाराज साहेब लिखित 'मुनी गुणमंगलमाला' पुस्तकाचे यावेळी प्रकाशन करण्यात आले. या पुस्तकासाठी दीपकजी ओस्तवाल यांचे चांगले सहकार्य लाभले. मानपत्राचे वाचन नितीन चोपडा यांनी यावेळी केले. अपूर्वा राका यांनी योग्य रितीने सूत्रसंचालन केले. हा समारोह पार पडल्यानंतर सर्व संतांनी पळसखेडा-सोयगाव औरंगाबाद जिल्ह्याच्या दिशेने विहार केला. या कार्यक्रमाचे सोशल मिडीयाच्या माध्यमातून लाईव्ह प्रेक्षपण देखील करण्यात आले होते.

# कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरण मोहीम अंतर्गत जिल्ह्यातील पाच ही ठिकाणचा ड्राय रन यशस्वी



**लातूर/प्रतिनिधी**

कोरोना प्रतिबंधात्मक लसीकरण मोहीम ची पूर्वतयारी म्हणून राज्यातील सर्व जिल्ह्यात ड्राय रन चे आयोजन करण्यात आले होते. त्यानुषंगाने लातूर जिल्ह्यातील पाच ठिकाणी ड्राय रन घेण्यात येऊन ती पूर्णपणे यशस्वी झाल्याची माहिती आरोग्य विभागाकडून देण्यात आली. लातूर शहरातील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय विज्ञान संस्थेत निर्माण करण्यात आलेल्या लसीकरण केंद्रास जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी. यांनी प्रत्यक्ष भेट देऊन येथील ड्राय रन ची पाहणी केली. ड्राय रन च्या अनुषंगाने मेडिकल कॉलेज ने केलेल्या संपूर्ण तयारीची माहिती घेतली. तसेच यावेळी बोलताना जिल्हाधिकारी पृथ्वीराज म्हणाले की लातूर जिल्ह्यात पाच ठिकाणी ड्राय रन चे आयोजन करण्यात आलेले होते. प्रत्येक केंद्रावर २५ लोकांना लसीकरणासाठी मेसेज देण्यात आलेला होता. मेसेज देण्यात आलेले लोक ड्राय रन साठी आलेले होते. प्रत्यक्ष लस उपलब्ध झाल्यानंतर याच पद्धतीने ऑनलाइन नोंदणी केलेल्या आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांना लसीकरण सुरुवातीला करण्यात येणार आहे. त्यानंतर नागरिकांना लसीकरण करण्यात येणार आहे तरी लातूर जिल्ह्यातील नागरिकांनी मनात कोणत्याही प्रकारची शंका न ठेवता लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी पृथ्वीराज यांनी यावेळी केले. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल, अधिष्ठता डॉ. मोहन डोईबळे,जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.लक्ष्मण देशमुख व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.गंगाधर परगे व इतर वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.

# लातूरात ८ लाख ४७ हजार मुद्देमाल जप्त



**लातूर/प्रतिनिधी**

ग्रामपंचायत निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात बेकायदा दारू तस्करीला आळा घालण्यासाठी गस्तीवर आसलेल्या राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कर्मचाऱ्यांनी अवैध देशी दारु तस्करीतील १५ बॉक्स दारू एक जीप आस सुमारे ८ लाख ४७ हजार ४४० रुपयेचा मुद्देमाल जप्त करीत उत्कृष्ठ कामगिरी केली आहे. याप्रकरणी दोन दारू तस्करांना ताब्यात घेतले आहे. याबाबत अधिक माहीती अशी की ग्रामपंचायत निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर अवैध दारू वाहतूकीला आळा घालण्यासाठी लातूर राज्य उत्पादन शुल्क विभागातर्फे गस्ती पथक नियुक्त करण्यात आले आहे. या पथकाला एका गुप्त माहीती वरून लातूर शहरातून एका जीपमधुन बेकायदा दारू वाहतूक होणार आसल्याची गुप्त माहीती मिळाली होती. मिळालेल्या माहीतीवयन विभागाचे आयुक्त कांतीलाल उमाप, संचालक श्रीमती उषा वर्मा, अधिक्षक गणेश बारगजे यांच्या मार्गदर्शनाखाली सापळ लावून अवैध देशी दारु मद्य वाहतुक करीत आसलेल्या संबंधीत जीपला थांबवून अधिक चौकशी केला असता जीपमध्ये देशी दारूचे १५ बॉक्स आढहून आले.

यावेळी १५ देशी दारुचे बॉक्स व एक बोलोरो जीप वाहन क्र. एचएच २५- एएल-४९७९ जप्त करण्यात आली. यामध्ये दोन इसमांना ताब्यात घेण्यात आले. जप्त केलेल्या मुद्येमालाची किंमत ८ लाख ४७ हजार ४४० रुपये एवढी आहे. या कारवाईत लातूर विभागाचे निरीक्षक आर.एम. बांगर, लातूर विभागाचे दुय्यम निरीक्षक आर.जी. राठोड, स.दुय्यम निरीक्षक गणेश गोले, अनिरुध्द देशपांडे, निलेश गुणाले, हणमंत मुंडे तसेच यांनी महत्वाची भूमिका बजावली आहे. अवैध दारुविक्री अथवा वाहतुकीवरील कार्यवाही यापुढेही चालु राहणार असल्याचे अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क गणेश बारगजे यांनी सांगीतले असून अवैध व परराज्यातील मद्य विक्री, वाहतुक होत असल्यास त्याबाबतची माहिति कळविण्याचे आवाहन केले आहे.ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर लातूर जिल्हयात अवैध बेकायदेशीर वाहतुक विरोधात राज्य उत्पादन शुल्क विभागाची धडक कार्यवाही नोंदवत

# दरोड्यातील आरोपींना मंद्रुप पोलिसांनी केले जेरबंद

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रुप पोलीस स्टेशनच्या हद्दीत झालेल्या दरोड्यातील आरोपींना अटक करून तसेच दोन मोबाईल, चोरी प्रकरणाचा छडा लावण्यास सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. १ ऑक्टोबर २०२० रोजी विजयपूर येथे राहणारे फिर्यादी यांना मलेश नावाच्या इसमाने कमी किंमतीमध्ये सोने विकत देतो असे सांगून, विजयपूर येथून मंद्रुप पोलीस ठाण्याच्या हद्दीत अंत्रोळी गावाच्या शिवारात बोलावले होते. त्यावरून फिर्यादी व त्यांचे इतर तीन साथीदार हे स्विफ्ट डिझायर कारमधून सोने घेण्यासाठी आले होते. तेथे आल्यानंतर मलेश हा त्यांचे इतर आठ ते नऊ साथीदारांसह तेथे येऊन फिर्यादी व त्याचे साथीदारांना तलवार व लोखंडी रॉडने मारहाण करून त्यांचेकडील ११,१०० रुपये रोख रक्कम व तीन मोबाईल जबरदस्तीने चोरून घेऊन गेले होते. सदरबाबत मंद्रुप पोलीस स्टेशन येथे गुरनं ३०१/२०२० भादंवि कलम ३९५,३९७ प्रमाणे गुन्हा दाखल होता. सदरचा गुन्हा हा गंभीर असल्याने गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेण्याबाबत सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी स्थानिक



गुन्हे शाखेला आदेश दिले होते. त्यावरून ५ जानेवारी २०२१ रोजी स्थानिक गुन्हे शाखेकडून सदरचा गुन्ह्यातील एक आरोपी हा रा. मिरी ता. मोहोळ जि सोलापूर येथील राहणारा असून तो बेगमपूर येथील बाजारात मच्छी विकत असल्याचे खात्रीपूर्वक गोपनीय माहिती मिळाली होती.

सदर माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे व पथकाने बेगमपूर येथून सदर इसमाला ताब्यात घेतले. त्याच्याकडे मंद्रुप पोलीस स्टेशनच्या हद्दीत झालेल्या दरोड्याच्या गुन्ह्याबाबत तपास करता त्याने तो त्याचे इतर साथीदारांसह केल्याची कबुली देऊन आणखी आरोपीच्या ठावठिकाणाची माहिती दिली होती. त्यावरून सदर आरोपीचा शोध घेऊन त्यातील आणखी एका आरोपीस अटक करण्यात स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना यश मिळाले आहे. त्यांचेकडे अधिक तपास करून गुन्ह्यातील जबरीने घेऊन गेलेले तिन्ही मोबाईल अटक आरोपीकडून हस्तगत करण्यात आलेले आहेत. सदरच्या दोन्ही आरोपींना पुढील तपासकामी मंद्रुप पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदर ही कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक ख्वाजा मुजावर, पोलीस हवालदार नारायण गोलेकर, धनाजी गाडे, मोहन मनसावाले, पोलीस कॉन्स्टेबल धनराज गायकवाड, अक्षय दळवी, समीर शेख यांनी बजावली आहे. तसेच करकंब पोलीस स्टेशनकडील गुरनं ४०५/२०२० भादंवि कलम ३७९ मधील आरोपीस अटक करण्यात आलेली असून त्यांचे कडील गुन्ह्यात चोरीस गेलेल्या सॅमसंग कंपनीचा मोबाईल देखील जप्त करण्यात आलेली आहे.

सदरचा मोबाईल व आरोपीस करकंब पोलीस स्टेशनकडे देण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे अकलूज पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या गुरनं ५००/२०२० भादंवि कलम ४५७, ३८० मधील चोरीस गेलेला विवो कंपनीचा वाय ९३ मॉडेलचा मोबाईल हा विधीसंघर्ष ग्रस्त बालकाकडे मिळून आल्याने सदरचा मोबाईल व विधीसंघर्ष ग्रस्त बालकाचा ताबा अकलूज पोलीस स्टेशनकडे देण्यात आलेला आहे. अकलूज व करकंब पोलीस स्टेशन कडील कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली पोलीस हवालदार राजेश गायकवाड, विजय भरले, पोलीस नाईक रवी माने, हरी पांढरे, पोलीस कॉन्स्टेबल सचिन गायकवाड यांनी बजावली आहे.

# शिरूर ताजबंद ते वायगावपाटी रस्ता दुरूस्तीची मागणी

**अहमदपूर/फिरोज शेख**

अहमदपूर तालुक्यातील शिरूर ताजबंद ते वायगाव पाटी जाणाऱ्या रस्त्यावर जागो-जागी मोठ मोठे खड्डे पडल्याने हा रस्ता पूर्णपणे खड्डेमय झाला आहे.त्यामुळे वाहन चालकांना व प्रवाश्याना याचा नहाक त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्याची झालेली चाळण पहात या रस्त्याच्या दुरूस्तीकडे लोकप्रतिनिधी लक्ष देतील का? अशी हाका जनसामान्यात दिली जात आहे. अहमदपूर ते उदगीर, बिदर जाण्यासाठी एकमेव हा रस्ता असुन या रस्त्याची अशी दुर्दशा झाल्यामुळे प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. या रस्त्याची अक्षरशः चाळणी झाली आहे. या रस्त्यावर सगळीकडे खड्डेच खड्डे पडल्याचे दिसुन येत आहेत.. जणू 'रस्त्यात खड्डा आहे की खड्ड्यात रस्ता' हा प्रश्न जनतेला पडत आहे. वाहनधारकांना या रस्त्यावर चांगलीच कसरत करावी लागत आहे. या रस्त्यावरून दिवसभर मोठ्या



प्रमाणात वाहनांची वर्दळ सुरू असते. या खड्ड्यांमुळे येथे दररोज लहान मोठे अपघात होत असतात. मुख्यतः वाहनचालकांना या रस्त्यावरून तारेवरची कसरत करावी लागत आहे. हा पाच किलोमीटर प्रवास करण्यासाठी तब्बल ३० ते ३५ मिनीटे एवढा वेळ खर्च करावा लागत आहे. या रस्त्याची एवढी दुर्दशा झालेली आहे की या रस्त्यावरून जेव्हा प्रवाशी बस जाते तेव्हा ती बस एखाद्या नदी-नाल्यातून जात आहे की काय? असा भास बस मधील प्रवाशांना होत आहे. या रस्त्यावरून डांबर पुर्ण पणे नष्ट झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात धुळ उडत आहे त्यामुळे परिसरातील नागरीकांचे व प्रवाशांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या भागातील नागरीकांनी येथील लोकप्रतिनिधीना वेळोवेळी रस्ता दूरूस्तीची मागणी केली आहे. असे असतानाही लोकप्रतिनिधी यांच्या मागणीकडे दुर्लक्ष करीत आहेत. त्यामुळे लोकप्रतिनिधी झोपेत का? असा प्रश्न परिसरातील जनतेला पडत आहे. शिवाय या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या वयोव्रद्ध प्रवाशांना पाठदुखी, मानदुखी, कंबरदुखी यांसारखे आजारही मोठ्या प्रमाणात वाढल्याचेही आढळून येत आहेत. मागील अनेक महिन्यांपासून या रस्त्याचा 'खेळखंडोबा' झाला असताना लोकप्रतिनिधी मात्र अजूनही याकडे कानाडोळा करत असल्याने नागरिकांकडून तीव्र संताप व्यक्त होत आहे. लोकप्रतिनिधींनी आता तरी झोपेतून जागे व्हावे व या रस्त्याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी परिसरातून होत आहे.दरम्यान संमंधीत रस्त्याच्या दुरूस्ती संर्दभात आमच्या प्रतिनिधीने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे अधिक माहीती घेतली असता सध्या डांबराची कमतरता असल्यामुळे काम सुरू करण्यास विलंब लागत असून पुढील आठ दिवसात डांबर उपलब्ध करून काम सुरू करण्यात येईल अशी माहीती सार्वजनिक बांधकाम विभाग शाखा नागनाथ सगर यांनी दिली आहे.



**रावेर तालुक्यातील कुसूंबा बु!येथील अंगणवाडी सेविका शोभा नारायण घोडके यांनी कोरोना लॉकडाऊन काळात स्वतःची व कुटूंबाची पर्वा न करता कोरोनाचे प्रादुर्भाव रोखण्यासाठी, मेहनतीने व विश्वासाने जे काम केले. त्यांच्या ह्या कामगिरीबद्दल त्यांना कोविड योद्धा म्हणून, महिला व बालविकास विभागाच्या वतीने कोविड योद्धा सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले. शोभा नारायण घोडके यांचा असा हा सन्मान झाला आहे. जळगाव येथील जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत त्यांना सरकारच्या वतीने दिले जाणारे प्रमाणपत्र देऊन त्यांना गौरवण्यात आले. त्या कुसूंबा बु! तालुका रावेर, येथील, नारायण रामभाऊ घोडके, जे एस जावळे विद्यालय, (सचिव) व समाजसेवक, यांच्या पत्नी आहे.**

# पत्रकार दिनानिमित्त आरोग्य तपासणी शिबिर संपन्न



**उल्हासनगर/प्रतिनिधी**

पत्रकार दिनाचे औचित्य साधुन पत्रकार सुरक्षा समितीच्या वतीने आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करन्यात आले असून या शिबीराचा असंख्य नागरिकानी लाभ घेतला आहे. तर या शिबीराला शहरातील अनेक मान्यवरानी भेट देवुन पत्रकारांचे अभिनंदन केले आहे. मराठी पत्रकारितेचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ साली दर्पण नावाचे वृत्तपत्र सुरु केले होते. त्यामुळे हा दिवस पत्रकार दिन म्हणुन साजरा करन्यात येतो. तेव्हा या दिनाचे औचित्य साधुन पत्रकार सुरक्षा समिती उल्हासनगर तालुका यांच्या वतीने मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यालय संम्राट अशोक नगर उल्हासनगर ३ येथे आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये रमाबाई आंबेडकर विद्यालयाचे संस्थापक व शिक्षण मंडळाचे माजी उप सभापती महादेव सोनवणे, आरपीआय(आ)चे प्रदेश सचिव नाना पवार, अशोका फाऊंडेशनचे अध्यक्ष शिवाजी रगडे, युवा सेनेचे शहर अध्यक्ष बाळा श्रीखंडे, काँग्रेस चे शहर अध्यक्ष रोहित साळवे, बहुजन समाज पक्षाचे प्रदेश महासचिव प्रशांत इंगळे, वंचित बहुजन आघाडीचे शहर अध्यक्ष शेषराव वाघमारे, महिला आघाडीच्या अध्यक्षा रेखाताई उबाळे, ज्येष्ट पत्रकार दिलीप मालवणकर, मध्यवर्ती पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुधाकर सुरडकर, नगरसेवक गजानन शेळके, सेनेचे विभाग प्रमुख दशरथ चौधरी, प्रहार संघटनेचे स्वप्निल पाटील, पत्रकार सुरक्षा समितीचे ठाणे जिल्हा अध्यक्ष अरुण ठोंबरे, जिल्हा महासचिव प्रदिप रोकडे माजी नगरसेविका सुमनताई शेळके, पत्रकार सुरक्षा समिती बदलापुरचे अध्यक्ष भरत कारंडे यांनी सहभाग घेऊन पत्रकारांना शुभेच्छा दिल्यात. तर या प्रसंगी आलेल्या मान्यवरानी बाळशास्त्री जांभेकर आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमाना पुष्पहार घालून अभिवादन केले. दरम्यान या आरोग्य शिबीरा करिता मध्यवर्ती रुग्णालयाचे डॉ.सतिश गंगावणे आणि त्यांचे सहकारी यानी आलेल्या अनेक महिला पुरुषांच्या आरोग्याची तपासणी केली. दरम्यान या शिबीराला आलेल्या प्रमुख पाहुण्यांचे पत्रकार सुरक्षा समितीचे अध्यक्ष रामेश्वर गवई, कार्याध्यक्ष रमेश कांबळे, महासचिव गौतम वाघ, सचिव सुखनंदन गवई, उपाध्यक्ष सलिम मंसुरी, सहसचिव किरण तेलगोटे, कोषाध्यक्ष जगन्नाथ जावळे, सदस्य अशोक शिरसाट यांनी गुलाबाचे फुल देऊन स्वागत केले.

11 JAN TO 17 JAN 2021 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 09/01/2021 8:35 PM Page 1



# ग्रामीण भागाच्या विकासासाठी कल्याण-वाडा-तलवाडा-डहाणु रेल्वे होण्याची गरज

## रेल्वे प्रवासी संघटनेची मागणी

**वाडा/प्रतिनिधी**

देशाच्या आर्थिक राजधानीपासुन अवघ्या १०० किलोमीटर अंतरावर असलेला ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यातील ग्रामीण भाग व पालघर जिल्ह्यातील वाडा, विक्रमगड, जव्हार, मोखाडा हा परिसर स्वातंत्र्याच्या ७३ वर्षानंतरही मागास राहीला आहे. या भागाच्या विकासासाठी कल्याण-वाडा-तलवाडा-डहाणु असा रेल्वेमार्ग होण्याची कालाची गरज आहे. अशी मागणी ठाणे जिल्हा रेल्वे प्रवासी संघटनेने रेल्वे बोर्डाकडे केली आहे. ग्रामीण भागाच्या विकासासाठी गेल्या ३५ वर्षापूर्वी डहाणू-जव्हार-नाशिक या रेल्वे मार्गाबाबत भारत सरकारचे प्रयत्न सुरु होते. मात्र स्थानिक लोकप्रतिनिधींकडून फारसा प्रतिसाद न मिळाल्याने हा रेल्वे प्रकल्प बारगळला गेला. त्यानंतर डहाणू-तलवाडा-विक्रमगड- वाडा-पडघा-खडवली-कल्याण असा रेल्वे मार्ग होण्यासाठी ठाणे जिल्हा रेल्वे प्रवासी संघटनेने गेल्या २० वर्षापासून प्रयत्न सुरु केले आहेत.

ठाणे जिल्हा रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष ओमप्रकाश शर्मा यांनी या रेल्वे प्रकल्पाबाबत रेल्वे बोर्डाकडे पुन्हा निवेदन पाठवून आता नव्याने मागणी केली आहे. मुंबईच्या लगत असलेला ठाणे आणि पालघर जिल्ह्याचा बहुतांशी ग्रामीण भागाचा विकास पुरेशा दळणवळणाच्या सुविधा अभावी खुंटला आहे. या भागात ज्या प्रमाणात रेल्वे सेवा आणि रस्त्यांची निर्मिती व्हायला हवी होती, त्या प्रमाणात मात्र झालेली नाही. त्यामुळे या परिसराच्या विकासासाठी डहाणू - कल्याण रेल्वेमार्गाला मंजुरी मिळावी अशी मागणी ओमप्रकाश शर्मा यांनी रेल्वे बोर्डाकडे केली आहे. ठाणे जिल्हा रेल्वे प्रवासी संघटना गेल्या ३८ वर्षापासून रेल्वे प्रवाशांच्या विविध प्रश्नांवर कार्यरत असून केंद्र सरकार, रेल्वे मंत्रालय, रेल्वे बोर्ड, राज्य सरकार यांच्याशी समन्वय साधून लहानमोठ्या समस्यांचे निवारण करीत आहे. विकासापासून वंचित असलेल्या या भागात रेल्वेमार्ग झाल्यास येथील अनेक प्रश्न मार्गी लागतील, बेरोजगारी कमी होण्यास मदत होईल, त्याचबरोबर शेतीमालाला चांगली बाजारपेठ मिळून औद्योगिक क्षेत्रालाही चालना मिळेल, असे अनेक मुद्दे या निवेदनातून मांडले आहेत.

# वाडा ग्रामीण रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा द्या!

वाडा : वाडा हे ग्रामीण भागातील मध्यवर्ती ठिकाण असूनही येथील ग्रामीण रुग्णालय अनेक सोयी - सुविधांपासून वंचित आहे , त्यामुळे रुग्णांचे हाल होत आहेत म्हणून या रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देण्याची मागणी खा. कपिल पाटील यांनी राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांना पत्राद्वारे केली आहे. वाडा येथील लोकसंख्या एक लाख ६९ हजार ७७२ असून, या रुग्णालयात शहापूर, विक्रमगड, मोखाडा आणि भिवंडी तालुक्यातील रुग्ण उपचारासाठी येतात. या रुग्णालयात पुरुष आणि स्त्रियांसाठी एक कक्ष आहे. येथे ३५० ते ४०० च्या आसपास बाह्यरुग्ण, तर ५० ते ६० आंतररुग्ण तपासणीसाठी येत आहेत, तर महिन्याला ९ ० ते १०० प्रसूती होतात. त्यामुळे गुंतागुंतीच्या प्रसूतीसाठी गर्भवतींना ठाणे व मुंबई येथील सरकारी रुग्णालयात पाठवले जाते. त्यामुळे त्यांचे हाल होतात. शिवाय सर्पदंश, विचूदंश, गॅस्ट्रो व इतर आजाराच्या रुग्णांचीही संख्या मोठी आहे, तसेच महामार्गावर नेहमी अपघात होत असल्याने अपघातग्रस्तांनाही उपचारासाठी याच रुग्णालयात आणले जाते . या रुग्णालयात ३० खाटाच असल्यामुळे रुग्णांना जमिनीवरच उपचार घ्यावे लागत आहेत. ही सर्व गंभीर परिस्थिती पाहता येथील गोरगरीब जनतेच्या आरोग्याच्या दृष्टीने येथील ग्रामीण रुग्णालयाला लवकरात लवकर उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देण्यात यावा, अशी मागणी खा. पाटील यांनी केली आहे.

पान १ वरून....

## रुग्णालये बेफिकीर त्यांना कुणाचाच ...

वातावरण निर्माण केले जाईल. पण ज्या नवजात अर्भकानी जन्माला आल्यानंतर डोळे किलकिले करून या जगाकडे पाहिलेही नाही त्यांच्यावर असा भयंकर प्रसंग गुजरला तरी मुख्यमंत्री आणि आरोग्य मंत्र्यांनी आपल्या खुर्च्या सोडल्या नाहीत. यावरून राजकारणी किती असंवेदनशील आहेत हेच दिसून येते.

भंडारा येथील शासकीय रुग्णालयात जन्मलेली जी नवजात अर्भके जन्मताच कमजोर किंवा आजारी होती अशांना शिशु केअर युनिटमध्ये ठेवण्यात आले होते. या शिशु केअर युनिटचे दोन भाग आहेत. यातील एकात १० तर एकात सात अर्भकांना ठेवण्यात आले होते. मात्र त्यांच्यासाठी आवश्यक तो वैद्यकीय स्टाफ त्या ठिकाणी असायला हवा होता, तो पुरेसा नव्हता. रात्रपाळीचे डॉक्टर सुद्धा तेथे हजार नव्हते. मात्र शनिवारी मध्यरात्री २ वाजण्याच्या सुमारास एका एका परिचारिकेने आत जाऊन पहिले असता संपूर्ण युनिट धुराने भरून गेल्याचे आढळले. प्रकरण गंभीर असल्याने तिने तत्काळ आपल्या वरिष्ठांना कळवले. त्यानंतर अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. अग्निशमन दलाने रुग्णालय कर्मचाऱ्यांच्या मदतीने आग विझवली आणि एका युनिटमधील ७ अर्भकांना कसे तरी बाहेर कडून त्यांचा जीव वाचवला. मात्र दुसऱ्या युनिट मधील अर्भकांपर्यंत पोचण्यात त्यांना उशीर झाला आणि तब्बल १० अर्भकांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर लोकं संतप्त झाले आणि रुग्णालयासमोर जमून रुग्णालय प्रशासनाच्या विरोधात घोषणा देऊ लागले. त्यामुळे जास्त पोलीस बंदोबस्त मागवण्यात आला. या घटनेनंतर ज्या मातांनी आपली नवजात अर्भके या आगीत गमावली त्यांचे आक्रोश काळीज पिळवटून टाकणारे होते, तर त्यांच्या नातेवायीकांचा संताप अनावर झाला होता. या घटनेमुळे महाराष्ट्राच्या वैद्यकीय सेवेला एक प्रकारचे लांच्छन लागले आहे. या पूर्वी महाराष्ट्रात अशा घटना घडल्यात तर युपीमध्ये गॅस सिलेंडर अभावी १०० हून अधिक रुग्णांचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. या सर्वाला अर्थातच भंडारा शासकीय रुग्णालय आणि जिल्हा आरोग्य विभाग जबाबदार आहे. या रुग्णालयाला शॉर्टसर्किटने आग लागल्याचे सांगितले जाते. याचा अर्थ रुग्णालयाचे फायर ऑडिट झाले नव्हते? ते का झाले नाही आणि हि घटना घडली. तेंव्हा रात्रपाळीचे डॉक्टर नेमके कुठे होते? या युनिटची जबाबदारी ज्यांच्याकडे होती त्यांच्यावर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करणार का? असा सवाल केला जात आहे. भंडारा आग दुर्घटनेबाबत राष्ट्रपती कोविंद, पंतप्रधान मोदी, गृहमंत्री अमित शहा, स्मृती इराणी, देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, राज्यपाल कोशारी, काँग्रेस नेते राहुल गांधी आदी सर्व पक्षांच्या नेत्यांनी तीव्र दुख व्यक्त केले आहे.

## अनैतिक संबंधाचा भयंकर शेवट घडला...

तिचा पती रमेश यास अनेकदा बाहेरगावी जाण्याचा योग येत असे. अशा वेळी तिच्यापेक्षा वयाने कमी असलेल्या गॅरेज मालक रविंद्रकडे ती आकर्षित झाली होती. रविंद्रचे बाहु पिळदार होते. तो दिसायला आकर्षक होता. दोघे एकमेकांच्या रुपावर भाळले होते. पतीच्या गैर हजेरीत तिच्या व रविंद्रच्या प्रेमाला चांगलाच बहर आला होता. दोघांचे प्रेमसंबंध गावातील काही लोकांच्या लक्षात येण्यास वेळ लागला नाही. हळूहळू तिचा पती रमेश यास हा प्रकार समजण्यास वेळ लागला नाही. आपल्या पत्नीचे गॅरेजमालक रविंद्र महाले सोबत असलेले संबंध समजल्यामुळे तो देखील मनोमन नाराज झाला होता. त्याच्या मनात रविंद्र बद्दल द्वेषाची भावना निर्माण झाली. रविंद्रच्या पार्श्वभागावर काठीचे दोन प्रभावशाली रट्टे मारुन समज देण्याचा त्याने मनोमन विचार केला. त्यानुसार त्याने नियोजन देखील सुरु केले. नित्यनेमाप्रमाणे २६ डिसेंबर रोजी सकाळी आठ वाजता रविंद्र गॅरेजवर गेला. आज काहीतरी निमीत्त करुन रविंद्र यास आपल्या शेतात बोलावून एकटे गाठून त्याला अद्दल घडवायची असे त्या विवाहितेचा पती रमेशने (काल्पनिक नाव) मनाशी ठरवले होते. आपल्या पत्नीसोबत रविंद्रचे असलेले प्रेमसंबंध त्याला समजले होते. त्यामुळे रविंद्रच्या पार्श्वभागावर दोन प्रभावशाली रट्टे मारले म्हणजे त्याच्यात सुधारणा होईल, तो पुन्हा आपल्या पत्नीच्या नादी लागणार नाही असा रमेशच्या मनात विचार सुरु होता. त्यानुसार त्याने नियोजन देखील सुरु केले. दुपारी बारा वाजेच्या सुमारास रमेश त्याची बुलेट घेवून गॅरेजवर गेला. त्याने रविंद्रला म्हटले की आमच्या शेतात पपईचे व्यापारी आलेले आहेत. तसेच शेतात माझ्या दुसऱ्या मोटारसायकलची चेन तुटलेली आहे. ती चेन जोडणे गरजेचे आहे. तु माझ्या बुलेटवर डबलसिट बसून माझ्यासोबत शेतात चल. तेथे जागेवरच शेतातील मोटारसायकलची चेन बसवून दे. यावेळी गॅरेजवर शिकावू कारागीर म्हणून रविंद्रच्या भावाचा शालक वैभव शेळके हजर होता. त्यावेळी दुपारचे साधारण साडेबारा वाजले होते. मोटार सायकलची चेन बसवण्यासाठी आवश्यक असणारे पान्हे सोबत घेत रविंद्र बुलेटवर बसला. त्यावेळी शेतात अगोदरच रमेशचा भाचा व शालक, शालकाचा मित्र व शेत सालदार असे हजर होते. बुलेटवर आणलेल्या रविंद्र यास बांबुने मारहाण करण्याचा प्लान केवळ बुलेट चालक रमेशसह त्याचा भाचा व शालक यांनाच माहिती होता. शालकासोबत आलेल्या मित्राला देखील आता काय होणार आहे हे माहिती नव्हते. मोटार सायकलची तुटलेली चेन दुरुस्त करण्याचा बहाणा करुन गॅरेज मालक रविंद्र यास शेतात आणले गेले. रविंद्र बुलेटवरुन खाली उतरला. चेन दुरुस्तीसाठी खाली वाकताच रविंद्र यास रमेशसह त्याच्या भाच्याने व शालकाने धरले. तिघांनी मिळून रविंद्रच्या पायावर बांबूने मारहाण सुरु केली. त्यानंतर काही वेळाने रविंद्रचे पाय ठिबकच्या नळीने बांधण्यात आले. त्याला तशाच अवस्थेत तिघांनी मिळून ओढत ओढत पपईच्या शेतात नेले. पुन्हा त्या ठिकाणी त्याला बेदम मारहाण करण्यात आली. अर्धमेल्या रविंद्रला दवाखान्यात सोडून देण्यासाठी रमेशच्या शालकासह त्याच्या मित्राने त्याला मोटारसायकलवर मध्यभागी बसवले. मात्र रविंद्रने आपला जिव सोडला होता. त्याचा श्वासोश्वास थांबलेला होता. त्याला केवळ मारहाण करणे एवढाच रमेशचा उद्देश होता. मात्र रविंद्रला बेतापेक्षा जास्त मार बसल्यामुळे त्याने या जगाचा सरत्या वर्षातच निरोप घेतला होता. आता याच्या मृतदेहाचे करायचे काय असा विचार त्यांना पडला. त्यामुळे सरकारी दवाखान्यात नेण्यापुर्वी रस्त्यातच मृत्युमुखी पडलेल्या रविंद्रला बेवारस सोडून त्यांनी पलायन केले. दरम्यान गॅरेजवर कामाचा खोळंबा झालेला होता. आलेले ग्राहक रविंद्रची वाट बघत होते. शिकावू कारागीर वैभव शेळके याच्याकडून ग्राहकाच्या मोटारसायकलची चेन उघडत नव्हती. त्यामुळे तो देखील रविंद्रची गॅरेजवर येण्याची वाट बघत होता. त्यावेळी त्याला समजले की गॅरेजमालक रविंद्र महाले हा सरकारी दवाखान्याच्या रस्त्यावर मयत अवस्थेत पडलेला आहे. त्याचा अपघात झाला असल्याची वार्ता सर्वत्र पसरली होती. प्रत्यक्षात त्याचा मारहाणीत मृत्यू झाला होता. या घटनेची माहिती पहुर पोलिस स्टेशनला समजताच पो.नि. राहुल खताळ व त्यांचे सहकारी पोलिस उप निरिक्षक किरण बर्गे, अमोल देवढे, हे.कॉ. भरत लिंगायत, पोलिस नाईक विनय सानप व चंद्रकांत ब्राम्हणे अशांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. मृत्युमुखी पडलेल्या तरुणाची ओळख पटलेली होती. तो मोटार सायकल मॅकेनिक व गॅरेजमालक रविंद्र महाले असल्याचे लोकांनी ओळखले होते. त्याच्या मृतदेहाची पाहणी केली असता त्याच्या पार्श्वभागावर जोरदार प्रभावशाली फटके बसल्याचे दिसून येत होते. त्याच्या पायावर देखील मारहाण झाल्याचे दिसून येत होते. त्यामुळे हा अपघात नसून मारहाणीत झालेला मृत्यू असल्याचे दिसून येत होते. या गंभीर घटनेची माहिती मिळताच उप विभागीय पोलिस अधिकारी इश्वर कातकाडे यांनी देखील घटनास्थळी भेट देत सर्वतोपरी पाहणी केली. उप विभागीय पोलिस अधिकारी इश्वर कातकाडे यांनी स्वत: या गुन्ह्याच्या तपासकामी लक्ष घातले. सुरुवातीला या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद सीआरपीसी १७४ नुसार ५७/२० या क्रमांकाने घेण्यात आली. मयत रविंद्र महाले याचा मृतदेह पहुर ग्रामिण रुग्णालयात व तेथून जळगाव सामान्य रुग्णालयात उत्तरीय तपासणीकामी नेण्यात आला. रविंद्र महाले याचा मृत्यू मारहाणीमुळे झाल्याचे वैद्यकीय तपासणीत स्पष्ट झाले होते. या प्रकरणी तपासकामी गावातील एका झेरॉक्स दुकानावर बसवण्यात आलेल्या सीसीटिव्हीचे फुटेज तपासण्यात आले. या फुटेजमधे दुपारी बारा वाजेपासूनचे चित्रीकरण तपासण्यात आले. या फुटेजमधे बुलेटवर मयत रविंद्र यास बुलेटधारक रमेश (काल्पनिक नाव) व त्याचा भाचा असे दोघे जण घेवून जात असल्याचे दिसून आले. ज्या वेळेचे हे चित्रीकरण होते तेव्हापासून रविंद्रचा मोबाईल देखील लागत नव्हता. घटना उघडकीस आल्यापासून बुलेटधारक व त्याचा भाचा गावातून बेपत्ता होते. त्यामुळे मयत रविंद्रचा भाऊ अशोक महाले याने दिलेल्या फिर्यादीनुसार पहुर पोलिस स्टेशनला भाग ५ गु.र.न. ३५०/२० भा.द.वि. ३०२, ३४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. अशा प्रकारे सीसीटीव्हीच्या माध्यमातून पोलिस यंत्रणेस आरोपींच्या नावाचा शोध लागला होता. या गुन्ह्यातील मुख्य आरोपीला अटक केल्यानंतर तपासात क्रमाक्रमाने इतर सर्व आरोपींची नावे व त्यांनी गुन्ह्यात कसा सहभाग घेतला याचा घटनाक्रम समोर आला. त्या सर्वांना अटक केल्यानंतर न्यायालयासमोर हजर करण्यात आले. मोटार सायकल मॅकेनिक रविंद्र महाले याचे बुलेट धारकाच्या पत्नीसोबत प्रेम संबंध होते. त्यामुळे त्याला इतरांच्या मदतीने त्याने मारहाण केली. प्रत्यक्षात त्याला केवळ मारहाण करुन सोडून देण्याचा त्यांचा विचार होता. मात्र बेदम मारहाणीत रविंद्रचा मृत्यू झाला. अटकेतील पाच पैकी एक अल्पवयीन विधीसंघर्षित आरोपी आहे. त्याची न्यायालयाच्या आदेशाने बालनिरिक्षणगृहात रवानगी करण्यात आली. इतर चारही जणांची पोलिस कोठडी संपल्यानंतर जळगाव सब जेलमधे रवानगी करण्यात आली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पाचोरा उप विभागाचे उप विभागीय पोलिस अधिकारी इश्वर कातकाडे करत आहेत. त्यांना पहुर पोलिस स्टेशनचे पोलिस निरिक्षक राहुल खताळ व त्यांचे सहकारी पोलिस उप निरिक्षक किरण बर्गे, पोलिस उप निरिक्षक अमोल देवढे, पो.हे.कॉ. भरत लिंगायत, पोलिस नाईक विनय सानप , पोलिस नाईक चंद्रकांत ब्राम्हणे व पोलिस कर्मचारी ज्ञानेश्वर बाविस्कर सहकार्य करत आहेत.

## आंतरजातीय विवाह प्राणावर बेतला...

पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आली होती. तक्रार दाखल केल्यानंतर पोलीसांनी मुंबई,ठाणे आणि नवी मुंबई पोलीसांना या नंदीताचे छायाचित्र पाठवून तिच्या शोध कामात मदत करण्याचे आवाहन केले होते. नंदिताचे कुटुंब ही तिचा शोध घेत होते.परूंतू तिचा ठावठिकाणा लागत नव्हता. त्यामुळे घरातील सर्वच चिंतेत होते. पोलीस ही आपल्या परीने चौकशी करीत होते. २४ डिसेंबर रोजी मालवणी पोलीसांना त्याच्या हद्दीमध्ये एका महिलेचा मृतदेह आढळून आला होता. मृतदेह कुजलेल्या अवस्थेत होता. तो मृतदेह पोलीसांनी ताब्यात घेऊन तो सरकारी रूग्णालयात पाठवला.मालवणी पोलीसांनी याबाबतची माहिती कांदिवली पोलीसांना ही दिली. कांदिवली समतानगर पोलीसांनी तात्काळ मृतदेहाची पाहणी केली असता त्या मृतदेहाची आणि कांदिवली पोलीस ठाण्यात नोंदवलेल्या नंदीता रॉय हिच्यावर्णाशी मिळते जुळते होते. पोलीसांनी ताबडतोब नंदीताच्या पतीला व त्यांच्या कुटुंबियांना बोलवून घेऊन त्यांना मृतदेह दाखवला. मृतदेहाची परिस्थिती खूपच खराब असली तरी त्यांनी मृतदेहाच्या कपड्यांवरून तो मृतदेह नंदीताचाच असल्याचे पोलीसांना सांगितले. आता पोलीस अधिकच बुचकळ्यात पडले होते. नंदीता हरवली कशी.? तिचा खून कुणी केला असेल.? तिचा मृतदेह मालवणी पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये कसा.? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे पोलीसांना शोधायची होती. परूंतू नंदीता हरवल्याची तक्रार कांदिवली पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आली होती म्हणून या खूणाच्या गुन्ह्याचा तपास कांदिवली समतानगर पोलीसांनी आपल्या हाती घेतला होता. पोलीसांनी या तपासाला एका विशेष पथकाची स्थापना केली. या पथकातील पोलीसांनी अत्यंत गोपनीयपणे तपास सुरु केला. पोलीसांनी अगदी नंदीता रॉयच्या घरातील माहिती घेतली असता पोलीसांना या तपासाला वेग मिळेल असा धागा सापडला. नंदीताचा सासरा कमल रॉय हा नंदीताचा खूप राग करीत होता. नंदीताने आपल्या मुलाबरोबर आंतरजातीय विवाह केल्यामुळे तो नंदीताला सतत छळत होता. तिला मानसिक व कधी कधी शारीरीक पिडा करण्याचा प्रयत्न करीत होता. हि महत्त्वाची माहिती मिळताच पोलीसांनी कमल रॉय या ५५ वर्षीय संशयीतास ताब्यात घेऊन चौकशी करण्यास सुरुवात केली. संशयित आरोपी पोलीसांना उडवाउडवीची उत्तरे देत होता.तो विषयाला बगल देत तपास पथकाला हुलकावणी देत होता. नंदीता हिने आपल्या मुलाशी आंतरजातीय विवाह केल्यामुळे सासऱ्याचा सुनेवर राग होता. पोलीसांना खात्री पटली की नंदीताच्या खूनात तिचा सासरा कमल याचाच हात आहे तेंव्हा पोलीसांनी चौकशीची दिशा अधिकच कठोर करताच कमल रॉयने गुन्ह्याची कबुली दिली. कृष्णा सिंग (वय-५५) आणि प्रमोद गृप्ता यांच्या मदतीने आपणच नंदीताचा काटा काढल्याचे पोलीसांना सांगितले. पोलीसांनी ताबडतोब हालचाल करीत कृष्णा आणि प्रमोद या आरोपींना अटक केली.नंदीताच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी या आरोपींनी रात्रीच्या वेळी रिक्षातून बोरिवली पश्चिम इथल्या एका नाल्यात तिचा मृतदेह फेकून दिला होता. आपल्यावर कुणीच संशय घेणार नाही अशी पक्की खात्री कमल रॉय याची झाली होती. म्हणूनच त्याने नंदीताच्या हत्येचा कट रचून तिची हत्या केली.

## ब्ल्यू फिल्म बघून करीत होता रासलीला...

हद्दीतील दहेगाव येथील लॉजवर हि घटना घडली. पॉर्न क्लिप पाहून सेक्स करणे एका प्रमीयुगलासाठी जीवघेणे ठरल्याची घटना नागपुरात घडली आहे. यामध्ये २८ वर्षीय तरुणाचा गळफास लागून लागून मृत्यू झाला आहे. खापरखेडा पोलीस स्टेशनच्या हद्दीत एक लॉजच्या रुमवर प्रेमीयुगल पॉर्न क्लिप बघून वेगळ्या पद्धतीने शारीरिक संबंध प्रस्थापित करत असताना ही घटना घडली. मयत तरुण विवाहित असून त्याला लहान मुलगा आहे. तरही तो त्या तरुणीसोबत रिलेशनमध्ये होता. मृतक तरुण आणि २० वर्षीय तरुणीमध्ये गेल्या काही वर्षापासून प्रेम संबंध आहे. काल दोघांनीही बाहेर फिरायला जाण्याचा बेत आखला. त्यांनी खापरखेडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दहेगाव (रंगारी) परिसरात असलेल्या महाराजा लॉज वरील एक खोली बुक केली होती. तिथे गेल्यानंतर दोघांनी शारीरिक संबंध प्रस्तावित केले. यावेळी वेगवेगळ्या पोजिशनमध्ये शारीरिक संबंध प्रस्तावित करताना दोघांनी दोरीचा उपयोग केला. तरुण खुर्चीवर बसल्यानंतर त्याचे हात आणि पाय दोरीने बांधण्यात आले. त्याच वेळी ती दोरी तरुणाच्या गळ्याच्या भवती सुद्धा अवळली गेली. या पोजिशनमध्ये सेक्स झाल्यानंतर ती तरुणी बाथरूम मध्ये गेली असता. तो तरुण खुर्ची सहखाली कोसळला, ज्यामुळे त्याच्या गळ्याभोवती असलेला दोर आवळला गेला होता, ज्यामुळे त्याला गळफास लागून त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. ज्यावेळी ती तरुणी बाथरूमच्या बाहेर आली, तो पर्यत त्या तरुणाचा मृत्यू झाला होता. दरम्यान हे सर्व करताना त्यांनी स्वत:चे फोटोही काढले असल्याचं तपासात समोर आलं आहे.

## चोरीच्या गुन्ह्यात ज्यांना अटक झाली...

असल्याची खात्री पटवली. मात्र मुबारक व शर्मा हे दोन चोर हाती लागताच त्यांची कसून चौकशी करण्यात आली आणि आपणच रवीची हत्या केल्याचे त्यांनी कबुल केले. याबाबतचे कारण असे होते कि मुबारक आणि रवी मित्र होते. पण रविचे जिच्याशी प्रेमसंबंध होते तिच्याशी मुबारक लगट करण्याचा प्रयत्न करायचा. त्यावरून दोघांमध्ये वाद झाला. दरम्यान मुबारक आणि शर्माने रवीचा काटा काढण्याची योजना आखली आणि ३० जून रोजी त्याला जोगेश्वरी पुलावर बोलावून त्याची हत्या करून त्याचा मृतदेह मिठी नदीत फेकून फरार झाले. मात्र पोलीस तपासात त्यांचे पितळ उघडे पडले आणि चोरीच्या गुन्ह्यातील दोन आरोपी खुनी निघाले.

पान ८ वरून....

## वैचारिक परंपरेचा पाया बाळशास्त्री ...

आव्हान आहे. आतापर्यंत मोठ-मोठे दिग्गज लेखक वर्तमानपत्रात लिहित होते. येणाऱ्या काळात याचे मूल्यमापन होणे गरजेचे आहे. संकूचित मनोगति दूर करण्याची आवश्यकता आहे. कोणतीही कलाकृती जिवंत असावी, जे मांडायचे आहे, ते मुक्तपणे मांडू दिले पाहिजे, असे मत डॉ. दिलीप पांढरपट्टे यांनी यावेळी मांडले. सामाजिक कार्यकर्ते डॉ.विश्वंभर चौधरी म्हणाले की, या देशाने आजही महात्मा गांधी यांचे विचार स्विकारण्याची आवश्यकता आहे. लोकशाही अधिक सदृढ करण्यासाठी घटनेनुसार कार्य होण्याची आवश्यकता आहे. शासनाने शिक्षण आणि आरोग्य या दोन महत्वाच्या बाबींवर लक्ष देणे गरजेचे आहे. देशाचा वैज्ञानिक विचार व दृष्टीकोन वाढविण्याची गरज आहे. शालेय शिक्षण अभ्यासक्रमात राज्यघटना हा विषय शिकवणे आवश्यक आहे. गांधीजींनी विकेंद्रिकरणाची भूमिका मांडली होती. प्रत्यक्षात तसे घडले नाही. प्रशासकीय आणि राजकीय विकेंद्रिकरण होणे आवश्यक आहे. सद्या लोकशाहीचे केंद्रिकरण होते आहे, हेच खरे मोठे आव्हान आहे. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांनी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन केले. उपसंचालक (माहिती) कोकण विभाग डॉ.गणेश मुळे यांनी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्याबद्दल माहिती दिली व कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. तसेच या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नवीमुंबई प्रेस क्लबचे अध्यक्ष श्री.मनोज जालनावाला यांनी केले. कार्यक्रमात क्रियाशिल प्रेस क्लब पनवेलच्यावतीने प्रेस क्लबचे संस्थापक विजय कडू व पदाधिकारी यांनी सचिव तथा महासंचालक माहिती व जनसंपर्क डॉ.दिलीप पांढरपट्टे यांचा सत्कार केला. या कार्यक्रमास पत्रकार, नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. यावेळी सोशल डिस्टन्सिंगसह सॅनिटायझरचा योग्य वापर करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी नवी मुंबई युनियन ऑफ जर्नालिस्टसचे अध्यक्ष मच्छिंद्र पाटील यांनी मान्यवरांचे आभार मानले.

## मुख्याध्यापिका रजिया शेख यांना...

उपसंचालक औंदुबर ऊकिरडे, महाराष्ट्र राज्य न.पा. व म.न.पा. शिक्षक संघ जिल्हा अध्यक्ष श्रीमती महादेवी चिकाटे आणि राज्य महिला सदस्य श्रीमती मायादेवी कांबळे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. शेख रजिया यांचे शिक्षण अधिकारी एम एल जाधव, जिल्हा अध्यक्ष श्रीमती एम पी चिकाटे, राज्य महिला सदस्य यांनी अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या.

## सावित्रीबाई फुले यांनी येणाऱ्या शेकडो...

मुलींना घरात पायात बेड्या घालून कोंडले होते त्यांना बाहेर आणून त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले. त्यांनी येणाऱ्या शेकडो पिढ्यांसाठी मोठा त्याग केला. तो आपण फेडू शकत नाही. सनातनी प्रवृत्तीच्या लोकांनी त्यांना अनन्य मानसिक व शारीरिक यातना दिल्या. त्या काळात विधवा व निराधार महिलांवर अन्याय अत्याचार झाले. त्या गरोदर राहिल्या. त्यातून त्यांना झालेल्या नवजात मुलांना उघड्यावर सोडून देण्यात आले. अशा विधवा, निराधार अत्याचारित महिला आणि बेवारस नवजात बालकांसाठी सावित्रीबाई फुले आणि महात्मा फुले दांपत्यांनी अनाथ आश्रम सुरू केले. त्यांचे संगोपन केले. त्यांना मायेचा आधार दिला. त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून एक नवीन जीवन प्रदान केले. जातीपातीच्या बेड्या तोडून सर्वांना एकसमान वागवले. महिलांनी चुल आणि मूल या चाकोरीत अडकून न राहता महिला सशक्तीकरण व सबलीकर यासाठी सरकार राबवित असलेल्या उपक्रमांवर निव्वळ अवलंबून न राहता स्वतः पुढाकार घेऊन आपला आर्थिक व सामाजिक विकास साधला पाहिजे. नुसते सुन्दर दिसून चालत नाही तर सावित्रीबाई यांच्या विचारांची शिदोरी अंगी बाळगून चांगल्या विचारांचे अनुकरण करा. आपण क्रांतीज्योती सावित्रीबाई यांच्या लेकी आहोत. आपली तुलना कुणा सिने नटीशी होता काम नये याची दक्षता घ्यावी. आजच्या पिढीतील तरुणींनी सावित्रीबाई यांचे जीवन चरित्र समोर ठेऊन जीवनात मोठे स्वप्न उराशी बाळगून ते पूर्णत्वास नेण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले तरच आजच्या या धकाधकीच्या जीवनात आपण टिकून राहू असेही श्रीम. अनिता सातपुते म्हणाल्या. चर्मकार सेवा सोसायटीचे उत्तर भारतीय समितीचे जिल्हाध्यक्ष मल्लूराम कुरील, राहुल कुरील यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून कार्डियाक अँब्युलन्सचे डॉ. अरविंद पवार, हेमंत पळशीकर, सौ. वर्षाताई पळशीकर, मनीषा कांबळे, पत्रकार मुकेश जय, बहुजन विकास आघाडीचे कार्यकर्ते विजय पात्रे, सकल मराठा उद्योजक संघाचे किरण निवूंगरे व संतोष वोरनाक, राष्ट्रवादीचे बरकत अली शेख आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी दोन छोट्या सावित्रीबाईंचा फुलगुच्छ देऊन सन्मान झाला. चर्मकार सेवा सोसायटी वाडा तालुका आणि भागीरथी डी. भोईर प्रतिष्ठानचे अध्यक्ष दिनेश अरुण भोईर व दिशा दिनेश भोईर यांच्या वतीने पाच महिलांना कोरोना योद्धा सन्मान पत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मनेश शिंगणे, गेनू कारंडे, लाला खरात, रमेश डोंगरे, राजेश भोईर, भरत भोईर आणि कै. अण्णासाहेब वर्तक स्मारक वसाहत मधील रहिवासी यांनी मोलाचे सहकार्य देऊन अथक परिश्रम घेतले.

## कोरोना लसीकरणासाठी आरोग्य ...

म्हणजे आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आहे, असे मत व्यक्त केले. जिल्ह्याला ही लस प्राप्त होताच पहिल्या टप्प्यात आशा, आरोग्य व ग्रामीण रुग्णालयांच्या ११,९१३ खाजगी शहरी व ग्रामीण भागातील ५४९८ आरोग्य कर्मचारी यांना ही लस देण्यात येईल. दुसऱ्या टप्प्यात पोलीस, ५० वर्षावरील सर्व नागरिक, व ५० वर्षाखालील रक्तदाब, मधुमेह, कर्करोग अशा रुग्णांना लस देण्यात येईल. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.दयानंद सूर्यवंशी यांनी लसीकरण मोहिमेत समाविष्ट असलेल्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. यावेळी जि.प.सदस्या अनुश्री पाटील, जिल्हा शल्य चिकित्सक अनिल थोरात, अति. जिल्हा आरोग्य आधिकारी डॉ.मिलिंद चव्हाण, सहा.जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सागर पाटील तालुका आरोग्य अधिकारी अभिजित खंदारे, आयुष अधिकारी डॉ.तन्वीर शेख, डॉ.महेश बडगुजर, इतर आरोग्य अधिकारी कर्मचारी, आशा, अंगणवाडी सेविका उपस्थित होत्या.

11 JAN TO 17 JAN 2021 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 09/01/2021 8:36 PM Page 1



# चोरी करणाऱ्या सफाई कामगाराला केले जेरबंद

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर शहरातील वयस्कर वृद्धांच्या घरातून १४ लाख ७५ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरून पळून गेलेल्या सफाई कामगाराला पंढरपूर शहर पोलिसांनी अटक करून त्यांच्याकडून चोरीतील ११ लाख २० हजार ५०० रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आल्याची माहिती सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे. राहुल हरिश्चंद्र पवार (वय २१ रा. महावीरनगर, पंढरपूर जि.सोलापूर) असे आरोपीचे नाव आहे. हा घरोघरी जाऊन साफसफाई काम करतो, त्यानुसार पंढरपूर शहरातील महावीरनगरातील संजीवनी अजित फडे या वृद्ध दाम्पत्यांचाही घरी तो महिन्यातून एक दोनदा सफाईचे काम करण्यास येत होता. दरम्यान संजीवनी फडे व अजित फडे हे दोघे त्यांच्या मुलीला पुण्याला सोडण्यासाठी ९ डिसेंबर रोजी गेले आणि १३ डिसेंबरला पुन्हा पंढरपूरला त्यांच्या घरी परत आले. त्यानंतर त्यांनी त्यांच्या घरातील मौल्यवान वस्तू आहेत का त्याची तपासणी केली असता पलंगाखाली ठेवलेले सोन्याचे ३५ तोळे वजनाचे दागिने, चांदीची ५ किलो ९० ग्रॅम वजनाचे भांडे, पितळी भांडी आणि एक मोबाईल असा एकूण १४ लाख ७५ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरून नेला. याबाबत पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात चोरीची गुन्हा नोंद झाली



होती. त्यानुसार गुन्ह्याचा तपास करण्यास सुरुवात झाली. परंतु तपासामध्ये काहीच उघड होत नव्हते. त्यामुळे त्यांच्या घरी सफाई करण्यासाठी येणाऱ्या तरुणाची चौकशी केली असता तो कोकणामध्ये काही मित्रांना घेऊन मौजमजा करीत असल्याचे समजले. त्यावरून त्याला ताब्यात घेऊन विश्वासात घेऊन चौकशी केल्यावर त्याने चोरी केल्याचे कबूल केले. घराची सफाई करण्यासाठी आल्यावर तो नेहमी घराचा वरचा दरवाजा उघडा ठेवत होता आणि फडे पती-पत्नी पुण्याला गेल्यावर त्याने चोरी केल्याचे कबूल करून चोरीतील २८ तोळे सोन्याचे दागिने, ३ किलो ५०० ग्रॅम वजनाचे चांदीचे भांडे आणि पितळी भांडे व मोबाईल असा एकूण ११ लाख २० हजार ५०० रुपयांचा ऐवज त्यांच्याकडून पोलिसांनी जप्त केले आहे. ही सदर कामगिरी पंढरपूर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अरुण पवार, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र गाडेकर, हवालदार सुरज हेंबाडे, पोलीस शिपाई राजेश गोसावी, हवालदार शरद कदम, बिपीनचंद्र ढेरे, पोलीस नाईक गणेश पवार, इरफान शेख, शोएब पठाण, सिद्धनाथ मोरे, सुजित जाधव, संजय गुठाळ, समाधान माने, सुनील बनसोडे, अन्वर अत्तार यांनी यशस्वीपणे पार पाडली आहे. या पत्रकार परिषदेत सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते व अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे उपस्थित होते.

# कोकण भवन वाहनचालक संघटनेकडून कोरोना योध्दा व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**नवी मुंबई/प्रतिनिधी**

शासकीय कामकाजात दैनंदिन कार्य सुरळीत ठेवण्यासाठी सर्व घटकांसोबतच वाहनचालकाची भूमिकाही तेवढीच महत्त्वाची असते. गुणवंत पाल्यांनी भविष्यात कितीही मोठे व्हावे. कोणत्याही पदावर जावे परंतु प्रथम एक चांगला माणूस बनण्याचा प्रयत्न करावा, असे प्रतिपादन उपायुक्त (सामान्य) मनोज रानडे यांनी केले. कोरोना काळात कर्तव्य बजावणाऱ्या वाहनचालक, पोलीस आणि आरोग्य कर्मचाऱ्यांचा तसेच शालेय परीक्षांमध्ये गुणवत्ता प्राप्त केलेल्या वाहनचालकांच्या पाल्यांचा सत्कार शासकीय वाहन चालक संघटना मंत्रालय, मुंबई शाखा ठाणे जिल्हा यांच्या वतीने आज कोकण भवन बैठक कक्ष पहिला मजला येथे करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते..



यावेळी व्यासपीठावर सर्व मनोज रानडे, उप आयुक्त सामान्य प्रशासन, विकास रामगुडे, मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, बांद्रा, मुंबई, आर. एम. गोसावी, अधिक्षक अभियंता, रायगड सा.बा. मंडळ, कोकण विभाग, डॉ. गणेश मुळे, उपसंचालक (माहिती) कोकण विभाग, रामदास आरेकर, वरिष्ठ खोदण अभियंता, भूजल सर्वेक्षण विभाग, डॉ.गणेश धुमाळ, वैद्यकीय अधिकारी, कोकण भवन, श्रीम. माधुरी डोंगरे, नायब तहसिलदार, कोकण विभाग आदि मान्यवर उपस्थित होते. दिप प्रज्वलन करुन या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी कोरोना महामारीच्या कठीण काळात आपले कर्तव्य बजावणाऱ्या वाहनचालक, पोलीस आणि आरोग्य कर्मचाऱ्यांना मानपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे व पूष्पगूच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. मुख्य अभियंता विकास रामगुडे यांनी भगवान गौतम बुध्दांनी सांगितलेल्या प्रज्ञा, शील, करुणा या तीन गुणांचा विद्यार्थ्यांनी आपल्या आयुष्यात कसा समावेश करावा हे समजवून सांगितले. खोदण अभियंता रामदास आरेकर यांनी वाहन चालकांव्दारे आयोजीत करण्यात आलेला असा मोठा कार्यक्रम पहिल्यांदाच पाहिल्याचे सांगून वाहन चालक संघटनेचे अभिनंदन केले. अधिक्षक अभियंता आर.एम. गोसावी यांनी संघटनेचे अध्यक्ष जनार्दन म्हात्रे हे त्यांच्या गाडीवर वाहनचालक असून ते कशा प्रकारे आदर्श वाहन चालक आहेत. वाहन चालकाने आपल्या गाडीची व साहेबाची कशी काळजी घेतली पाहिजे हे म्हात्रेंकडून शिकावे असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित डॉ.गणेश मुळे यांनी देखील आपले कोरोना महामारीत लॉकडाऊनच्या काळात केलेल्या कामाचे अनुभवन सांगितले या काळात आपल्या वाहनचालकाची शासकीय कामात कशी मदत झाली हे सर्वासामोर मांडले व आपल्या वाहनचालकांचे अभिनंदन केले. आरोग्य अधिकारी डॉ.गणेश धुमाळ म्हणाले की, कोरोनाची भीती असताना देखील वाहनचालक, पोलीस, आरोग्य कर्मचारी यांनी आपले कर्तव्य बजावले आहे. असा कार्यक्रम सर्वत्र असण्याची आवश्यकता आहे. या केलेल्या कामाबद्दल आपल्याच वरिष्ठांकडून कौतुकाची थाप मिळावी हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले असल्याचे शासकीय वाहन चालक संघटना मंत्रालय, मुंबई शाखा ठाणे जिल्हयाचे अध्यक्ष जनार्दन म्हात्रे यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्रीमती प्रतिभा पाटणे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शशिकांत भोसले, चंद्रकांत चंद्रराव, दिपक पवार, जितेंद्र यादव यांनी परिश्रम घेतले.

# पोलीस बांधवांच्या मानवतावादी कामगिरीचा सदैव अभिमान –गृहमंत्री अनिल देशमुख

**मुंबई/प्रतिनिधी**

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय या ब्रीद वाक्याला अनुसरून पोलीस बांधव आपले कर्तव्य करत असतात. त्यातून जेव्हा एखादे मानवतावादी कामगिरी त्यांच्या हातून घडते त्यावेळेस पोलिसांचा, त्यांच्या कामगिरीचा मला प्रचंड अभिमान वाटतो. असे भावोद्गार गृहमंत्री अनिल देशमुख यांनी आज काढले. रेल्वे पोलिस दलातील पोलीस कॉन्स्टेबल सुजीतकुमार निकम यांनी स्वतःचे प्राण धोक्यात टाकून दहिसर रेल्वे स्थानकावर एका ६० वर्षीय व्यक्तीचे प्राण वाचवले. त्याबद्दल त्यांचा सत्कारआज ज्ञानेश्वरी बंगला येथे करण्यात आला, त्याप्रसंगी ते बोलत होते. १ जानेवारी रोजी गणपत सोलंकी हे साठ वर्षाचे गृहस्थ दहिसर येथून खार ला जाण्यासाठी प्लॅटफॉर्मवर उभे होते. त्यावेळी दोन नंबर प्लॅटफॉर्मवरून स्लो लोकल जाणार होती, ती



पकडण्यासाठी फ्लाय ओव्हर ब्रिजचा वापर न करता रुळावर उडी मारून धावत दुसऱ्या बाजूस असलेली लोकल पकडण्याचा त्यांचा विचार होता. त्यानुसार त्यांनी रूळावर उडी मारली. परंतु विरुद्ध दिशेने येणारी फास्ट लोकल पाहता ते गांगरून गेले त्यांना परत फलाटावर चढता येत नव्हते. हे दृश्य तिथे कर्तव्यावर असलेले पोलीस शिपाई सुजीत कुमार यांनी पाहिले. परिस्थितीचा अंदाज घेऊन त्यांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता गणपत सोलंकी यांना फलाटावर ओढून घेतले. व त्यांचा जीव वाचविला. त्यानंतर त्यांच्या मुलाला बोलून त्यांना त्यांच्याकडे सुपूर्द केले. या कामगिरीबद्दल निकम यांचा सत्कार आज गृहमंत्र्यांनी शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन केला. यावेळी रेल्वे पोलीस उपायुक्त प्रदीप चव्हाण, वरिष्ठ पोलीस निरीक्षक भास्कर पवार उपस्थित होते. पोलीस दलातील शिपाई पासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत उत्तम काम करणाऱ्या तसेच समाजाप्रती आपला वेगळा तसा उमटवून पोलीस विभागाचे नाव उंचाविणाऱ्या कर्मचाऱ्यांचा गृहमंत्र्यांनी नेहमीच सन्मान केला आहे.

कोरोना योद्धे, अद्वितीय काम करणाऱ्या नवदुर्गा, कर्तव्यदक्ष असलेले पोलीस कर्मचारी या सर्वाचा सन्मान गेले वर्षभर वेगवेगळ्या माध्यमातून गृहमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला आहे. राज्यातील सव्वा दोन लाख पोलिस कर्मचाऱ्यांचा गृहमंत्री या नात्याने कुटुंब प्रमुख म्हणून पोलीस बांधवांचे मनोबल वाढवणे त्यांची आस्थेवाईकपणे विचारपूस करणे, त्यांच्या सुख दुःखाची दखल घेणे हे आपले कर्तव्य व आपली ती नैतिक जबाबदारी असल्याचे गृहमंत्री अनिल देशमुख सातत्याने सांगतात.

# शिवसेना युवा पदाधिकाऱ्यांच्या तक्रारी नंतर वाडा बस स्थानकात स्वच्छता!




**वाडा/प्रतिनिधी**

दोन दिवसांपूर्वी शिवसेनेच्या युवा पदाधिकारी अलकनंदा भानुशाली यांनी वाडा बस स्थानकाला भेट दिली असता बस स्थानका शेजारी असलेल्या सुलभ सौचालयतून अतिशय दुर्गंधी पसरल्याचे त्यांना जणवल्याने त्यांनी बस स्थानकातील नियंत्रण कक्षात लेखी तक्रार केली होती याची दखल घेत वाडा आगाराचे आगार प्रमुख मधुकर धांगडा यांच्या सूचनेनुसार वाडा बस स्थानक व परिसर स्वच्छ करण्यात आला.

# गांधीजींचे सार्वजनिक कामांचे व्यवस्थापन, महाराष्ट्रातील गांधीजी याविषयावर 'झाला दाम्पत्याची' पीएच.डी.

**जळगाव/प्रतिनिधी**



कृषी क्षेत्रातील प्रख्यात उद्यमी तसेच गांधी विचारांची ट्रस्टीशीप स्वीकारणारे, तत्त्वशील विचारवंत, चिंतक श्रद्धेय डॉ. भवरलालजी जैन यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या गांधी रिसर्च फाऊंडेशनचे सहयोगी अश्विन झाला आणि त्यांच्या पत्नी निर्मला झाला यांनी नुकतीच गुजरात विद्यापीठाद्वारा पीएच. डी. पदवी प्राप्त केली आहे.

गांधीजींच्या सार्वजनिक कामांसाठी आर्थिक साधने संकलनः प्रयत्न, पद्धती आणि व्यवस्थापन' या विषयात अश्विन झाला यांनी संशोधन केले. जैन हिल्स स्थित गांधी रिसर्च फाऊंडेशनमध्ये झालाजी कार्यरत आहेत. गांधीजींच्या फंड रेझिंग या विषयासंदर्भातील हे प्रथम संशोधन आहे. श्रद्धेय भवरलालजी जैन तथा मोठया भाऊंनी त्यांना गांधी रिसर्च फाऊंडेशन रेसिडेंट स्कॉलरसाठी संशोधन करावे अशी प्रेरणा दिली होती. गांधीतीर्थ मधील वाचनालयातून झाला दाम्पत्यास संशोधनासाठी लागणारे साहित्य उपलब्ध करून देण्यात आले होते. अश्विन झाला यांच्या पत्नी निर्मला झाला यांनीही त्याच कालवधित भवरलालजींच्याच प्रेरणेने महाराष्ट्रातील गांधीजीः कालगणना, प्रसंग आणि कृती' या विषयावर संशोधन करून पीएच.डी. पदवी प्राप्त केली. प्रस्तुत विषयही भवरलालजींनी सूचवला होता. गुजराथ विद्यापीठात त्यांचे प्रबंध ऑनलाईन सादर झाले. सद्यपरिस्थितीत व्हायवाही ऑनलाईन घेण्यात आला.

परीक्षकांनी त्यांच्या संशोधनासाठी डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (पीएच.डी.) ही मानद पदवी देण्याची शिफारस करत उभयतांच्या कामाची गुणवत्ता आणि संशोधनाची प्रशंसा केली. अभिनंदनीय बाब म्हणजे गुजरात विद्यापीठाने दोन्ही प्रबंध तीन वेगवेगळ्या भाषेत म्हणजे गुजराथी, हिंदी आणि इंग्रजीत मुद्रित करण्याचे निश्चित केले असून मराठीतही भाषांतरीत करण्याची सूचना केली आहे. झाला दाम्पत्य गांधी रिसर्च फाऊंडेशनमध्ये सहकारी या नात्याने वर्ष २०१० पासून म्हणून कार्यरत आहे. गांधी रिसर्च फाऊंडेशनच्या व्यवस्थापन सदस्यांनी फाऊंडेशनने पुरस्कृत केलेल्या या दोन्ही सहकाऱ्यांच्या पीएच.डी संशोधनाबद्दल समाधान व्यक्त करून त्यांचे अभिनंदन केले आहे. झाला दाम्पत्यास गुजराथ विद्यापीठाचे डॉ. सुदर्शन अय्यंगार यांचे मार्गदर्शन लाभले. या दोघं अभ्यासकांनी आपले संशोधनपर प्रबंध आदरणीय भवरलालजींना अर्पण केले आहेत.

# वाढदिवसानिमित्त सोलापूर ग्रामीण पोलिसांना एक दिवसांची सुट्टी मिळणार

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी कार्यालयीन पोलीस कर्मचारी, चतुर्थश्रेणी पोलीस कर्मचारी यांना वाढदिवसाची एक दिवस रजा, सुट्टी मिळणार आहे. सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी तीन जानेवारी पासून हा उपक्रम सुरू केली आहे. संबंधित पोलीस ठाण्यातील अधिकारी यांच्यामार्फत त्यांना शुभेच्छा पत्र देण्यात येईल. एकत्रित केक कटींग होईल. पोलिसांना आपला वाढदिवस कुटुंबियांसमवेत साजरा करण्यात यावा यासाठी एक दिवसाची सुट्टी देण्याचा निर्णय घेतल्याची माहिती पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी दिली आहे. वाढदिवसाच्या आदल्या दिवशीच संबंधीत अधिकाऱ्याकडून शुभेच्छा संदेश पत्र मिळेल. एकत्रित केक कापल्यामुळे एकोपा व आनंद राहील. वातावरण चांगले राहण्यास मदत होईल. पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्यातील सुसंवाद वाढेल. पोलीस कर्मचाऱ्यांच्या किंवा पोलीस अधिकारी यांच्या वाढदिवस साजरा केल्याने कौटुंबिक वातावरण तयार होईल असा या उपक्रमाचा हेतू आहे. एखाद्या प्रसंगी म्हणजे वारी बंदोबस्त, व्हीआयपी बंदोबस्त, महत्त्वाची घटना घडल्यास सुट्टी देता आली नाही, तर बंदोबस्त संपल्यानंतर लागलीच सुट्टी देण्यासाठी सूचना आहेत. जेणेकरून त्यांना कुटुंबासोबत वेळ घालविता येईल.

# एटीएम फोडण्याचा प्रयत्न करणाऱ्या चौघांना अटक



**उल्हासनगर/प्रतिनिधी**

संपूर्ण विश्व सरत्या वर्षाला निरोप देऊन नववर्षाच्या स्वागत करण्यासाठी आनंद व हर्षोल्हासात मशगुल असतांना काही चोर बँकेचे ए.टि.एम. फोडून चोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या चार जणांच्या मुसक्या आवळण्यात गुन्हे प्रकटीकरणाचे पोउपनि हर्षल राजपूत ह्यांच्या पथकांने यश प्राप्त केले आह. १ जानेवारीच्या रात्री अडीच वाजेच्या सुमारास विठ्ठलवाडी पोलीस स्टेशन च्या हद्दीतील सतरामदास हॉस्पीटल येथील क्सिस बँकेच्या ए.टी.एम मध्ये प्रवेश करून सदर ए.टी.एम चे सेप्टी डोर आणि ए.टी.एम पासवर्ड किट तोडून त्या मधून अज्ञात इसमानी पैसे काढण्याचा प्रयत्न केला होता. या प्रकरणी ए.टी.एम अधिकारी राजेश बोरकर यांच्या फिर्यादी नुसार विठ्ठलवाडी पोलीस स्टेशनमध्ये भादवी कलम ३८०, ४५७, ५११, प्रमाणे गुन्हा दाखल झाला. या तक्रारी नुसार बँकेच्या सीसीटीव्ही फुटेज वरुन आसपासच्या परिसरातील फुटेज तपासत त्यांना दोन आरोपी ए.टी.एम बाहेर फिरताना आणि दोन आरोपी ए.टी.एम बाहेर येऊन पळताना दिसले या चार आरोपींची पोलिसांनी लागलीच ओळख पटवली. बातमीदाराने दिलेल्या माहितीच्या आधारे या चौघांना आशेळेगाव परिसरात सापळा रचत २४ तासात चार आरोपीच्या मुसक्या आवळण्यात पोलीसांना यश आले आहे. सागर सूर्यवंशी, आशिष गौर, केशव जगताप, रोहित कहार असे या आरोपीची नावे आहेत. सदर आरोपींना न्यायालयात हजर केले असता त्याना तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. गुन्हाचा अधिक तपास पो.शि.निलेश तायडे हे करित आहे. वरिष्ठ पो.नि.कन्नैया थोरात यांच्या मार्गदर्शनात गुन्हे प्रकटीकरणाचे पो.उप.नि.हर्षल राजपुत यांच्या नेतृत्वात पोलीस नाईक जितेंद्र चित्ते, निलेश तायडे, रोहिदास बुधवंत, पांडुरंग पथवे, पोलीस शिपाई, वैजनाथ राख, हरेश्वर चव्हाण, हनुमंत सानप, कृपाल शेकडे, गणेश डमाळे, बाबा जाधव, मंगेश वीर ह्यांनी सदरील कामगिरी उत्तमरित्या बजावत आरोपींना २४ तासाच्या आत अटक केल्याने वरिष्ठानी पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरणाच्या कर्मचाऱ्यांचे कौतुक करत त्याचे मनोबल वाढवुन आंनद व्यक्त केला.

# सुंदर माझे कार्यालय उपक्रमाअतंर्गत लातूरमध्ये राबविले स्वच्छता कार्यक्रम

**लातूर/करकरे अंबादास**

लातूर जिल्हा परिषद अंतर्गत सर्व कार्यालयामध्ये सुंदर माझे कार्यालय हा उपक्रम दि. २८ डिसेंबर २०२० ते २८ फेब्रुवारी २०२१ या कालावधीत अभियान मोहीम स्वरूपात राबविण्यात येत आहे. सुदंर माझे कार्यालय या उपक्रमा अंतर्गत पहिल्या टप्याची सुरूवात म्हणून दि. ०६ जानेवारी



२०२१ रोजी लातूर जिल्हा परिषद इमारतीच्या बाहेरील परिसर व बागेच्या परिसराची स्वच्छता करून या सुंदर माझे कार्यालय या अभियानाचे उद्घाटन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल यानी केले. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष जोशी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रभु जाधव, मुख्य लेखा व वित्त अधिकारी रत्नराज जवळगेकर, आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, कार्यकारी अभियंता शेलार सर्व विभाग प्रमुखासह सामान्य प्रशासन विभागाचे मसलगे, व्ही.व्ही, रामकृष्ण फड तसेच सर्व विभागातील कर्मचारी उपस्थित राहून परिसर स्वच्छता केली ही स्वच्छता अभियान मेहिम दरमहा राबविण्यात येणार आहे.

# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी तहसीलदारांना निवेदन

**वाडा/प्रतिनिधी**

भिवंडी लोकसभा मतदार संघातील वाडा तालुक्यातील जवळपास २० हजार शेतकऱ्यांचे खरीप हंगामात परतीच्या पावसाने शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले होते. सदर झालेल्या नुकसानीचे पंचनामे शासनामार्फत पुर्ण होऊन शेतकऱ्यांना मदत जाहीर केली होती. वाडा तालुक्यातील १९ हजार ४७१ शेतकऱ्यांचे १० हजार १५६ हेक्टर शेतजमिन भातपिकाचे परतीच्या पावसामुळे नुकसान झाले आहे. आपतीग्रस्त शेतकऱ्यांसाठी २ कोटी ९९ लक्ष रूपये तातडीची मदत शासनाने तहसिलदार कार्यालय येथे जमा केली होती. मात्र सदरील शेतकऱ्यांचे अनुदान तहसिल कार्यालयाने स्टेट बँकेच्या वाडा शाखेत जमा केली आहे. परंतु वाडा तालुक्यातील बहुतेक शेतकऱ्यांचे बँकेचे खाते ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत आहेत. त्यामुळे सदरील अनुदान हे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले नाही. त्यामुळे सदरील मंजुर अनुदानापासुन शेतकरी वंचित आहे. तरी याबाबत योग्य ती




तात्काळ कार्यवाही करण्याची मागणी खासदार कपिल पाटील यांनी एका निवेदनाद्वारे तहसीलदार यांना केली आहे.

11 JAN TO 17 JAN 2021 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 09/01/2021 8:37 PM Page 1



# वैचारिक परंपरेचा पाया बाळशास्त्री जांभेकरांनी रचला-गिरीष कुबेर

## नवी मुंबईत पत्रकार दिन साजरा



**नवी मुंबई/प्रतिनिधी**

महाराष्ट्राची वैचारिक परंपरा सर्व श्रेष्ठ आहे. ही परंपरा जपण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्राची भूमी विचार देणारी आहे. महाराष्ट्र ज्या विचारवंतांसाठी ओळखला जातो. त्या वैचारिक परंपरेचा पाया जांभेकरांनी रचला आहे असे प्रतिपादन दै.लोकसत्ताचे संपादक गिरीष कुबेर यांनी केले. २१व्या शतकातील २१ वे वर्ष:आव्हाने या परिसंवादात ते बोलत होते. नवीमुंबई प्रेस क्लब आणि नवी मुंबई युनियन ऑफ जर्नालिस्ट्स यांच्या संयुक्त विद्यमाने, विभागीय माहिती कार्यालय, कोकण विभाग यांच्या सहकार्याने पत्रकार दिनानिमित्त विष्णूदास भावे नाट्यगृह, वाशी, नवी मुंबई येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास सचिव तथा महासंचालक माहिती व जनसंपर्क डॉ.दिलीप पांढरपट्टे, सामाजिक कार्यकर्ते डॉ.विश्वंभर चौधरी, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त अभिजीत बांगर उपस्थित होते.

यावेळी बोलतांना गिरीष कुबेर म्हणाले की, बाळशास्त्री जांभेकरांच्या कारकिर्दीतील 'दर्पण' हे सर्वात छोटे कार्य होते. यापेक्षाही महत्त्वाचे आणि मोठे कार्य त्यांनी त्यांच्या जीवनात केलेले आहेत. त्यांची भाषणे ऐकायला अनेक मान्यवर पहिल्या रांगेत बसत असत. जांभेकरांच्या कार्याची माहिती महाराष्ट्राला होणे गरजेचे आहे. महाराष्ट्र ज्या विचारवंतांसाठी ओळखला जातो. त्या वैचारिक परंपरेचा पाया जांभेकरांनी रचला आहे. या विचारांचा धागा तुटता कामा नये. पुढे ते म्हणाले की, देशाची प्रगती हवी असेल, तर लघूउद्योगांची प्रगती होणे आवश्यक आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानावर अधिक खर्च होणे आवश्यक आहे. महाराष्ट्र ही कार्यकर्त्यांची भूमी आहे. याच देशात उजवे आणि डावे देखील आहेत. स्वतंत्रपणे विचार करण्याची आवश्यकता आहेच, परंतु प्रश्न विचारण्याची खरी गरज देखील आहे. धर्म आणि नितीमत्ता याचा काही संबंध नसतो. महाराष्ट्रात तर्कवादाचा उदय बाळशास्त्री जांभेकरांपासून सुरु झाला हे लक्षात घेतले पाहिजे असेही कुबेर म्हणाले.

महाराष्ट्रातल्या साहित्य संस्कृती व कला संदर्भात बोलतांना सचिव तथा महासंचालक माहिती व जनसंपर्क डॉ.दिलीप पांढरपट्टे म्हणाले की, महाराष्ट्र हा साहित्य संस्कृतीच्या क्षेत्रात देशात अग्रेसर आहे. महाराष्ट्राच्या भूमीने अनेक मोठे साहित्यिक व कलाकार या देशाला दिले आहेत. त्यांचे साहित्य व कलाकृती आजही अजरामर आहेत. आजच्या साहित्य संम्मेलनामध्ये साहित्याची हानी होत आहे. मराठी साहित्यांमध्ये लोकप्रियतेचा धोका आहे. यातून साहित्यकारांनी बाहेर पडणे आवश्यक आहे. साहित्यकाराने कधीही प्रेक्षकांच्या प्रतिसादाची अपेक्षा ठेऊ नये, नेहमी स्वतःला स्वतःच दाद दिली पाहिजे. आज साहित्यात खरं लिहिण्याची आवश्यकता आहे आणि हेच मोठे ...पान ६ वर

# कोरोना लसीकरणासाठी आरोग्य विभाग सज्ज



**पालघर/प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्यात करोना प्रतिबंधात्मक लसीकरणासाठीच्या हालचालींनी वेग धरला असून या लसीकरणासाठीची रंगीत तालीम (ड्राय रन) शुक्रवार दि.०८ जाने. २०२१ रोजी मासवण प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत मासवण आश्रमशाळा येथे जि.प.उपाध्यक्ष निलेश सांबरे, जिल्हाधिकारी डॉ.माणिक गुरसळ, मुख्य कार्यकारी अधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या विशेष देखरेखीखाली पार पडली. लसीकरणसंदर्भात आवश्यक असलेल्या बाबींची पूर्वतयारी करून प्रतिबंधात्मक उपाययोजना नियमांचे पालन करून ही रंगीत तालीम घेतली गेली. यावेळी प्रत्यक्षात लस टोचली नसली तरी लस टोचण्यासाठी झालेली पूर्वतयारी याची पाहणी यावेळी उपस्थित मान्यवरांनी केली.

जिल्ह्यातील एकूण १६,००० कर्मचाऱ्यांना पहिल्या टप्प्यात लसीकरण करण्यासाठी ही ड्राय रन आयोजित करण्यात आली असून कुठलीही भीती न बाळगता ही लस घ्यायची आहे. लस घेते वेळी एखाद्या व्यक्तीस त्रास झाल्यास तेथेच त्यावर औषधोपचार करण्यात येतील, तसेच लस घेणाऱ्या व्यक्तीने नोंदणी करण्यासाठी आवश्यक ती कागदपत्रे त्यावेळी घेऊन जावीत अशी माहिती जिल्हाधिकारी यांनी देऊन ही रंगीत तालीम ...पान ६ वर

# मुख्याध्यापिका रजिया शेख यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार



**लातूर/प्रतिनिधी**

लातूर महापालिकेच्या म.न.पा. उर्दू शाळा क्रमांक १३ च्या प्रभारी मुख्याध्यापिका शेख रजिया सुलताना महेबुब यांना राज्यस्तरील आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. लोणावळा येथे पार पडलेल्या सोहळ्यात शालेय शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांच्या हस्ते शेख रजिया सुलताना महेबुब यांना सन्मानपत्र, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र राज्य नगरपालिका व महानगरपालिका शिक्षक संघटने तर्फे राज्यातील १०० शिक्षकांना आदर्श शिक्षक, आदर्श शाळा, प्रेरणा, कोरोना योद्धा व तंत्रमित्र आदी विविध विभागांमध्ये पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी आ. संजय जगताप, संघटनेचे अध्यक्ष अर्जुन कोळी, प्राथमिक शिक्षण विभागाचे संचालक दत्तात्रय जगताप, शिक्षण ...पान ६ वर

### चर्मकार सेवा सोसायटीतर्फे सावित्रीबाई फुले जयंती संपन्न

# सावित्रीबाई फुले यांनी येणाऱ्या शेकडो पिढ्यासाठी त्याग केला -अनिता सातपुते



**विरार/प्रतिनिधी**

संत शिरोमणी गुरू रविदास चर्मकार सेवा सोसायटी च्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती आणि महिला मुक्तीदिन साजरी करण्यात आली. संत शिरोमणी गुरू रविदास चर्मकार सेवा सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष विजय बाबुराव माने यांच्या मार्गदर्शनाखाली वसई विरार जिल्हाध्यक्ष विद्या राजेश भोईर, कविता भोईर, प्रतिभा प्रकाश भोईर, आशा अशोक भोईर यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम आयोजित केला होता.

कै. अण्णासाहेब वर्तक स्मारक वसाहत, विवा तारांगण जवळ, फुलपाडा रोड, विरार (पूर्व) येथे रविवार दि. ३ जानेवारी २०२१ रोजी सायं. ६ वा. येथे संपन्न झालेल्या कार्यक्रमासाठी ज्येष्ठ समाजसेविका तथा चर्मकार सेवा सोसायटीच्या राज्य संघटक श्रीम. अनिता सातपुते या प्रमुख वक्त्या उपस्थित होत्या. त्यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवन चरित्रावर प्रबोधन केले. त्या म्हणाल्या की, क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले तथा राष्ट्रीय महापुरुषांचे चरित्र वाचन करणे गरजेचे आहे. यामुळे आपल्यात एक नवी ऊर्जा निर्माण होते. स्वातंत्र्य काळात सावित्रीबाई फुले यांनी ज्या महिला व ...पान ६ वर

# जिल्हा माहिती कार्यालयात पत्रकार दिन साजरा



पालघर : जिल्हा माहिती कार्यालयामध्ये मराठी पत्रकार दिन साजरा करण्यात आला. जिल्हा माहिती अधिकारी राहूल भालेराव यांनी मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. गंगाधर जामनिक, योगेश गायकवाड, लौकिक जाधव व बाबू पवार यांच्या उपस्थितीत जांभेकरांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दर्पण' हे मराठी भाषेतील पहीले वृत्तपत्र काढून मराठी वृत्तपत्रांचा पाया रचला. पाश्चात्य विद्या व शिक्षण आत्मसात करून 'दर्पण'च्या माध्यमातून बाळशास्त्री जांभेकरांनी समाजात नवी जीवनमुल्ये रूजविण्यात मोलाचे योगदान दिले. बाळशास्त्री जांभेकरांच्या या योगदानासाठी त्यांचा जन्मदिन 'मराठी पत्रकार दिन' म्हणून साजरा करण्यात येतो.

# वाडा नगरपंचायतीचा विषय समिती सभापती बिनविरोध



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा नगरपंचायतीच्या चार विषय समिती पदांसाठी सोमवारी (दि.४) झालेल्या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या चारही उमेदवारांची बिनविरोध निवड झाली . वाडा नगरपंचायतमध्ये नगराध्यक्षा पदासाठी शिवसेनेच्या गितांजली कोलेकर ह्या जनतेतून निवडून आल्या आहेत. तर एकुण १७ नगरसेवकांमध्ये शिवसेना -६, भाजप -६, काँग्रेस -२, राष्ट्रवादी काँग्रेस, बहुजन विकास आघाडी व आरपीआय यांचे प्रत्येकी एक संख्याबळ आहे.

विषय समित्यांच्या सभापती पदासाठी सोमवारी झालेल्या निवडणुकीत बांधकाम समिती सभापती पदी राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुचिता पाटील, पाणी पुरवठा समिती सभापती पदी शिवसेनेचे संदिप गणोरे, नियोजन समितीच्या सभापती पदी आरपीआयचे राम जाधव व महिला व बालकल्याण समितीच्या सभापती पदी शिवसेनेच्या शुभांगी धानवा यांची बिनविरोध निवड झाली आहे. यावेळी महाविकास आघाडीच्या तालुक्यातील पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहुन नवनिर्वाचित सर्व विषय समित्यांच्या सभापतींचे अभिनंदन केले.तर या निवडणुकीसाठी पीठासीन अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी अर्चना कदम यांनी जबाबदारी पार पाडली.

# पत्रकार देतो समाजाला मोफत सेवा-डॉ.वसंत बिराद्दार

**अहमदपूर/प्रतिनिधी**



पत्रकार आपला जिव मुठित घेऊन बातम्या संकलन करून समाजापर्यंत पोहंचवतात. कोरोना सारख्या महामारित पत्रकार बांधवानी आपल्या जिवाची परवा न करता बातम्या संकलन केल्या, परिसरातील घडामोडी समाजात पोहचविल्या एका दृष्टीने पत्रकार समाजाला मोफत सेवा देतात असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. वसंत बिरादार यांनी केले. ते अहमदपूर तालुका पत्रकार बांधवांचा सत्कार सोहळ व दर्पण दिन प्रसंगी बोलत होते. यावेळी विचारमंचावर उपविभागीय पोलीस अधिकारी बलराज लंजीले, तालुका दंडाधिकारी प्रसाद कुलकर्णी , नगरसेवक संदिप चौधरी पत्रकार संघाचे अध्यक्ष बासिदखान पठाण, जेष्ठ पत्रकार उदयकुमार जोशी, माजी उपनगराध्यक्ष पापा अय्या आदींची प्रमुख उपस्थिती होती. दर्पण दिनाचे औचित्य साधून वृक्षमित्र तथा सामाजीक कार्यकर्ते लक्ष्मण अलगुले यांच्या वतिने पत्रकारांचा भव्य सत्कार समारंभ शहरात अलगुले संपर्क कार्यालय येथे आयोजित करण्यात आला होता.

बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी रोजी दर्पण नावाचे वर्तमाण पत्राची सुरवात केली व समाजातीवर होत अन्यायाला वाचा फोडण्याचे काम केले हा दिवस पत्रकार दर्पण दिन म्हणुन एका सणासारखा साजरा करतात. पत्रकारांना कोणतेच मानधन नसते विना पगारी फुल अधिकारी असुनही निर्भीड पत्रकारीता करणाऱ्या पत्रकार बांधवांचा सन्मान येथील वृक्षमित्र तथा सामाजीक कार्यकर्ते लक्ष्मण अलगुले यांच्या वतिने घेण्यात आला. कार्यक्रमास तालुक्यातील ७० पत्रकारांची उपस्थिती होती यावेळी सा.पोलीस संघर्ष च्या दिनदर्शीकेचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते पत्रकारांना सुंदर डायरी, पेन, पुष्पगुच्छ अश्या भव्य पद्धतीचा सन्मान करन्यात आला. पत्रकार दिन असल्यामुळे दिवसभर पत्रकार कार्यक्रमात व्यस्त असल्यामुळे त्यांना जेवनाचीही सवड न भेटल्यामुळे सायंकाळी त्यांना कार्यक्रमानंतर सुरुजी भोजनाची व्यस्थाही करण्यात आली होती. यावेळी आयोजक लक्ष्मण अलगुले यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर स्वागताध्यक्ष समविचारी पत्रकार संघाचे अध्यक्ष बासिदखान पठाण यांनी उपस्थिती मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी बलराज लंजीले यांनी आपले मनोगत व्यक्त केले तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष तालुक्याचे तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांनी पत्रकारांना शुभेच्छा दिल्या व अध्यक्षीय समोरोप केला. कार्यक्रात जेष्ठ पत्रकार सुरेश डबिर, दिकर मद्देवाड, सय्यद सलिम, प्रा.रत्नाकर नळेगावकर, शिवाजी वाडवणकर, पंडित बोडके, गोविंद गिरी, रामलींग तत्तापुरे, सचिन कोंडलवाडे, मेघराज गायकवाड,बाबन अत्तार, नासेर सय्यद, संजय माकेगावकर, गोविंद काळे,बाबासाहेब वाघमारे, बालाजी तोरणे, बालाजी काळे, संजिवकुमार देवणाळे,रुद्रा मुरकुटे, दगडु क्षिरसागर, शेख असलम, राहुल तिगोटे, फिरोज शेख, हनुमंत जोगदंड, गणेश हामणे , राजमोहम्मद शेख,साबेर शेख, महादेव महाजन आदींसह तालुक्यातील ७० पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमात भाजपाचे शहराध्यक्ष श्याम काबलिया युवा सेनेचे तालुका अध्यक्ष रामप्रसाद अय्या, अँड भागवत जाधव, महेशअण्णा चौधरी, दत्ता शिंदे, प्रा.गणेश मदने, अजित सांगविकर शरद शिंदे, सतिश जंगले आदिंनी परिश्रम घेतले तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन पत्रकार मारोती बुद्रुक पाटील व प्रा.सादिक शेख यांनी केले.


